CMYK

SOLAPUR TARUN BHARAT

# सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, १२ मार्च २०२६ । वर्ष ४ रे अंक ४ था । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# फेरीवाल्यांना ओळखपत्र द्या; हॉकर्स झोन निश्चित करा

## परवानगी नसताना माकपने काढला मोर्चा; सपोनि ढवळे यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मार्च-**

राष्ट्रीय फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तसेच सोलापूर शहरातील फळ-भाजी विक्रेते, चारचाकी फेरीवाले, खोकेधारक व जीवनावश्यक वस्तू विकणाऱ्या पथविक्रेत्यांच्या विविध मागण्यांसाठी बुधवारी सीटू संलग्न हॉकर्स युनियनच्या वतीने महापालिकेवर मोर्चा काढण्यात आला.

सीटूचे राज्य महासचिव कॉ. एम.एच. शेख आणि राज्य उपाध्यक्ष कॉ. युसूफ शेख (मेजर) यांच्या नेतृत्वाखाली दत्तनगर येथील लाल बावटा कार्यालयापासून मोर्चाची सुरुवात झाली. दत्त चौक, पद्मशाली चौक, किडवाई चौक, यशोधरा हॉस्पिटल, सिद्धेश्वर प्रशाला व श्री सिद्धेश्वर मंदिर मार्गे हा मोर्चा महानगरपालिकेकडे मार्गस्थ झाला.

कॉ. युसुफ शेख (मेजर) म्हणाले की, शहरात सुमारे ६१३० फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झाल्याचे सांगितले जात असले तरी त्यांना ओळखपत्र व हॉकर्स झोन निश्चित करण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. मोर्चाद्वारे फेरीवाल्यांना अधिकृत ओळखपत्र व विक्री प्रमाणपत्र देणे, शहराच्या लोकसंख्येच्या किमान २.५ टक्के फेरीवाल्यांना जागा उपलब्ध करून देणे, पथविक्रेता समितीची तातडीने बैठक घेणे, फेरी परवाना शुल्क ५००० ऐवजी ६०० करणे, भाजी मंडईतील दररोजची २५ फी कमी करून १० करणे तसेच अधिकृत हॉकर्स झोन निश्चित होईपर्यंत अतिक्रमण



कारवाई थांबविणे आदी मागण्या करण्यात आल्या. राष्ट्रीय फेरीवाला कायदा व शासन निर्णयानुसार या मागण्यांची तातडीने अंमलबजावणी न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या मोर्चात माजी नगरसेविका कॉ. नलिनी कलबुर्गी, कॉ. नसीमा शेख, ॲड अनिल वासम कॉ. सुनंदा बल्ला, कॉ. एम. हनीफ सातखेड, कॉ. रंगप्पा मरेड्डी सहभागी झाले होते.

**पोलीस व आंदोलकांमध्ये झटापट**

दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोलिसांनी मोर्चाला अडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलीस व आंदोलकांमध्ये झटापट झाली. यावेळी आंदोलकांना पकडणे व धक्काबुक्की झाल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. मात्र आंदोलकांनी पोलिसांचा बंदोबस्त तोडून महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत मोर्चा नेला व जोरदार घोषणाबाजी केली. मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. दरम्यान महापालिकेतील प्रशासकीय अधिकारी अनुपस्थित असल्याने सदर बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ढवळे यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले.

## आरटीईतून मोफत प्रवेशासाठी १८ मार्चपर्यंत ऑनलाइन अर्जाची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मार्च-**

दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के जागांवर मोफत शिक्षण मिळण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या आरटीई (२५ टक्के) प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत १८ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. १० मार्च २०२६ ही अंतिम तारीख होती. मात्र अर्जांची संख्या लक्षात घेता पालकांना आणखी संधी देण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. शासननिर्णय १२ फेब्रुवारी २०२६ नुसार या प्रक्रियेबाबत सुधारित सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार क्षेत्रीय स्तरावरील संबंधित कार्यालयांनी तसेच पालकांनी अर्ज प्रक्रियेच्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

**आरटीईची आकडेवारी**

एकूण प्रवेश देणाऱ्या शाळा : २८६. उपलब्ध जागा : २९४७. आतापर्यंत प्राप्त ऑनलाइन अर्ज : ३९१४.

## महत्वाचे...



### लक्ष्मी दहिवडी येथे इफ्तार पार्टी

**सोलापूर, दि. ११ मार्च-**

ॲड. दत्तात्रय खडतरे व कविता खडतरे या कुटुंबीयामार्फत मंगळवेढा तालुक्यातील मौजे लक्ष्मी दहिवडी येथील मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार होते. यावेळी जहांगीर शेख, राजाभाऊ मेतकुटे, निसार तांबोळी, हुसेन तांबोळी, अल्ताफ नदाफ उपस्थित होते. मुस्लिम बांधवांचा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी अल्लाउद्दीन आतार, मोहसीन तांबोळी, पैगंबर आतार ,इब्राहिम तांबोळी, चांद तांबोळी, अकबर तांबोळी, ग्रामपंचायत सदस्य मोहसीन मुलानी, बहुजन आघाडीचे सुनील सोनवणे, आत्माराम गवळी, तेजस झेंडे, संकेत माने, ग्रामपंचायत सदस्य संकेत सोनवले, शंकर गायकवाड, छायाचित्रकार उत्तमकुमार वाघमारे उपस्थित होते. सूत्रसंचालन अमीर तांबोळी यांनी केले तर आभार राजा मेतकुटे यांनी मानले.




### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्षपदी क्षीरसागर

**सोलापूर, दि. ११ मार्च-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जी.एम.मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेची लिंगशेट्टी मंगल कार्यालयात वार्षिक बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प फुले अर्पण करून सामुदायिक बुद्धवंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. संस्थेचे आधारस्तंभ दत्ता वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून सामाजिक कार्यकर्ते अजित बनसोडे, प्रवीण सोनवणे, अनिल गायकवाड, जीएम संस्थेचे सल्लागार राजा हौशेट्टी, विश्वस्त शशिकांत गायकवाड, निवृत्त पोलिस अधिकारी भाऊसाहेब शिंदे, वाहिद विजापुरे, ऐजाज लोखंडवाला, प्रशांत सरवदे, आयाज दिना, आप्पासाहेब बागले, संजय पोळ, दत्ता शिंदे, आप्पासाहेब गायकवाड, जितू वाघमारे, विश्वास बाबरे उपस्थित होते. **नूतन पदाधिकारी याप्रमाणे :** अध्यक्ष : अभी क्षीरसागर, कार्याध्यक्ष : आकाश जमादार, उपाध्यक्ष : आदित्य वाघमारे, मॅडी दुपारगुडे, किशोर भंडारे, बुद्धभूषण वाघमारे, सुमित सोनवणे, यशराज साळवे, अनुराग जाधव. सेक्रेटरी : रुपेश उबाळे, सह.सेक्रेटरी यशराज बनसोडे, गौतम माने, निशांत क्षीरसागर, खजिनदार : यशपाल वाघमारे, सह.खजिनदार निशांत वाघमारे काली), सिद्धार्थ बनसोडे, सुमित वाघमारे, मिरवणूक प्रमुख : मुकेश सोनवणे, नरेंद्र शिंदे, चंद्रकांत सुरवसे, रघुराज बनसोडे आदी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.



### कोरवली शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**दक्षिण सोलापूर, दि.११ मार्च-**

कोरवली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची स्थापना ९ मार्च १९०९ रोजी झाली होती. त्याचे औचित्य साधून शाळेचा वाढदिवस व वार्षिक स्नेहसंमेलन शाळेने आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुज्ञानी पाटील होत्या व कामती पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक बसवेश्वर जकीकोरे यांचे हस्ते उदघाटन झाले. प्रारंभी जिल्हा परिषद सदस्या विमल खताळ यांचे चिरंजिव अक्षय खताळ व पंचायत समिती सदस्या कोमल आवताडे यांचे पती अंकुश आवताडे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. शाळेचा ११७ वा वाढदिवस सरपंच सुज्ञानी पाटील व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मल्लिनाथ म्हमाणे व सर्व मान्यवर यांचे हस्ते केक कापून करण्यात आला. यावेळी विस्तार अधिकारी अतुलकुमार माने, केंद्रप्रमुख बी. डी. राठोड उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका सीता पाटील, सुहास पाटील, संतोष माळगोंडे, अभिजित ननवरे, जगदेवी यादव यांनी परिश्रम घेतले.

### पेशवा युवा मंचच्या वतीने ३ मे रोजी सामुदायिक व्रतबंध सोहळा

**पंढरपूर, दि. ११ मार्च-**

येथील पेशवा युवा युवा मंचच्या वतीने सामुदायिक व्रतबंध सोहळ्याचे आयोजन केले आहे. रविवार दि.३ मे २०२६ रोजी येथील पद्मशाली धर्मशाळा येथे सामुदायिक व्रतबंध सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पेशवा युवा मंचचे अध्यक्ष श्री निलेश कवडे यांनी दिली. अध्यक्ष कवडे यांनी सांगितले की, जिल्ह्यातूनच नव्हे तर महाराष्ट्रातील ब्राह्मण समाज आपल्या पाल्याचा उपनयन संस्कार श्रीक्षेत्र पंढरीत व्हावा यासाठी प्रयत्नशील असतो. बदलत्या सामाजिक परिस्थितीत हा संस्कार करणे फार जिकिरीचे आणि आर्थिक ओढाताणीचे ठरत आहे. सर्वसामान्य व आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबातील बटूस भूवैकुंठ पंढरीमध्ये ब्रह्मचर्याचा संस्कार मिळावा आणि त्यासोबतच त्याच्या कुटुंबाची आर्थिक बचत व्हावी या हेतूने या समारंभाचे आयोजन केले आहे. या व्रतबंध सोहळ्यात सहभागी होणाऱ्या बटूस सोवळे, उपरणे,पळी, पंचपात्र, संध्येची पोथी मोफत देण्यात येणार आहे. बटू सोबत येणाऱ्या दहा लोकांची मोफत भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. संस्कारानंतर बटूंची शोभायात्रा काढण्यात येणार असून यामध्ये शहरातील समाज बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन मंचचे अध्यक्ष निलेश कवडे व उपाध्यक्ष आदित्य (राम) काळे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी - (मो.९७६५२७७३२५ व मो.९८२२६१९०२०) या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा.

## सुनेच्या जाचाला कंटाळून बार्शीत वृध्दाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ मार्च-**

शहरातील उपळाई रोड परिसरातील नाईकवाडी प्लॉट येथे एका ७३ वर्षीय वृद्धाने सुनेच्या जाचाला कंटाळून राहत्या घरात आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना १० मार्च रोजी सकाळी उघडकीस आली आहे.

याप्रकरणी मयत सर्जेराव शंकरराव नायकुडे यांच्या मुलगा महेश नायकुडे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मयत सर्जेराव नायकुडे (वय ७३) हे बार्शीतील 'वसुंधरा' बंगल्यात राहत होते. फिर्यादी महेश नायकुडे यांचा भाऊ उमेश याची पत्नी सारिका उमेश नायकुडे (रा. कुडूवाडी रोड, बार्शी) ही गेल्या काही महिन्यांपासून (नोव्हेंबर २०२५ पूर्वीपासून) सर्जेराव नायकुडे यांना किरकोळ कारणावरुन वारंवार अपमानित करत होती. तुला घरातून हाकलून देईन, असे म्हणत त्यांना सतत मानसिक त्रास दिला जात होता.सतत होणारा अपमान आणि सुनेच्या जाचामुळे सर्जेराव नायकुडे हे प्रचंड मानसिक तणावाखाली होते. अखेर या त्रासाला कंटाळून १० मार्च रोजी सकाळी त्यांनी आपल्या राहत्या घरात जीवनयात्रा संपवली. याप्रकरणी महेश सर्जेराव नायकुडे (वय ४१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी सारिका उमेश नायकुडे हिच्या विरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम १०८ (आत्महत्येस प्रवृत्त करणे) नुसार गु.र.नं. १७२/२०२६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बार्शी शहर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## समाजातील संवेदनशीलता हरवतेय : शितोळे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ मार्च-**

सध्या तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर आपण उभे आहोत. संघर्ष आणि युद्ध होण्याचे मोठे कारण म्हणजे आपल्यातील संवेदनशीलता हरवत चालली आहे, असे प्रतिपादन संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी केले.



येथील श्री शिवाजी महाविद्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम उषा योजनेअंतर्गत कपॅसिटी बिल्डिंग प्रोग्रामच्या समारोप समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख हे होते. यावेळी सॉफ्टटेक सोल्यूशन कंपनीचे (पुणे) संचालक चेतन टाकसाळे, खेतान लाइब्रेरी कंपनी (मुंबई) सहयोगी संचालक डॉ. प्रल्हाद जाधव, डॉ. अनिल फाटक, डॉ. राहुल देशमुख, डॉ. वशिष्ठ गुरमे, ग्रंथपाल माधव टिपरसे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. सोमनाथ यादव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. किशोर गरड यांनी, तर आभार सहाय्यक ग्रंथपाल हणुमंत घावटे यांनी मानले.

## सांगोला महाविद्यालयामध्ये १७ मार्च रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र आणि सांगोला महाविद्यालयाच्या इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. १७ मार्च रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : सुशासन आणि सांस्कृतिक वारसा या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

याचे उद्घाटन विद्यापीठचे प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्राचे बीजभाषक म्हणून ज्येष्ठ इतिहासकार व पुरातत्त्वशास्त्रज्ञ डॉ. अरुणचंद्र पाठक तसेच राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगावचे डॉ.चंद्रकांत कोळीगुड्डे, संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढाचे डॉ. महेशकुमार घाडगे,र सोलापूर विद्यापीठचे डॉ.तारिक तांबोळी, डॉ.तेजस्विनी कांबळे हे तज्ज्ञ अभ्यासक मार्गदर्शन करणार आहेत. सत्राचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ.विष्णू वाघमारे, भारत महाविद्यालय, जेऊरचे प्रा.डॉ.शिवाजी वाघमोडे भूषवणार आहेत. समारोप समारंभासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे डॉ.बाबासाहेब दुधभाते हे प्रमुख पाहुणे म्हणून तसेच अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव ॲड.उदयबापू घोंगडे व सहसचिव साहेबराव ढेकळे, खजिनदार नागेश गुळमिरे हे उपस्थित राहणार आहेत. या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये इतिहास विषयाचे प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक तसेच विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे तसेच आपला संशोधन लेख पाठवावा असे आवाहन प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, डॉ.प्रभाकर कोळेकर तसेच चर्चासत्र समन्वयक डॉ. सदाशिव देवकर यांनी केले आहे.

## प्रभाग १२ मध्ये आरोग्य केंद्राची गरज; नगरसेविका सारिका खजूरगी यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मार्च-**

महानगरपालिका प्रभाग क्रमांक १२ मध्ये कष्टकरी व रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वस्ती आहे. या भागातील बहुतांश नागरिक आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्यामुळे खासगी दवाखान्यांमध्ये उपचार घेणे त्यांना परवडत नाही. त्यामुळे या परिसरात महापालिकेच्या वतीने सुसज्ज प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याची मागणी करण्यात आली.

नगरसेविका सारिका सिद्धाराम खजूरगी यांनी महापौर विनायक कोंड्याल यांशी चर्चा करून त्या संदर्भात त्या विषयासंदर्भात निवेदन देण्यात येईल. प्रभागातील सुनील नगर, नीलम नगर, कलावती नगर, विनायक नगर, अविनाश नगर, हडपद नगर,



संगमेश्वर नगर यांसह अनेक वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कष्टकरी कामगार व रोजंदारीवर काम करणारे नागरिक वास्तव्यास आहेत. या कष्टकरी कामगारांना खरंच या आरोग्य केंद्राची गरज असून त्याची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. अशी मागणी त्यांनी महापौर विनायक कोंड्याल यांच्याकडे करणार असल्याचे नगरसेविका सारिका खजूरगी यांनी सांगितले. सध्या या परिसरात महापालिकेचे कोणतेही सुसज्ज आरोग्य केंद्र उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना लहान-मोठ्या आजारांसाठी दूरवर जावे लागते किंवा खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो. यामुळे कष्टकरी कामगारांवर अनावश्यक आर्थिक भार पडत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक १२ मध्ये महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत प्रशस्त व सर्व सोयी-सुविधांनी युक्त प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात आल्यास परिसरातील नागरिकांना विनामूल्य किंवा अल्पदरात वैद्यकीय सेवा, प्राथमिक उपचार, तपासण्या आणि आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महापालिकेच्या आरक्षित जागेत प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी नगरसेविका सारिका खजूरगी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## शनिवारी उन्हाळी वाळवण स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ मार्च-**

महिला दिना निमित्त पंढरपूर पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने शनिवारी १४ मार्च रोजी भक्तीमार्गावरील योगभवन येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत उन्हाळी वाळवण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी महिलांनी घरगुती कौशल्याने बनवलेले पापड, कुरडई, सांडगे आणि शेवया घेऊन या स्पर्धेत सहभागी व्हा आणि आकर्षक बक्षिसे जिंका असे देखील या निमित्ताने पालिकेच्या वतीने महिलांना आवाहन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना महिलांचा प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक देवून सत्कार करण्यात येणार असून विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्र देखील दिले जाणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पंढरपूर नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधुन त्या ठिकाणी आपले नावनोंदणी करावी लागणार आहे.

## ध्येय ठेवून प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळेल : डॉ. रेवती राणे

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ११ मार्च-**

महिलांनी, मुलींनी आपल्या जीवनामध्ये ध्येय ठेवून प्रयत्न केल्यास निश्चित यश मिळेल व परिस्थिती बदलण्यास मोठी मदत होईल, असे प्रतिपादन स्त्री रोग व वंध्यत्व चिकित्सा तज्ञ डॉ. रेवती राणे यांनी केले.

त्या वेळापूर जिल्हा परिषद शाळा मुली येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा या कार्यक्रमांमध्ये त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर वेळापूर जि.प. सदस्या मीनाक्षी सरतापे, डॉ. शुभांगी माने-देशमुख, गटशिक्षणाधिकारी पं. स. माळशिरस सुष्मा महामुनी, डॉ. स्नेहल जानकर, डॉ. सुप्रिया हेगडे, डॉ. रसिका खिस्ते, विद्या गायकवाड, प्रियंका



आडत, सीमा खाडे, अनिता बनसोडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष करिश्मा मुलाणी, मनीषा भानवसे, सुवर्णा चव्हाण उपस्थित होत्या. प्रास्ताविक किरण घाडगे यांनी केले. यावेळी तेजश्री भानुसे या विद्यार्थिनींनी भाषण केले. महिला दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या नीता जाधव, अंकिता लोखंडे, अनुराधा काटकर, कल्पना सालपे, अशा गायकवाड, करिष्मा मुलाणी आदी महिलांना बक्षीसे देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक युन्नूस तांबोळी, शिक्षक जीवन रणनवरे, पांडुरंग कुलकर्णी, नितीन चव्हाण, प्रवीणकुमार पांगे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कविता आवटे यांनी केले तर आभार आसराबाई जैन यांनी मानले.



## राज मेमोरियल स्कूलमध्ये महिलांचा सन्मान

### 'तरुण भारत'च्या अश्विनी तडवळकर यांचाही झाला गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मार्च-**

राज मेमोरियल इंग्लिश स्कूलमध्ये महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्यात आला.

सर्वप्रथम प्रमुख पाहुण्या बालरोग तज्ञ डॉ. सरिता अरकाल, डॉ. रधिका चिलका यांच्या हस्ते तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा, डॉ. विणा कणबसकर, स्मिता जन्नु, पालक शिक्षक संघाचे अध्यक्षा शोभा कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्व. विष्णुपंत कोठे, स्व. राजेश कोठे, स्व. महेश अण्णा कोठे, देवी सरस्वती, सावित्रीबाई फुले, यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील समाज उपयोगी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष आमदार देवेंद्र कोठे, सचिव प्रथमेश कोठे, डॉ. राधिका चिलका, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.


**यांचा झाला सन्मान**

अश्विनी गायकवाड (बीट ऑफिसर वन विभाग), अश्विनी तडवळकर (डिजिटल विभाग संपादक तरुण भारत, पौर्णिमा शंके (क्रिमिनल वकील), सोनाली घंटे (क्रीडा क्षेत्र), ज्योती गायकवाड (अंगणवाडी सेविका), श्वेता मेगेरी (मुख्याध्यापिका आय स्कूल), अर्चना सातारकर (मेकअप आर्टिस्ट), रेखा म्हेत्रे (महिला रिक्षा चालक), डॉक्टर सरिता अरकाल (बालरोग तज्ञ), अनु मोहिते (प्रार्थना फाउंडेशन), डॉ. विना कणबसकर, (प्राचार्य संभाजीराव शिंदे डी. अॅड. व बी. एड.शिक्षण. शास्त्र महिला महविद्यालय).

सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



नि शाखेमध्ये एखादा लहान शिशु स्वयंसेवक जरी आला तरी त्याचेही कुटुंब संघनिष्ठ बनले पाहिजे. या प्रकारे स्वयंसेवकाच्या कुटुंबीयांना संघानुकूल तसेच समाजानुकूल केल्यामुळे आपल्या समाजाला समग्र रूपाने संघटित करण्याच्या कार्यात त्यांचे बहुमूल्य योगदान राहील. कारण हिंदू समाजाचा मूलभूत घटक व्यक्ती नाही, तर कुटुंब आहे. मुलांवर होणारे मूलभूत संस्कार, चारित्र्य इ. सर्वांचे बीजारोपण कुटुंबातच होत असते.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### बिटकॉईन घोटाळ्यातील मुख्य आरोपीला अटक

**नवी दिल्ली** : २० हजार कोटी रुपयांच्या गेन बिटकॉईन चलन घोटाळ्यातील मुख्य आरोपींपैकी एक असलेल्या डॉर्विन लॅब्सचा सहसंस्थापक आयुष वार्ष्णेयला सीबीआयने अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. तपासयंत्रणेने वार्ष्णेयच्या विरोधात लूक आऊट नोटीस जारी केली होती. सोमवारी देश सोडून पळून जाण्याचा त्याचा प्रयत्न सुरू होताच अलर्ट जारी करण्यात आला आणि त्याला मुंबई विमानतळावर ताब्यात घेण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याला मंगळवारी औपचारिकपणे अटक करण्यात आली. डार्विन लॅब्जने डिजिटल पायाभूत सुविधांची रचना आणि विकास केला. या पायाभूत सुविधा कथित फसव्या एंटरप्राईझ गेन बिटकॉनचा कणा ठरला होता. तपासादरम्यान यंत्रणेला डार्विन लॅब्स प्रा. लि. आणि तिचे सहसंस्थापक वार्ष्णेय, साहिल बाघला आणि निकुंज जैन, मुख्य भांडवली अधिकारी आणि वाओमी एमआयचा संस्थापकांची एसीएपी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्रिप्टोकरन्सी टोकन आणि त्याच्याशी संबंधित ईआरसी-२० स्मार्ट कॉन्ट्रॅक्टचे डिझाईन, विकास आणि तैनातीतील कथित सहभाग आढळून आला.

# इच्छामृत्यूची मागणी मान्य

## सुप्रीम कोर्टाने दिली परवानगी



### निर्णय देताना न्या. पारडीवालांना अश्रू अनावर

### अशाप्रकारचा देशातील पहिलाच निर्णय





गेल्या १३ वर्षांपासून आई-वडील हरीशची काळजी घेत आहेत

◆ **नवी दिल्ली, ११ मार्च**

गेल्या १३ वर्षांपासून कृत्रिम जीवनरक्षक प्रणालीवर जीवंत असलेल्या एका ३१ वर्षीय युवकाला सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाची परवानगी दिली आहे. ''तुम्ही तुमच्या मुलाला सोडून देत नाही, तर त्याला सन्मानाने निरोप देत आहात,'' असे म्हणताना न्या. जे. बी. पारडीवाला यांना अश्रू अनावर झाले.इच्छामृत्यूची मागणी मान्य केल्याचा हा देशातील पहिलाच निर्णय आहे.

सर्वोच्च न्यायालयात बुधवारी अत्यंत भावनिक क्षण आला. १३ वर्षांपासून कोमात असलेल्या ३२ वर्षीय हरीश राणा यांना न्यायालयाने निष्क्रिय इच्छामरणाची परवानगी देणारा ऐतिहासिक निर्णय दिला. हरीश राणा यांना 'पॅसिव्ह युथनेशिया' म्हणजेच उपचार थांबवून मृत्यू पत्करण्याची परवानगी न्यायालयाने दिली आहे. न्यायालयाच्या आदेशाने अशा प्रकारे इच्छामरण देण्याची ही देशातील पहिलीच वेळ आहे.

२०१८ मध्ये न्यायालयाने निष्क्रिय इच्छामरणाला कायदेशीर मान्यता दिली होती. पण, त्यातील काही तांत्रिक बाबी स्पष्ट नव्हत्या. न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन् यांच्या न्यायासनाने हा संवेदनशील निकाल दिला. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'पॅसिव्ह युथनेशिया'ला कायदेशीर मान्यता दिली होती. मात्र, आजच्या निकालाने त्यातील अनेक तांत्रिक बाबी अधिक स्पष्ट केल्या आहेत.

हा निकाल ऐतिहासिक मानला जात आहे. कारण, त्याने २०१८ च्या मार्गदर्शक तत्त्वांना एक पाऊल पुढे नेले आहे. ज्या रुग्णांचे प्राण केवळ फीडिंग ट्यूबद्वारे (अन्नपुरवठा करणारी नळी) व्यतित होत आहे, अशा प्रकरणांमध्ये निष्क्रिय इच्छामरणाची प्रक्रिया कशी राबवावी, यावर पूर्वी स्पष्टता नव्हती. आजच्या निकालामुळे हा पेच सुटला आहे.

दिल्लीच्या महावीर एन्क्लेव्हचा रहिवासी हरीश महाविद्यालयीन शिक्षणासाठी चंदीगडला गेला होता. २० ऑगस्ट २०१३ रोजी पेईंग गेस्ट म्हणून राहत असलेल्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून तो पडला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. या अपघातात त्याला १०० टक्के अपंगत्व आले. तेव्हापासून तो शुद्धीवर नाही. मागील १३ वर्षांपासून हरीश केवळ नळ्यांद्वारे श्वास आणि पोषण घेत आहे.

हरीशच्या उपचाराचा खर्च पेलण्यासाठी त्याच्या पालकांना मोठे कष्ट सोसावे लागले. उपचार सुरू ठेवण्यासाठी त्यांनी दिल्लीतील घर विकले. यानंतर गाझियाबादला स्थलांतर केले. एम्स रुग्णालयात दीर्घकाळ उपचार सुरू असल्याने आणि वाढत्या खर्चामुळे कुटुंबावर मोठा आर्थिक ताण आला होता. ◀(वृत्तसंस्था)

### न्यायालयाने ठेवला होता निकाल राखीव

**या प्रकरणी १५ जानेवारी २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात हरीशच्या पालकांनी दाखल केलेल्या पॅसिव्ह युथनेशिया (निष्क्रिय स्वेच्छामृत्यू) याचिकेवरील सुनावणी पूर्ण झाली होती. त्यावेळी न्यायालयाने निकाल राखून ठेवला. यावेळी न्यायालयाने स्थापन केलेल्या दोन वैद्यकीय मंडळांनी या रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा अहवाल दिला होता.**

### काय आहे निष्क्रिय इच्छामृत्यू?

**निष्क्रिय इच्छामृत्यू (पॅसिव्ह युथनेशिया) म्हणजे गंभीर आजारी किंवा कोमात असलेल्या रुग्णाला मृत्यूकडे नेण्यासाठी कृत्रिम उपचार. (उदा. व्हेंटिलेटर, फीडिंग ट्यूब काढून घेणे होय.) यामुळे त्याचा नैसर्गिक मृत्यू होऊ शकेल. ॲक्टिव्ह युथनेशियामध्ये इंजेक्शन देऊन मृत्यू दिला जातो. हा प्रकार भारतात बेकायदेशीर आहे; मात्र पॅसिव्ह युथनेशियाला विशिष्ट परिस्थितीत कायदेशीर मान्यता आहे.**

# समालखात होणार संघाच्या प्रतिनिधी सभेची बैठक

**१३, १४, १५ मार्च रोजी अ. भा. प्रतिनिधी सभा • देशभरातून १,४८७ स्वयंसेवक होणार सहभागी**

### शताब्दी वर्षाचे कार्यक्रम, सामाजिक आव्हाने आणि संघटनात्मक विस्तारावर होणार चर्चा




◆ **समालखा (पानीपत), ११ मार्च**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची सर्वांत मोठी निर्णय घेणारी बैठक, अखिल भारतीय प्रतिनिधी सभा १३ ते १५ मार्च दरम्यान समालखा येथील माधव सृष्टी संकुलात होणार आहे. देशभरातील रा. स्व. संघ आणि रा. स्व. संघ-प्रेरित संघटनांचे एकूण १,४८७ प्रतिनिधी या तीन दिवसांच्या बैठकीला उपस्थित राहतील, अशी माहिती रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी माधव सृष्टी कॅम्पसमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी त्यांच्यासोबत उत्तरप्रदेश संघचालक पवन जिंदाल व्यासपीठावर उपस्थित होते. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या उपस्थितीत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्या अध्यक्षतेखाली १३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता बैठक सुरू होईल. संघाचे अखिल भारतीय पदाधिकारी,

(शेवटच्या पानावर) ▶

### सामाजिक समस्यांवरही होईल चर्चा

देशभरातील स्वयंसेवक त्यांच्या संबंधित प्रदेशातील त्यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक अनुभव सांगतील. या अनुभवांच्या आधारे, सध्याची सामाजिक आव्हाने आणि परिस्थितीवरही चर्चा केली जाईल.

# रिलायन्सची रिफायनरीत गुंतवणूक

### डोनाल्ड ट्रम्प यांची माहिती

◆ **न्यू यॉर्क, ११ मार्च**

भारतातील रिलायन्स इंडस्ट्रीज टेक्सास येथे नव्यानेच उघडल्या जात असलेल्या तेल शुद्धीकरण प्रकल्पात गुंतवणूक करणार आहे, अशी माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली. या सौद्यासाठी त्यांनी कंपनी आणि भारतातील भागीदारांचे आभार मानले.

३०० अब्ज डॉलर्सचा हा एक ऐतिहासिक सौदा आहे. आमचे प्रशासन राबवत असलेल्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणाचा हा एक परिणाम आहे, असे ट्रम्प यांनी मंगळवारी समाज माध्यमावर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे. अमेरिकेच्या इतिहासातील हा एक मोठा सौदा आहे आणि



अमेरिकी कामगार, ऊर्जा क्षेत्र आणि दक्षिण टेक्सासमधील लोकांचा हा मोठा विजय असल्याचे ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले.

मात्र, दुसरीकडे रिलायन्स इंडस्ट्रीजकडून या सौद्याबाबत कोणती अधिकृत माहिती देण्यात आली नाही. या प्रचंड गुंतवणुकीसाठी भारतातील आमच्या भागीदारांचे आणि त्यांच्या सर्वांत मोठ्या खाजगी मालकीची ऊर्जा कंपनी रिलायन्सचे आभार मानतो, असे ट्रम्प म्हणाले.

ब्राऊन्सव्हिल बंदरातील नवीन शुद्धीकरण प्रकल्पामुळे अमेरिकी बाजारपेठांना इंधन मिळेल, राष्ट्रीय सुरक्षा मजबूत होईल, अमेरिकी ऊर्जा उत्पादन वाढेल आणि हजारो रोजगार निर्माण होतील, असे ट्रम्प म्हणाले. फेब्रुवारीत एका जागतिक सुपरमेजरकडून १० आकडी मूल्यांकनावर नऊ आकडी गुंतवणूक मिळाली, असे अमेरिका फर्स्ट रिफायनिंगने (एएफआर) एका निवेदनात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# बिर्लाविरोधातील अविश्वास प्रस्ताव फेटाळला

◆ **नवी दिल्ली, ११ मार्च**

लोकसभेच्या अध्यक्षांविरुध्द विरोधकांनी आणलेला अविश्वास प्रस्ताव दुर्दैवी आणि खेदजनक आहे, सांसदीय लोकशाहीतील हा काळा अध्याय आहे, या शब्दात गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांवर हल्ला चढवला. सभागृहात हा प्रस्ताव आवाजी मतदानात फेटाळण्यात आला.

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या विरुध्दच्या अविश्वास प्रस्तावावर सभागृहात सुरु असलेल्या चर्चेत सहभागी होतांना अमित शाह म्हणाले की, अध्यक्ष हे सर्वांचे असतात, कोण्या एका पक्षाचे नसतात, जेव्हा अध्यक्षांची निवड होते, तेव्हा सत्तापक्षाचे आणि विरोधी पक्षांचे नेते त्यांना आसनापर्यंत नेत

### लोकशाहीतील हा काळा अध्यायः अमित शाह

असतात. सभागृहातील सर्व पक्षांच्या सदस्यांचे हिताचे आणि अधिकाराचे रक्षण ते करत असतात. पण आज त्यांच्या निष्ठेवर संशय घेतला जात आहे. अध्यक्षांच्या निष्ठेवर कधी शंका घेतली जाऊ नये, अशी माझी भूमिका आहे.

लोकसभेच्या इतिहासात अध्यक्षांविरुध्द आतापर्यंत तीन अविश्वास प्रस्ताव आले. पहिला प्रस्ताव सोशालिस्ट पक्षाने तर दुसरा समाजवादी पक्षाने आणला होता. तिसरा अविश्वास प्रस्ताव काँग्रेसने आणला होता, याकडे लक्ष वेधत शाह म्हणाले की, चौथा अविश्वास प्रस्ताव पुन्हा काँग्रेसनेच आणला आहे.

अध्यक्षांच्या निर्णयात सर्वोच्च



न्यायालयही हस्तक्षेप करत नाही, हे संरक्षण त्यांना भारतीय संविधानाने दिले आहे. त्याचा आपण आदर केला पाहिजे, असे ते म्हणाले. तुम्ही पंतप्रधानांविरुध्द अविश्वास प्रस्ताव आणा, तो दुर्दैवी आणि खेदजनक आहे, असे आम्ही म्हणणार नाही, त्याला आम्ही राजकीय उत्तर देऊ, असे शाह म्हणाले. पण अध्यक्षांना असाधारण परिस्थितीतच हटवले पाहिजे. अध्यक्षांवर अविश्वास आणणे ही एकप्रकारे देशाची बदनामी आहे, असे शाह म्हणाले. ◀(तभा वृत्तसेवा)

### राहुल गांधींनी नियम शिकण्याची गरज

अध्यक्ष सभागृहाचे प्रमुख असतात. सभागृहाचे संचालन नियम आणि प्रक्रियेद्वारे होत असते. कोणत्याही सदस्याला सभागृहात अराजकता निर्माण करण्याची संधी देता येत नाही. राहुल गांधी यांना कामकाजाचे नियम शिकवण्याची गरज आहे, असे वक्तव्य रविशंकर प्रसाद यांनी केले. यावर काँग्रेस सदस्यांनी प्रचंड गोंधळ घातला.

# आयटी पार्क, उड्डाणपूल, नाईट लँडिंगसाठी निधीची तरतूद, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची विधिमंडळ अधिवेशनात घोषणा; आ. कोठेंचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मार्च-**

सोलापूर शहराच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या आमदार देवेंद्र कोठे यांचा उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरसाठी निधीची घोषणा बुधवारी विधानसभेत केली.

सोलापुरात होणाऱ्या आयटी पार्क करता जागा चिन्हांकित करण्यात आली आहे. आयटी पार्क करिता जी अर्थसंकल्पीत तरतूद आवश्यक असेल ती याचवर्षी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आमदार देवेंद्र कोठे यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या आयटी पार्कसह विविध विषयांची माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सोलापूरच्या विमानतळावर नाईट लॅंडिंग करण्यासंदर्भात केंद्र सरकारशी सुरू असलेली बोलणी अंतिम टप्प्यात आहेत. राज्य सरकारने विमानतळांवर व्यवस्था करण्याकरिता ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे सोलापूर विमानतळावर लवकरच नाईट लँडिंगची सोय करण्यात येईल. त्याचबरोबर सोलापूरच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर करण्याचा निर्णयही राज्य सरकारने घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पालकमंत्री जयकुमार गोरे



यांचाही उल्लेख करत सोलापूरच्या उड्डाणपूलासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.आमदार देवेंद्र कोठे यांनी राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात झालेल्या विविध निधीच्या तरतुदींमध्ये सोलापूरचा उल्लेख नसल्याबद्दल सांगत सोलापूरला निधी देण्याची मागणी केली होती. आमदार देवेंद्र कोठे यांच्या या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या निधीबाबत केलेल्या तरतुदीची माहिती दिली. आमदार देवेंद्र कोठे यांचा विशेष उल्लेख करत सोलापूरकडे आपले विशेष लक्ष आहे हे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून नमूद केले.

### इराणच्या हल्ल्याने अमेरिकेची दाणादाण

**दुबई** : अणुविकास कार्यक्रमावर प्रतिबंध घालण्याच्या उद्देशाने इराणवर करार करण्यासाठी दबाव आणला गेला. कराराच्या अटी अमान्य केल्याने इराणवर अमेरिका- इस्रायलने संयुक्त कारवाई सुरू केली.

लष्करी क्षमतेच्या बळावर काही दिवसात इराणला गुडघे टेकविण्यास भाग पाडू, असा अमेरिकेला विश्वास होता. मात्र इराणच्या प्रतिकार करण्याच्या क्षमतेने बलाढ्य अशा अमेरिकन सैन्यदलाची दाणादाण होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. इराणने अमेरिकेचे लष्करी,हवाई तळांवर केलेल्या हल्ल्यात कुवेत व सौदी अरबमध्ये तैनात सात सैनिक मारले तर १४० जखमी झाल्याची माहिती समोर आली.

# राज्याची आर्थिक स्थिती भक्कम

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन ● विरोधकांकडून जनतेची दिशाभूल

◆ **मुंबई, ११ मार्च**

आकडेवारी एकतर्फी मांडून राज्याच्या अर्थव्यवस्थेबाबत चुकीचे चित्र निर्माण केले जात असून, राज्याची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचा दावा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. असल्याचे त्यांनी विधानसभेत सांगितले. राज्यातील कर्जवाढीवरून विरोधकांकडून होत असलेल्या टीकेला मुख्यमंत्र्यांनी जोरदार पलटवार केला.

अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, २०१३-१४ मध्ये राज्याचे सकल राज्य उत्पन्न सुमारे १६ लाख कोटी रुपये होते, तर त्यावेळी राज्यावर सुमारे ३ लाख कोटी रुपयांचे कर्ज होते. सध्या राज्याचे सकल राज्य उत्पन्न ५१ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले असून कर्ज ९.३२ लाख कोटी रुपये आहे. त्यामुळे केवळ कर्जवाढीचा आकडा सांगणे आणि उत्पन्नातील मोठी वाढ दुर्लक्षित करणे योग्य नाही.

आर्थिक स्थितीचे महत्त्वाचे परिमाण असलेल्या कर्ज-उत्पन्न गुणोत्तराबाबतही त्यांनी माहिती दिली. महाराष्ट्राचा कर्ज-उत्पन्न गुणोत्तर सध्या सुमारे १८ टक्के असून तो देशातील मोठ्या राज्यांमध्ये अत्यंत चांगला मानला जातो. तुलनेत मध्यप्रदेशमध्ये सुमारे ३० टक्के, राजस्थानमध्ये ३६.८ टक्के, पंजाब मध्ये ४६ टक्के आणि पश्चिम बंगालमध्ये ३८ टक्के इतका हा अनुपात आहे. तर आर्थिकदृष्ट्या मजबूत मानल्या जाणाऱ्या तेलंगणामध्ये २३.८ टक्के, कर्नाटकमध्ये २३ टक्के आणि तामिळनाडूमध्ये २५.६ टक्के इतका हा अनुपात असल्याचे त्यांनी सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)

### पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होणार

फडणवीस म्हणाले की, सध्या आपली अर्थव्यवस्था ६६० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली आहे. ५ ट्रिलियन डॉलरचे लक्ष्य गाठण्यासाठी अजून सुमारे ३४० अब्ज डॉलरची वाढ आवश्यक आहे. गेल्या वर्षातील आर्थिक वाढ लक्षात घेतली तर हे लक्ष्य साध्य करणे अशक्य नाही. कोविड काळानंतरचा आपला साधारण ग्रोथ बघितला तर तो १४ टक्के होता. त्याच वेगानं गेलो तरी २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था सहज होऊ शकते.


# अल निनोचा यंदा मान्सूनवर परिणाम

### जागतिक हवामान संघटनेचा अंदाज, वर्षाच्या उत्तरार्धात होणार सक्रिय

◆ **नवी दिल्ली , ११ मार्च**

वर्षाच्या उत्तरार्धात अर्थात् जून-जुलैमध्ये अल निनो सक्रिय होण्याची शक्यता असून, याचा नकारात्मक परिणाम भारतीय मान्सूनवर होवू शकतो, असे जागतिक हवामान संघटनेच्या ताज्या अहवालात म्हटले आहे. सध्या त्याची सक्रियता दिसून येत नसली तरी मे महिन्यानंतर चित्र स्पष्ट होईल, असेही अहवालात म्हटले आहे.

मान्सूनच नव्हे, तर मार्च ते मे या काळात जगभरातील तापमानात सरासरीपेक्षा मोठी वाढ होण्याचे संकेतही जागतिक हवामान संघटनेने दिले आहेत. भारतात याचे परिणाम आतापासूनच दिसू लागले असून, देशाच्या अनेक भागांत उष्णतेच्या लाटेने नागरिक होरपळून निघत



आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील तीन दिवसांत जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशमध्ये दिवसाचे तापमान सरासरीपेक्षा ५ ते ७ अंश सेल्सिअसने जास्त राहू शकते. तसेच दिल्ली-एनसीआरसह उत्तर-पश्चिम भारतातील मैदानी भाग, गुजरात आणि मध्य प्रदेशात ४ ते ६ अंश सेल्सिअसने जास्त तापमान नोंदवले जाण्याची शक्यता आहे. अल निनोच्या संदर्भात भारतीय हवामान विभागाने अधिकृत पुष्टी केलेली नाही.

**भाकीत करणे घाईचे ठरेल**

हवामान तज्ज्ञांच्या मते, सध्या अल निनोबद्दल भाकीत करणे घाईचे ठरेल. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे माजी सचिव माधवन राजीवन यांनी सांगितले की,मान्सूनच्या उत्तरार्धात अल निनो मध्यम स्वरूपात सक्रिय होऊ शकतो. मात्र, सध्याच्या अंदाजांमध्ये बरीच अनिश्चितता आहे. जून महिन्यापर्यंत याची स्पष्ट कल्पना येईल. त्यामुळे सध्या घाबरून न जाता परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे. ◀(वृत्तसंस्था)

### विदर्भ, कोकणात उष्णतेची लाट

**भारतीय हवामान विभागाच्या कुलाबा प्रादेशिक केंद्राने विदर्भ, कोकणात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. १२ आणि १३ मार्च रोजी पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड आणि विदर्भातील अकोला, वाशिम, बुलढाणा, वर्धा जिल्ह्यात तापमान उच्चांक गाठणार आहे. त्यामुळे नागरिकांना खबरदारी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे**


# सुरुंग पेरणाऱ्या इराणच्या १६ नौका उद्ध्वस्त

### अमेरिकेचा दावा

◆ **दुबई, ११ मार्च**

इराणने परिसरातील तेल निर्यात रोखण्याची धमकी दिल्याने तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तेलाचे टँकरची वाहतूक रोखण्याची धमकी दिल्यानंतर या देशाच्या कित्येक नौका परिसरातून हटवण्यात आल्या, अशी माहिती अमेरिकेने दिली. सुरुंग पेरणाऱ्या इराणच्या १६ नौका नष्ट केल्याचा दावा अमेरिकेने केला आहे.

दुसरीकडे, इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीत स्फोटके पेरल्याचे कोणतेही वृत्त नाही, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे. समुद्रात सुरुंग पेरण्याविरुद्ध ट्रम्प यांनी इराणला इशारा दिल्यानंतर अमेरिकी सैन्याने काही नौकांच्या अवर्गीकृत फुटेजसह हा आकडा



प्रसिद्ध केला.

युद्धाने आता अकराव्या दिवसात प्रवेश केला असून, दोन्ही बाजूंकडून वेगवेगळी वक्तव्ये येत आहेत. समुद्रात टाकलेले सुरुंग मोकळे केले नाही, तर इराणवर अभूतपूर्ण हल्ला केला जाईल, अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे.

आतापर्यंतचा सर्वांत भीषण हल्ला केला जाईल, अशी धमकी अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी दिली. तर पेंटॅगॉनने युद्धात जखमी झालेल्या अमेरिकी सैनिकांची तपशीलवार माहिती दिली. या संघर्षाचे परिणाम मध्यपूर्व आणि त्यापलीकडेही जाणवत आहेत. इराणी नेत्यांनी चर्चेसाठी नकार देत ट्रम्प यांना धमकावले आणि इस्रायल तसेच अरब देशांवर नवीन हल्ले सुरू केले आहेत. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# सारे भेदभाव संपुष्टात यावेत...

१९३७ च्या शरीयत कायद्यातील तरतुदी या मुस्लिम महिलांसोबत भेदभाव करणाऱ्या असल्याचे सांगून, त्या रद्द कराव्या यासाठी दाखल याचिकेवर सुनावणी करताना, आता समान नागरी कायदा लागू करण्याची योग्य वेळ आली आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशात, जिथे लग्न, घटस्फोट, वारसाहक्क आणि दत्तक विधान यासारखे विषय धर्माधारित 'पर्सनल लॉ'नुसार चालतात, तिथे 'एक देश, एक कायदा' ही संकल्पना या निर्देशामुळे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. समान नागरी कायदा लागू करण्यासंदर्भात संसदेने लक्ष द्यावे, असेही न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे आता चेंडू कायदेमंडळाच्या 'कोर्टा'त पोहोचला आहे.

सर्व नागरिकांसाठी समान न्याय असावा याबाबत मतभेद असण्याचे काही कारण नाही. मात्र, तसा कायदा करताना सामाजिक, सांस्कृतिक रीतिभातींसह चांगल्या परंपरांचा विचार होणेही गरजेचे आहे. विद्यमान सरकार हाच भाव ठेवून समान नागरी कायदा अर्थात 'यूसीसी' आणण्याचा विचार करीत आहे. शाळेतील विद्यार्थी ठरावीक गणवेश घालतात. त्यामुळे ते एकसारखे भासतात. त्यांच्यात गरिबी-श्रीमंतीचा भेद दिसत नाही. सर्व विद्यार्थ्यांना एकसारखे बनविणे हा त्यामागचा उद्देश नसतो. प्रत्येक विद्यार्थी आपले वेगळेपण राखूनही समूहात एकरूप होतो. समान नागरी कायद्याचा उद्देश असाच काहीसा आहे.

सध्या भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आणि पारशी समुदायांसाठी वेगवेगळे कायदे आहेत. सध्या न्यायालयात दाखल होणाऱ्या याचिका बघता, देशातील सर्व नागरिकांसाठी, मग त्यांचा धर्म, जात किंवा पंथ कोणताही असो, विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, पोटगी आणि दत्तक प्रक्रिया यासाठी समान कायदा असावा, अशी चर्चा हाणे स्वाभाविक आहे. १८३५ मध्ये सर्वांत आधी या कायद्याबाबत विचार झाला होता. मात्र, आधीच हात पोळले असल्याने ब्रिटिशांनी तेव्हा धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण अवलंबिले. स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, समान नागरी कायद्याचा जोरदार पुरस्कार केला. पण तत्कालीन परिस्थिती पाहता आणि मुस्लिम समुदायाचा विरोध लक्षात घेऊन, हा विषय कलम ४४ अंतर्गत 'मार्गदर्शक तत्त्वांमध्ये' समाविष्ट करण्यात आला. याचा दुसरा अर्थ, भविष्यात अनुकूल वेळ आल्यावर सरकारने हा कायदा लागू करावा, असा होता. जगातल्या बहुतांश विकसित देशांत समान नागरी कायदा आहे. जर्मनी, फ्रान्स या देशात हा कायदा राबविला जातो. अमेरिकेत थोड्या वेगळ्या अर्थाने तो लागू आहे. पोर्तुगाल, रशिया, चीन आदींमध्येही तो स्वीकारला गेला आहे.

भारतात समान नागरी कायद्याची मागणी केवळ राजकीय नसून, ती मानवाधिकार आणि महिलांच्या हक्कांशीही जोडली आहे. ७३ वर्षीय शहाबानो यांना त्यांच्या पतीने घटस्फोट दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना पोटगी देण्याचा आदेश दिला. मात्र, कट्टरपंथीयांच्या दबावाखाली तत्कालीन सरकारने कायदा बदलून न्यायालयाचा निर्णय फिरवला. ही १९८५ मधील घटना स्मरणात ठेवली पाहिजे. त्यानंतरच्या काही खटल्यांतही न्यायालयांनी समान नागरी कायद्याचा विचार व्हावा, असे सुतोवाच केले होते. मात्र, पुढे २१ वा विधि आयोग आला. या आयोगाचे अध्यक्ष न्या. बलबीर सिंह चौहान होते. या आयोगाने, सध्या हा कायदा लागू करणे घाईचे होईल, असे मत त्यावेळी मांडले. त्याचा आधार या कायद्याचे विरोधक आजही घेतात. मात्र, याच आयोगाने, धर्मांच्या 'पर्सनल लॉ'मधल्या अनिष्ट प्रथा दूर करण्याची शिफारस केली होती. बहुपत्नीत्व रद्द करणे आणि निकाहनाम्यात बदलाच्या तरतुदी सांगितल्या होत्या, याकडे हे ऊरबडवे दुर्लक्ष करतात.

भारतात केवळ गोवा हे असे राज्य आहे, जिथे पोर्तुगीज काळापासून समान नागरी कायदा अस्तित्वात आहे. कारण तेव्हा हा कायदा पोर्तुगालमध्ये आला होता आणि गोवा त्यांच्याकडे असल्याने तो तेथेही तसाच लागू झाला. नंतरच्या काळात पोर्तुगालमध्ये थोडाफार बदल करून नवा कायदा आला. मात्र, १९६१ मध्ये गोवा मुक्त झाल्यानंतरही तेथे १८६७ चाच कायदा आजतागायत कायम आहे. हिंदू, मुस्लिम किंवा ख्रिश्चन या सर्वांना तिकडे या एकाच कायद्याने बांधले आहे. गोव्यात लग्नाची अधिकृत नोंदणी अनिवार्य आहे. घटस्फोटाचे नियम सर्वांसाठी सारखे आहेत. संपत्तीत पती-पत्नीचा वाटा समान आहे आणि पालकांच्या मालमत्तेत मुला-मुलींनाही समान हक्क मिळतो. तेथे मुस्लिम पुरुषाला बहुपत्नीत्वाची परवानगी नाही, जे देशाच्या इतर भागात शरीयत कायद्यानुसार शक्य आहे. गोव्याचा हा कायदा प्रगतिशील मानला जात असला, तरी त्यात एक जुनी आणि वादग्रस्त तरतूद आहे. ती आहे विशिष्ट काळात पत्नीला अपत्य न झाल्यास दुसरे लग्न करण्याची काही समुदायांतील पुरुषांना असलेली मुभा. प्रत्यक्षात आता तसे घडत नसले, तरी समान नागरी कायदा लागू करताना अशा विसंगती दूर करण्याचे आव्हान भारत सरकारसमोर असणार आहे. अलिकडेच उत्तराखंडातही स्वतःचा समान नागरी कायदा पारित झाला आहे. यात 'लिव्ह-इन रिलेशनशिप'ची नोंदणी अनिवार्य करण्यासारख्या नवीन तरतुदी आहेत. तशी नोंदणी केली नाही, तर ३ ते ६ महिन्यांपर्यंतचा कारावास होऊ शकतो. ही बाब वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा आहे की, सामाजिक सुरक्षेसाठी उचललेले पाऊल यावर सध्या कायदेतज्ज्ञांमध्ये जुंपली आहे. गुजरात आणि आसाम राज्यांनीही समान नागरी कायदा लागू करण्यासाठी समित्या स्थापन केल्या आहेत. अनेक मुस्लिम देशांनी देखील त्यांचे कायदे काळानुसार बदलले आहेत. तुर्कीने १९२६ मध्येच पूर्णपणे धर्मनिरपेक्ष नागरी कायदा स्वीकारला. ट्युनिशियात बहुपत्नीत्वावर बंदी आहे. इजिप्त आणि जॉर्डन येथेही घटस्फोट आणि वारसाहक्काच्या कायद्यात मोठ्या सुधारणा झाल्या आहेत. भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशात प्रश्न वेगळे आहेत हे खरे. उदाहरणार्थ- भारताच्या ईशान्येकडील काही राज्यांमध्ये काही सांस्कृतिक परंपरा आहेत. संविधानाच्या तरतुदीनुसार त्यांना संरक्षण आहे. 'यूसीसी' लागू झाला, तर त्यांच्या प्रथांचे काय, असा प्रश्न पुढे येणार आहे. याच कारणामुळे उत्तराखंडने आपल्या कायद्यातून 'शेड्युल्ड ट्राईब्स'ना वगळले आहे.

आपण सध्या ज्या वळणावर आहोत, तेथे चार पर्याय उरतात. पहिला- सर्वांचे वेगवेगळे कायदे जसे सुरू आहेत तसेच सुरू ठेवावेत. दुसरा- सर्वांचे कायदे वेगवेगळेच असावेत पण त्यातील भेदभाव करणाऱ्या तरतुदींमध्ये सुधारणा व्हावी. तिसरा पर्याय असा की- समान नागरी कायदा लागू करावा पण त्यातही धर्मांना त्यांच्या सांस्कृतिक परंपरांना काही सूट द्यावी आणि चौथा व शेवटचा पर्याय म्हणजे, सर्व भारतीय नागरिकांसाठी पूर्णपणे समान असलेला नागरी कायदा लागू करावा. हा चौथा पर्यायच सर्वांत आवश्यक आहे. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, आता ती वेळ आली आहे. जुना शरीयत कायदा असो वा तत्सम कायदे, ते कालबाह्य ठरत असताना त्यात सुधारणा होणे आवश्यकच असते. केवळ धर्माच्या आधारावर महिलांना वारसाहक्क वा पोटगी नाकारणे, हे आधुनिक लोकशाहीत भेदभाव करणारे ठरेल. हा कायदा कुठल्याही एका धर्माच्या विरोधात नव्हे, तर सर्व धर्मांतील अनिष्ट प्रथा दूर करणारा असावा. आदिवासी समुदायांच्या विशिष्ट परंपरांना संरक्षण देण्याबाबतची स्पष्टता त्यात हवी. मानवी हक्क आणि स्त्री-पुरुष समानता या दृष्टिकोनातून तरतुदी असाव्यात. विविध परंपरांमधील चांगल्या गोष्टी कायम ठेवून, कालानुरूप वाईट प्रथांचे निर्मूलन करीत एक उत्तम कायदा भारतवर्षासाठी केला जाऊ शकतो. कुठल्याही चांगल्या गोष्टीला सुरुवातीस विरोध होतोच. कालांतराने तो शमतो. त्यामुळे नागरिकांमधील तसेच स्त्री-पुरुषांमधील पारंपरिक व अनिष्ट स्वरूपाचे भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी सध्याची वेळ इष्ट ठरू शकते. तसे संकेत न्यायालयाने दिले आहेत. त्याचे स्वागतच केले पाहिजे.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# ज्येष्ठ नागरिकाच्या नावावर एफडी, पण पैसा मुलाचा; कर कोण भरतो?

निवृत्त नागरिक आणि त्यांच्या कुटुंबांनी समजून घ्याव्या, अशा महत्त्वाच्या कर बाबींबद्दल भारतातील अनेक कुटुंबांत सर्वसामान्य पद्धत दिसून येते. मुदत ठेव (एफडी) आई-वडिलांच्या म्हणजे ज्येष्ठ नागरिकांच्या नावावर केली जाते, परंतु प्रत्यक्षात त्या रकमेचा स्रोत मुलगा किंवा मुलगी असते. काही वेळा एफडी संयुक्त नावाने केली जाते. बाहेरून पाहता ही केवळ कौटुंबिक सोय वाटते, परंतु करदृष्ट्या हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, एफडीवरील व्याजावर आयकर नेमका कोण भरतो?

**कराचा मूलभूत सिद्धांत - 'पैसा कोणाचा?'**

आयकर कायद्यानुसार कराची जबाबदारी एफडी कोणाच्या नावावर आहे, यावर ठरत नाही; तर पैसा प्रत्यक्षात कोणाचा आहे, यावर ठरते. जर मुलाने स्वतःचा पैसा पालकांच्या नावावर एफडीमध्ये गुंतविला असेल, तर त्या एफडीवरील व्याज हे मुलाच्या उत्पन्नात धरले जाईल. यालाच उत्पन्नाचे एकत्रीकरण म्हणतात. म्हणजे, एखाद्या व्यक्तीने आपला पैसा दुसऱ्याच्या नावावर गुंतवला, तरी त्यातून मिळणारे उत्पन्न पैशाच्या मूळ मालकाकडेच करासाठी जोडले जाते. उदाहरणार्थ, मुलाने १० लाख रुपये आईच्या नावाने एफडीमध्ये ठेवले आणि वार्षिक ८० हजार रुपये व्याज मिळाले, तर त्या व्याजावर कर मुलालाच भरावा लागेल, आईला नाही.

**प्रथम धारक आणि दुसरा धारक करासाठी कोण महत्त्वाचा?**

बँकिंग प्रणालीत प्रथम धारक हा मुख्य धारक मानला जातो आणि टीडीएस (स्रोतावर कर कापला) साधारणपणे त्याच्याच पॅनवर कापला जातो. पण आयकरच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा वेगळा आहे रक्कम कोणी गुंतवली?

**संयुक्त एफडी असल्यास**

- पैसा वडिलांचा असेल, तर व्याजावर कर वडिलांच्या उत्पन्नात जाईल.
- पैसा मुलाचा असेल, तर क्लबिंग तरतूद लागू होऊन कर मुलाच्या उत्पन्नात जाईल. म्हणूनच टीडीएस कोणाच्या पॅनवर कापला गेला, यावर अंतिम कर जबाबदारी ठरत नाही.

**नामनिर्देशित म्हणजे मालक नाही**

अनेक ज्येष्ठ नागरिक असा समज करून घेतात की, मुलगा किंवा मुलगी नामनिर्देशित असल्यास त्यांनाच त्या एफडीची मालकी मिळते. प्रत्यक्षात नामनिर्देशित हा केवळ रक्कम स्वीकारणारा प्रतिनिधी असतो. कायदेशीर मालकी वारसदारांकडे जाते. त्यामुळे नामनिर्देशित असल्यामुळे कर जबाबदारीत कोणताही बदल होत नाही.

**ज्येष्ठ नागरिकासाठी विशेष बाब - ८० टीटीबी :** आयकर कायद्यानुसार ज्येष्ठ नागरिकाला बँक व्याजावर ५०,००० पर्यंत सूट (कलम ८० टीटीबी) मिळते; परंतु जर एफडीचा पैसा प्रत्यक्षात मुलाचा असेल आणि क्लबिंग लागू होत असेल, तर ८० टीटीबीचा लाभ ज्येष्ठ नागरिकाला मिळणार नाही. त्या परिस्थितीत व्याज मुलाच्या उत्पन्नात धरले जाईल.

**छाननी आणि एआयएस युगातील वास्तव :** आज आयकर विभागाकडे एआयएस (वार्षिक माहिती विधान) बँकिंग डेटा आणि टीडीएस माहिती उपलब्ध असते. त्यामुळे एफडीवरील व्याज लपवणे किंवा चुकीच्या नावाने दाखवणे सहज लक्षात येऊ शकते. जर ज्येष्ठ नागरिकाकडे फारसे उत्पन्न नसताना मोठ्या एफडीवर व्याज दिसत असेल, तर विभागाकडून चौकशी होऊ शकते.

**कुटुंबांनी काय काळजी घ्यावी?**

१. पैसा कोणाचा आहे, हे स्पष्ट ठेवा. कागदोपत्री पुरावा आणि बँक ट्रेल ठेवणे महत्त्वाचे आहे., २. गिफ्ट देत असल्यास गिफ्ट डीड तयार करा. मुलाने पालकांना भेट म्हणून रक्कम दिली असल्यास, योग्य गिफ्ट डीड केल्याने पुढील व्याजावर कर ज्येष्ठ नागरिकाच्या नावावर लागू होईल., ३. संयुक्त खाते केवळ सोयीसाठी असल्यास कर नियोजन करा. केवळ व्यवहार सोपा व्हावा म्हणून नाव जोडले असल्यास, कर परिणाम समजून घ्या.

**व्यवहारातील केस स्टडीज**

केस स्टडी १ - कर बचतीसाठी एफडी आईच्या नावावर

- नागपूरमधील एका कुटुंबात मुलगा आयटी क्षेत्रात नोकरी करतो आणि त्याचे वार्षिक उत्पन्न १५ लाख रुपये आहे. त्याने २० लाखांची एफडी आपल्या आईच्या नावावर ठेवली, कारण आई ज्येष्ठ नागरिक आहे आणि तिचे उत्पन्न फारसे नाही. ● एफडीवर वर्षाला १.६ लाख व्याज मिळते. कुटुंबाचा विचार असा होता: 'आईचा कर स्लॅब कमी आहे, त्यामुळे कर कमी लागेल.' परंतु आयकर कायद्यानुसार पैसा मुलाचा असल्यामुळे १.६ लाख रुपये व्याज मुलाच्या उत्पन्नात जोडले जाईल.

**केस स्टडी २** - भेट दिल्यास कर परिणाम बदलतो

- एका व्यापाऱ्याने आपल्या वडिलांना १५ लाख रुपय भेट म्हणून दिले आणि त्याचे गिफ्ट डीड तयार केले. त्या पैशातून वडिलांनी एफडी केली. एफडीवरील व्याज १.२ रुपये लाख आहे. या परिस्थितीत पैसा वडिलांचा मानला जातो. व्याजावर कर वडिलांच्या नावावर लागेल तसेच वडील ज्येष्ठ नागरिक असल्यामुळे कलम टीटीबी अंतर्गत ५०,००० रुपये वजावट मिळू शकते.

**केस स्टडी ३** - संयुक्त एफडी पण पैसा मुलाचा

- एका बँकेत एफडी खालीलप्रमाणे केली. प्रथम धारक - वडील, दुसरा धारक - मुलगा. एफडी रक्कम १२ लाख रुपये. मुलाच्या बँकेने टीडीएस वडिलांच्या पॅनवर कापला. परंतु आयकराच्या दृष्टीने पैसा मुलाचा असल्यामुळे व्याज मुलाच्या उत्पन्नात जोडले जाईल. मुलाने टीडीएस क्रेडिट वडिलांकडून फॉर्म २६एएस सामंजस्य करून घ्यावी लागते.

**नामनिर्देशित म्हणजे मालक नाही**

- एफडी करताना अनेक लोक नामनिर्देशित ठेवतात. परंतु अनेक ज्येष्ठ नागरिक असा समज करतात की, नामनिर्देशित म्हणजे त्या व्यक्तीची मालकी. कायद्याने हे चुकीचे आहे. नामनिर्देशित हा केवळ रक्कम स्वीकारणारा प्रतिनिधी असतो, अंतिम मालकी कायदेशीर वारसदारांकडे जाते. म्हणून नामनिर्देशित असल्यामुळे कर जबाबदारी बदलत नाही.

**अंतिम विचार**

एफडी कोणाच्या नावावर आहे, हे महत्त्वाचे नाही; पैसा कोणाचा आहे, हे महत्त्वाचे आहे. क्लबिंग तरतुदीमुळे अनेक कुटुंब अनावधानाने कर चुकांची जोखीम घेतात. निवृत्तीनंतर शांत आयुष्य जगताना कर विषयक अडचणी टाळण्यासाठी योग्य सल्ला, योग्य दस्तऐवजीकरण आणि पारदर्शक व्यवहार आवश्यक आहेत. कर नियोजन म्हणजे फक्त कर बचत नव्हे ती कुटुंबातील आर्थिक सुरक्षितता आणि भविष्यातील वाद टाळण्याची गुरुकिल्ली आहे.

(९०९६३३२३५३, कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# मानसिक तणावाची सावली

एका आत्महत्येने उभे केलेले अस्वस्थ करणारे प्रश्न मनाला चटका लावून गेले. या प्रश्नांवर नक्कीच गांभीर्याने चिंतन करण्याची गरज आहे. नाशिकमधील प्रसिद्ध आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. मनीषा जेजुरकर यांनी केलेल्या आत्महत्येने केवळ वैद्यकीय क्षेत्रच नव्हे, तर संपूर्ण समाज हादरून गेला आहे. समाजात प्रतिष्ठा, चांगले शिक्षण, स्थिर कुटुंब आणि यशस्वी करीअर असलेली व्यक्ती अचानक असा टोकाचा निर्णय घेते, तेव्हा केवळ एक व्यक्ती नाही तर अनेक प्रश्न आपल्या समोर उभे राहतात. विशेष म्हणजे त्यांचे पती स्वतः मनोविकार तज्ज्ञ असल्यामुळे ही घटना अधिकच अस्वस्थ करणारी ठरते. मानसिक आरोग्याबद्दल समाजाला मार्गदर्शन करणाऱ्या कुटुंबातच अशी घटना घडते, हे वास्तव आपल्या काळातील तणावाच्या गंभीरतेची जाणीव करून देते. आजच्या काळात मानसिक तणाव हा एक न बोलला जाणारा, पण प्रत्येकाच्या आयुष्यात हळूहळू वाढत चाललेला संकट बनत आहे. बाहेरून सर्व काही व्यवस्थित दिसत असले, तरी प्रत्येक माणूस आतून अनेक संघर्ष झेलत असतो. नोकरीची असुरक्षितता, वाढती स्पर्धा, आर्थिक दबाव, सामाजिक अपेक्षा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या याचा भार अनेकांना शांतपणे सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत मनात साचत जाणारा ताण कधी कधी असह्य होतो आणि माणूस टोकाचा निर्णय घेण्यापर्यंत पोहोचतो. वैद्यकीय क्षेत्रातील लोकांचे आयुष्य बाहेरून खूप स्थिर आणि प्रतिष्ठित वाटत असले, तरी वास्तव वेगळे असते. डॉक्टरांवर असलेली जबाबदारी, रुग्णांच्या अपेक्षा, सततचे कामाचे तास आणि समाजाकडून असलेला दबाव यामुळे त्यांच्यावरही मोठा मानसिक ताण असतो. अनेकदा डॉक्टर स्वतःच्या भावनांकडे आणि मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. कारण समाजाच्या नजरेत डॉक्टर म्हणजे नेहमी मजबूत, संयमी आणि समस्यांचे उत्तर देणारी व्यक्ती असते. पण शेवटी तेही माणूसच असतात. डॉ. मनीषा जेजुरकर यांच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिस तपासानंतरच वास्तव समोर येईल. परंतु या घटनेने एक गोष्ट मात्र स्पष्ट केली आहे- मानसिक तणाव हा कोणत्याही स्तरावरच्या व्यक्तीला ग्रासू शकतो.

पैसा, प्रतिष्ठा किंवा शिक्षण यापैकी कोणतीही गोष्ट मानसिक वेदना पूर्णपणे दूर करू शकत नाही. समाजात मानसिक आरोग्याबद्दल अजूनही खुली चर्चा होत नाही. अनेक लोक आपल्या समस्या मनातच दाबून ठेवतात. लोक काय म्हणतील? या भीतीमुळे मदत मागण्याचे धाडस अनेकांना होत नाही. परिणामी तणाव, नैराश्य आणि एकाकीपणा वाढत जातो. अशा वेळी कुटुंब, मित्र आणि समाज यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. एखाद्या व्यक्तीच्या वागण्यात अचानक बदल दिसू लागला, एकटेपणा वाढला किंवा निराशेची चिन्हे दिसू लागली तर त्याकडे दुर्लक्ष न करता संवाद साधणे गरजेचे आहे. आज आणखी एक चिंताजनक वास्तव समोर येत आहे. आत्महत्यांच्या घटनांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रमाणही वाढताना दिसत आहे. शिक्षणातील वाढती स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, करीअरची अनिश्चितता आणि सोशल मीडियामुळे निर्माण होणारा दबाव यामुळे अनेक तरुण मानसिक तणावाखाली जगत आहेत. आयुष्याची सुरुवातच संघर्षाने भरलेली वाटू लागली, तर काही जण निराशेच्या अंधारात हरवून जातात. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या वाढत्या घटनांनी समाजाला गंभीरपणे विचार करण्यास भाग पाडले आहे. त्याचबरोबर पुरुषांमध्येही आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याची बाब तितकीच वेदनादायक आहे. समाजाने पुरुषांना नेहमी मजबूत, कठोर आणि भावनांवर नियंत्रण ठेवणारी भूमिका दिली आहे. त्यामुळे अनेक पुरुष आपल्या वेदना, अपयश किंवा मानसिक तणाव व्यक्त करू शकत नाहीत. घराची जबाबदारी, आर्थिक ताण आणि समाजाच्या अपेक्षा यांच्या ओझ्याखाली अनेक पुरुष शांतपणे तुटत जातात. पण त्यांच्या वेदनांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. डॉ. मनीषा जेजुरकर यांच्या निधनाने एक दुःखद शोकांतिका घडली आहे; त्याच वेळी समाजाला एक मोठा धडादेखील मिळतो आहे. मानसिक आरोग्य ही केवळ वैद्यकीय संकल्पना नाही, तर ती सामाजिक जबाबदारी आहे. घराघरात संवाद वाढविणे, भावनांना मोकळेपणाने व्यक्त करण्याची सवय लावणे आणि मानसिक समस्यांकडे लाज किंवा दुर्बलतेच्या नजरेने न पाहणे ही काळाची गरज आहे. कदाचित डॉ. मनीषा जेजुरकर यांच्या आत्महत्येमागील सत्य पुढे येईल. पण त्या निमित्ताने समाजाने स्वतःला एक प्रश्न विचारणे गरजेचे आहे- आपण खरोखर एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहोत का? कारण कधी कधी एखाद्या व्यक्तीला वाचवण्यासाठी मोठ्या उपायांची गरज नसते, फक्त कोणीतरी शांतपणे त्यांचे बोलणे ऐकणारा असणे पुरेसे असते. आजच्या वेगवान आणि तणावग्रस्त जीवनात मानसिक आरोग्य हा विषय दुर्लक्षित ठेवणे आता शक्य नाही. प्रत्येक घरात, प्रत्येक कुटुंबात आणि प्रत्येक संस्थेत या विषयावर संवेदनशीलतेने विचार होणे आवश्यक आहे. अन्यथा अशा दुर्दैवी घटना पुन्हा पुन्हा आपल्याला अस्वस्थ करत राहतील.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र


**श्यामकांत जहागीरदार**

# बिहारची समीकरणे बदलणार

राज्यसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करीत बिहारचे मुख्यमंत्री आणि जदयुचे सर्वेसर्वा नितीशकुमार यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवली. कोणाच्या ध्यानीमनी नसताना बिहारचे मुख्यमंत्रिपद सोडण्याचा आणि पुन्हा एकदा राष्ट्रीय राजकारणात जाण्याच्या नितीशकुमार यांच्या अनपेक्षित निर्णयामुळे सर्वांना धक्का बसणे स्वाभाविक होते. या निर्णयाचे बिहारच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होणार असून बिहारचे राजकीय चित्र येत्या काळात बदलणार आहे.

बिहारचे मुख्यमंत्रिपद सोडण्याचा आणि राज्यसभेत जाण्याचा निर्णय नितीशकुमार यांनी घाईगर्दीत नाही तर अतिशय विचारपूर्वक घेतला आहे. या निर्णयाचा आपल्या घरावर आणि पक्षावर कोणता परिणाम होईल, याचा पूर्ण विचार करून नितीशकुमार यांनी अतिशय शांतपणे हा निर्णय घेतला आहे. एकदा मिळालेले मुख्यमंत्रिपद सोडायची कोणाची तयारी नसते. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी तर तुरुंगात सहा महिने जावे लागल्यानंतरही मुख्यमंत्रिपद सोडले नव्हते. मुख्यमंत्रिपदाचा बाडबिस्तर घेऊन तुरुंगात गेलेले केजरीवाल हे बहुधा देशातील पहिले मुख्यमंत्री असावे.

नितीशकुमार जवळपास २० वर्षांपासून बिहारचे मुख्यमंत्रिपद सांभाळत आहेत. मुख्यमंत्रिपदाची सर्वाधिक म्हणजे १० वेळा शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. २००५ पासून बिहारचे राजकारण नितीशकुमार यांच्याभोवती फिरते आहे. राज्यात कोणत्याही आघाडीचे सरकार आले तरी मुख्यमंत्री नितीशकुमारच असतात. गेल्या २० वर्षांपासून नितीशकुमारांना वगळून बिहारच्या राजकारणाचा विचार करता येत नव्हता. राज्यात भाजपा आणि जदयु आघाडीचे सरकार असले तरी मुख्यमंत्री नितीशकुमार असतात तसेच राजद, काँग्रेस आणि जदयु आघाडीचे सरकार आले तरी मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्याकडेच असते. अनेक वेळा नितीशकुमार यांनी भाजपाची साथ सोडत राजदचा कंदील हातात पकडला तर अनेक वेळा कंदिलाची वात विझवत कमळ हातात घेतले. पण नितीशकुमार यांच्या व्यक्तिगत प्रतिमेवर त्यांच्या या कोलांटउडीच्या राजकारणाचा फारसा परिणाम झाला नाही, त्यांची प्रतिमा डागाळली नाही, आयाराम गयाराम म्हणून त्यांची टिंगलटवाळी झाली नाही. अनेक वेळा तर समोरच्या पक्षापेक्षा नितीशकुमार यांच्या पक्षाचे कमी आमदार असतानाही मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांना मिळाले. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपद ठेवणे ही बिहारमधील राजकीय पक्षांची अपरिहार्यता होती.



सामान्यपणे कोणताही नेता विधानसभेची निवडणूक जिंकत मुख्यमंत्री होत असतो. पण विधानसभेत निवडून येत नितीशकुमार कधीच बिहारचे मुख्यमंत्री झाले नाहीत. एक अपवाद वगळता नितीशकुमार यांनी कधीच विधानसभेची निवडणूक लढवली नाही. विधान परिषदेचे सदस्य म्हणूनच त्यांनी जवळपास २० वर्षे मुख्यमंत्रिपद सांभाळले, हाही एकप्रकारचा विक्रम म्हटला पाहिजे. आपण विधानसभेची निवडणूक का लढत नाही, याचे कारण त्यांनी कधीच सांगितले नाही. बिहारच्या राजकारणात नितीशकुमार यांची लोकप्रियता चांगली होती, तरीही त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवण्याची हिंमत केली नाही.

नितीशकुमार यांना बाजूला ठेवून वा वगळून बिहारच्या राजकारणाचा विचारही कोणाला करता येत नव्हता. बिहारच्या राजकारणाचा केंद्रबिंदू आतापर्यंत तरी नितीशकुमारच होते. प्रदीर्घ काळ बिहारच्या राजकारणात असतानाही नितीशकुमार यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला नाही तसेच घराणेशाहीच्या राजकारणाचा डाग त्यांनी आपल्या अंगाला लागू दिला नाही. ही त्यांची जमेची बाजू म्हणावी लागेल. त्यांचे प्रतिस्पर्धी नेते लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबांतील अर्धा डझन सदस्य राजकारणात असताना नितीशकुमार यांनी आपल्या एकुलत्या एक मुलाला आतापर्यंत राजकारणात येऊ दिले नाही.

बिहारच्या राजकारणात येण्यापूर्वी नितीशकुमार राष्ट्रीय राजकारणात होते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वेमंत्रिपद भूषविले होते. त्यामुळे त्यांच्यासाठी राष्ट्रीय राजकारणही काही नव्हाळ्याची गोष्ट नाही. नितीशकुमार यांना पंतप्रधानपदाची स्वप्ने पडलीच नाहीत असे नाही. २०१४ च्या आधी विरोधी पक्षांची मोट बांधण्याचा अयशस्वी प्रयत्न त्यांनी करून पाहिला. विरोधी आघाडीचे पंतप्रधानपदाचे उमेदवार आपण होऊ शकत नाही, हे लक्षात आल्यानंतर त्यांनी हा नाद सोडून दिला आणि भाजपा तसेच नरेंद्र मोदींशी जुळवून घेतले. त्याचा त्यांना नंतरच्या राजकारणात फायदाही झाला.

राजकारणात योग्यवेळी योग्य निर्णय घेण्याची कला बिहारमधील नेत्यांना साधली आहे, असे म्हणावे लागेल. रामविलास पासवान यांच्यानंतर नितीशकुमार यात वाकबगार झाले होते, असे म्हणायला हरकत नाही. केंद्रीय मंत्री आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे नेते रामदास आठवलेही यात बसतात.

विधिमंडळाच्या विधानसभा तसेच विधानपरिषद या दोन्ही सभागृहाचे सदस्यपद आपण भूषविले, अनेक कार्यकाळ लोकसभेचे सदस्यही होतो; मात्र आतापर्यंत कधीच राज्यसभेचे सदस्य नव्हतो. ती आपली अपूर्ण इच्छा पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्रिपद सोडत राज्यसभेत आपण जात असल्याचे नितीशकुमार सांगत असले, तरी त्यावर विश्वास बसत नाही. बिहारच्या राजकारणातून बाहेर पडण्याची घोषणा नितीशकुमार यांनी केल्यानंतर त्यांचा मुलगा निशांतकुमार याने औपचारिकपणे जदयुत प्रवेश केला. याचा अर्थ निशांतकुमार अधिकृतपणे नितीशकुमार यांचे राजकीय उत्तराधिकारी झाले आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जदयुची धुरा निशांतकुमारकडे सोपवत नितीशकुमार यांनी राज्यसभेचा वानप्रस्थाश्रम स्वीकारला, असे म्हणायला हरकत नाही. बिहारमध्ये विशेषतः जदयुत नितीशकुमार यांचे युग संपत निशांतकुमार यांचे पर्व सुरू होत आहे.

नितीशकुमार राज्यसभेत जाण्याच्या निर्णयाचा सर्वांत मोठा फायदा भाजपाला होणार आहे. उत्तर भारतातील बिहार हे एकमेव असे राज्य होते, ज्याठिकाणी भाजपाचा मुख्यमंत्री कधी झाला नाही. भाजपाला बिहारमध्ये उपमुख्यमंत्रिपदावरच समाधान मानावे लागत होते. नितीशकुमार यांनी बिहार सोडल्यामुळे राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. एप्रिल महिन्यात नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री शपथ घेणार आहे. भाजपाने मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार अद्याप जाहीर केला नसला, तरी जो कोणी बिहारचा मुख्यमंत्री होईल, त्याच्या मंत्रिमंडळात निशांतकुमार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून समावेश होऊ शकतो.

आतापर्यंत जदयु नेत्याच्या म्हणजे नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळात भाजपाचा उपमुख्यमंत्री राहात होता; आता भाजपा नेत्याच्या मंत्रिमंडळात जदयुचा नेता म्हणजे नितीशकुमार यांचा मुलगा निशांतकुमार उपमुख्यमंत्री होणार आहे. आपल्या मुलाला म्हणजे निशांतकुमारला राजकारणात आणण्यासाठी आणि प्रस्थापित करण्यासाठी नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत बिहार सोडण्याचा आणि राज्यसभेत जाण्याचा निर्णय घेतला, असे म्हणायला हरकत नाही. नितीशकुमार यांच्या या दूरदर्शी राजकीय निर्णयाचा राज्यातील भाजपा, जदयु आणि राजदवर दूरगामी परिणाम होणार आहे. राज्यातील राजकीय समीकरणे बदलणार आहेत, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### करमणुकीसंबंधी सदर सुरू व्हावे

आपलं पुणे आवृत्ती खूपच माहितीपूर्ण व वाचनीय आहेच. हळूहळू वेगवेगळ्या साहित्य प्रकारांची मेजवानी मिळेलच याची खात्री आहे. तसेच आजची करमणूक हे सदर सुरू करून त्यात पुण्यातील प्रत्येक नाट्यगृहात कोणती नाटके वा करमणुकीचे कार्यक्रम आहेत याची माहिती द्यावी म्हणजे आमच्यासारख्या अनेक ज्येष्ठ नागरिकांना नियोजन करणे सोईचे होईल.

**किशोर आपटे**/पुणे

### वाढते सामाजिक तणाव आणि राष्ट्रीय एकात्मतेची परीक्षा

संपूर्ण विश्व आज मंथनात आहे. उद्याची सकाळ कशी असेल याच चिंतेत प्रत्येक जण झोपी जातो. काही नागरिकांच्या मनात देशाची सामाजिक व वैचारिक एकजूट कमी होत चालली आहे का, असा प्रश्न निर्माण होत आहे. बदलती धोरणे, वाढते सामाजिक ताणतणाव आणि सार्वजनिक चर्चेमधील ध्रुवीकरण यामुळे ही भावना अधिक तीव्र होत आहे.

निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर विविध राज्यांमध्ये मोफत वीज, रोख अनुदाने, कर्जमाफी किंवा इतर आर्थिक सवलती जाहीर केल्या जातात. या योजनांमुळे तात्कालिक दिलासा मिळतो; मात्र दीर्घकालीन आर्थिक बळकटी आणि राष्ट्रहिताचे प्राधान्यक्रम यांचा पुरेसा विचार होतो आहे का, असा प्रश्न काही अर्थतज्ज्ञ उपस्थित करतात. मतांच्या राजकारणात दीर्घकालीन राष्ट्रहित दुय्यम ठरू नये, ही अपेक्षा आहे. सामाजिक माध्यमांवरील वाढते ध्रुवीकरणही चिंतेचा विषय ठरत आहे. संवेदनशील घटनांना तत्काळ धार्मिक किंवा जातीय रंग दिला जातो. अपुरी माहिती, अफवा आणि आक्षेपार्ह भाष्य यामुळे समाजाची दिशाभूल होते. अशा वेळी संयमी नेतृत्व, जबाबदार माध्यमे आणि जागरूक नागरिकत्व आवश्यक ठरते. लोकसंख्यावाढ, सामाजिक समतोल आणि राष्ट्रीय ओळख या विषयांवरही विविध मतप्रवाह आहेत. काही राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणाबाबत धोरणात्मक पावले सुचवली आहेत, तर काही जण शिक्षण आणि जनजागृतीला अधिक प्रभावी उपाय मानतात. या चर्चांमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे.

काही समाजघटकांमध्ये धार्मिक ओळखीविषयी तीव्र बांधिलकी दिसून येते. विविध विचारप्रवाह असणे ही लोकशाहीची ताकद असली, तरी ते राष्ट्रीय एकात्मतेच्या चौकटीत राहून व्यक्त होणे गरजेचे आहे. देशाच्या अखंडतेविषयी शासनाने स्पष्ट भूमिका घेणे आवश्यक असले, तरी केवळ शासनाकडून अपेक्षा ठेवून चालणार नाही. इतिहास साक्षी आहे की समाज सजग आणि संघटित राहिला तरच मोठे परिवर्तन घडते. स्वातंत्र्यलढ्यात विविध विचारांचे लोक एका ध्येयासाठी एकत्र आले आणि राष्ट्रनिर्मितीला बळ मिळाले. आजही देशाच्या अखंडतेसाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवणे, कायद्याचा सन्मान करणे आणि राष्ट्रीय हित सर्वोच्च मानणे आवश्यक आहे. समाज संघटित, सजग आणि मूल्याधिष्ठित झाला, तरच राष्ट्रीय एकात्मता दृढ होईल कारण कलियुगात 'संघे शक्ती' हेच राष्ट्रबांधणीचे प्रभावी सूत्र आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

### मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवा

कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि बिहार सरकारने १६ वर्षांखालील सर्व मुलांना सोशल मीडिया वापरण्यास बंदी घातली आहे. कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि बिहार सरकारने घेतलेला हा निर्णय सर्वार्थाने योग्य असून महाराष्ट्र सरकारनेही लहान मुलांचा स्क्रीन टाईम कमी करण्यासाठी पावलं उचलायचं ठरवलं आहे असे वाचण्यात आले. सरकारने याबाबत आणखी उशीर न करता या संदर्भातील अध्यादेश याच अधिवेशनात काढावा. आपल्या देशात लहान मुलांना सोशल मीडिया वापरण्यास परवानगी असल्याने शाळकरी मुले सर्रास त्याचा वापर करत आहेत. काही मुले तर सोशल मीडियाच्या अगदी आहारी गेले आहेत. सोशल मीडियाने शाळकरी मुलांचे बालपणच हिरावून घेतले आहे. एका अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की १० ते १६ वयोगटातील १० पैकी ७ मुलांवर सोशल मीडियाचा दुष्परिणाम होत आहे. सोशल मीडियामुळे लहान मुलांना खाण्यापिण्याच्या चुकीचा सवयी लागतात आणि ते महिलांचा तिरस्कार करतात तसेच आत्महत्येसारखे नकारात्मक विचार त्यांच्या मनात येतात. सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने या मुलांचे अभ्यासातही लक्ष लागत नाही शिवाय त्यांच्यामध्ये अनेक शारीरिक व्याधी निर्माण होत आहेत. या सर्व गोष्टींपासून मुलांना वाचवायचे असेल आणि त्यांचे बालपण टिकवायचे असेल तर या वयोगटातील मुलांना सोशल मीडियाच्या वापरापासून रोखलेच पाहिजे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# श्रीराम राज्यासाठी कटीबद्ध होऊया; हिंदू राष्ट्र जागृती सभेत निर्धार

## निवृत्त लेफ्टनंट कर्नल मनोजकुमार सिन्हा यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मार्च-**

आयुष्यात कितीही पुण्यकर्म केले; परंतु अधर्माचा प्रतिकार केला नाही, तर पुण्याचा क्षय होतो. अधर्माचा प्रतिकार हेच मोक्षाचे माध्यम आहे. भगवान श्रीकृष्णाने भगवद्गीतेत हेच मार्गदर्शन अर्जुनाला केले होते आणि कलियुगातही भगवंताचे हेच मार्गदर्शन हिंदूंसाठी मार्गदर्शक आहे. आताच्या काळातही हिंदूंसमोर अनेक समस्या उभ्या आहेत. जागतिक पातळीपासून आता सर्वत्र युद्धजन्य स्थिती आहे. त्यामुळे हिंदूंनी धर्मरक्षणार्थ कृती करणे हाच उपाय आहे, असे आवाहन लेफ्टनंट कर्नल (निवृत्त) मनोजकुमार सिन्हा यांनी केले. ते सोलापूर येथे ११ मार्च रोजी जयभवानी प्रशालेच्या मैदानावर आयोजित हिंदू राष्ट्र-जागृती सभेत बोलत होते.




या सभेत सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरु स्वाती खाडये, तसेच हिंदु जनजागृती समितीचे सोलापूर जिल्हा समन्वयक राजन बुणगे यांनीही मार्गदर्शन केले. या सभेसाठी हजारो हिंदूंनी उपस्थिती दाखवून हिंदूंच्या संघटितपणाचा अविष्कार दाखवून दिला. सामूहिक 'वन्दे मातरम्'ने सभेची सांगता झाली! प्रारंभी शंखनादानंतर सद्गुरु स्वाती खाडये यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण केला. सूत्रसंचालन चैतन्य तागडे यांनी केले. या सभेत हिंदूंनी विविध प्रसंगांमध्ये स्वरक्षण कसे करावे याची विविध प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. हिंदु जनजागृती समितीच्या कार्याचा आढावा समितीच्या अलका व्हनमारे यांनी मांडला. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'घरच्या घरी करता येतील असे होमिओपॅथी उपचार', या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

# काँग्रेसच्या वतीने गॅस सिलेंडर दरवाढ विरोधात प्रतिकात्मक अंत्ययात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मार्च-**

सोलापूर : केंद्रातील भाजप प्रणित मोदी सरकारने केलेल्या घरगुती व व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निषेध तसेच निर्माण झालेल्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर काँग्रेस पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शहराध्यक्ष चेतन नरोटे, व जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस कार्यकर्त्यांनी तिरडीवर गॅस सिलेंडर ठेवून प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढत घोषणाबाजी केली.

आंदोलनात नगरसेवक नरसिंह आसादे, माजी स्थायी समिती सभापती बाबा मिस्त्री, सेवादल यंग ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष सुदीप चाकोते,




प्रदेश सचिव राहुल वर्धा, श्रीशैल रणदिरे, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, ब्लॉक अध्यक्ष उदयशंकर चाकोते, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, भटक्या विमुक्त अध्यक्ष युवराज जाधव, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपंडला, एनएसयुआय अध्यक्ष नागेश म्याकल, सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना, असंघटित कामगार सेल अध्यक्ष सुभाष वाघमारे, माजी नगरसेवक दत्तू अण्णा बंदपट्टे, हरुण शेख, भारती ईपलपल्ली, अंबादास गुत्तीकोंडा, रामसिंग आंबेवाले, ॲड. केशव इंगळे, दिनेश म्हेत्रे, राजन कामत, अनिल मस्के, अशोक कलशेट्टी, गिरीधर थोरात, लखन गायकवाड, शिवशंकर अंजनाळकर, संजय गायकवाड, सागर उबाळे, अय्याज आळंद, शरद गुमटे, भीमराव शिंदे, एजाज बागवान, नूरअहमद नलवार, माजी महिला अध्यक्ष सुमन जाधव, हेमा चिंचोळकर, शोभा बोबे, शुभांगी लिंगराज, ज्योती गायकवाड, पूजा चव्हाण, छाया हिरवटे, स्नेहल शिंदे, अनिता भालेराव आदी उपस्थित होते.

### हुंड्यासाठी छळ; देवगावात विवाहितेची आत्महत्या

**बार्शी, दि.११ मार्च**

तालुक्यातील देवगाव येथील महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी दि. ७ रोजी घडली होती. परंतू माझ्या मुलीने सासरच्या मंडळींनी हुंड्यासाठी छळ केल्यामुळेच आत्महत्या केली आहे, असा आरोप मृताची आईने पोलिसांना दिलेल्या जबाबात केल्यामुळे पतीसह सासू, सासरे आणि नणंदे विरुद्ध बार्शी तालुका पोलिसात सोमवारी रात्री उशिरा गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी समिना सलीम मुलाणी (रा. कुर्डुवाडी, ता. माढा) यांची मुलगी अलिशा (वय १९) हिचा विवाह देवगाव येथील दौलत अस्लम मुलाणी याच्यासोबत ४ मे २०२५ रोजी झाला होता. त्यावेळी लग्नामध्ये मानपानासह संसारोपयोगी सर्व साहित्यही दिले होते, असे फिर्यादीत नमूद केले आहे. अधिक तपास तालुका पोलीस करत आहेत.

---

**सोलापूर महानगरपालिकेच कामकाजाकरीता**
**सोलापूर महानगरपालिका**
**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची (ड) प्रकरण २ (शेडयूल चॅप्टर २)**
**मधील नियम क्रमांक १ (एच) व (आय) अन्वये)**
**कार्यपत्रिका क्र.०३**
**मार्च -२०२६**

सोलापूर महानगरपालिकेची मासिक मा.सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक २०/०३/२०२६ रोजी सकाळी ११.३० (साडे अकरा) वाजता** महानगरपालिकेच्या कै.यशवंतराव बळवंतराव चव्हाण सभागृह (कौन्सिल हॉल) येथे भरेल.

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**
**मागील सभेचा इतिवृतांत कायम करणे**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४४ अन्वये )
(**टिप:** प्रस्तावाचा सारांश देण्यात आलेला असून मूळ प्रस्ताव सर्वसाधारण सभेत वाचून दाखविण्यात येईल)

**- प्रश्नोत्तरे -**
**----------**
**- मा.आयुक्त यांचेकडून आलेली पत्रे व प्रकरणे -**

**८)** सन २०२५-२६ लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत

| अ.क्र | कामाचे नाव | पूर्वगणनपत्रक क्र. | पूर्वगणनपत्रक रक्कम | तांत्रिक मंजुरी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर उत्तर विधान सभा मतदार संघातील शेटे नगर येथे दत्ता कांबळे घर ते तळभंडारे घर येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | ८८ | ७,९९,२३८ /- | ०७/०२/२०२६ |
| २ | सोलापूर उत्तर विधान सभा मतदार संघातील शेटे नगर येथे बागेमनी घर ते बालाजी लोहार येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | ८९ | ७,९९,२३८ /- | ०७/०२/२०२६ |
| | | एकूण | १५,९८,४७६ /- | |

वर तक्त्यात नमूद कामाचे पूर्वगणनपत्रक तयार करण्यात आलेले आहे त्यास प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली असून पूर्वगणनपत्रकास मा.अतिरिक्त आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी यांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामासाठी प्रस्तावित नमूद योजनेअंतर्गत मा.शासनाकडून १००% निधी उपलब्ध होणार आहे. त्याअनुषंगाने सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडेस प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव प्रकरण पाठविणेस मा.सर्वसाधारण सभेकडे **मान्यतेस्तव** पाठविणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१८/०२/२०२६ च्या मान्यतेने आलेले प्रकरण. **(ई-२६२४०१३) PHE**

**०९)** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२५-२६ अंतर्गत सोलापूर शहर उत्तर मधील प्र.क्र.०४ येथील नीलकंठ सोसायटी सम्राट चौक येथील येखंडे घर ते सुतार घर ते मर्दा घर ते नीलकंठ बँक पर्यंत ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे र.रु १४,९६,३३८/- इतक्या रकमेचे पूर्वगणनपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास सार्व.आरोग्य अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली असून पूर्वगणनपत्रकास मा.अतिरिक्त आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी यांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.सदरचे काम हे (शासन हिस्सा-७०% व म.न.पा हिस्सा -३०%) असे निधीतून करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी ,सोलापूर यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेस्तव प्रकरण पाठविणे कामी मा.सर्वसाधारण सभेकडे **मान्यतेस्तव** पाठविणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२०/०२/२०२६ च्या मान्यतेने आलेले प्रकरण. **(ई-२६३९५९३) PHE**

**१०)** मा. संचालक तथा मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी उपरोक्त दिनांक ११/०७/२०२५ च्या पत्रान्वये जनगणना २०२७ कार्यक्रम पूर्व तयारीच्या अनुषंगाने सूचना दिल्यानुसार केंद्र शासनाने दि.०१/०३/२०२७ रोजी ००.०० वाजता लोकसंख्येची जनगणना करण्याच्या अनुषंगाने अधिसूचना प्रकाशित केली असून त्याकरीता सोलापूर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करून जनगणना २०२७ कार्यक्रमांच्या अनुषंगाने प्रत्यक्षात कार्यवाही सुरवात करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने जनगणना-२०२७ करिता सोलापूर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत सध्यस्थितीत ८ विभागीय कार्यालयांस ८ चार्ज अधिकारी यांची मा.आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी यांच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

जनगणना-२०२७ करिता सोलापूर महानगरपालिका क्षेत्रासाठी झोननिहाय प्रभाग निश्चित करणे बाबत दि.- १०/०२/२०२६ रोजीचे मा. संचालक, जनगणना कार्यालय, मुंबई, महाराष्ट्र यांचे समवेतिल व्हिडिओ कॉन्फरन्स मधील निर्देशानुसार सदर व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये काही प्रधान जनगणना अधिकारी यांनी पूर्वी कळविण्यात आलेल्या झोनमध्ये बदल होणार असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार MAH/CEN/२०२१/CIR-१, Date- १०/०२/२०२६ चे पत्र च्या पत्राने मा. संचालक यांनी ०१ जानेवारी २०२६ रोजी अस्तित्वात असलेल्या प्रभागांच्या हद्दी या जनगणना-२०२७ करिता गोठवण्यात आलेल्या असून सदर प्रभागांच्या हद्दीत बदल होणार नाही.

तसेच मा. महापौर महोदय यांनी शहरातील विविध प्रभागाच्या सन्माननीय सद्स्यानाही पूर्वीच्या झोन संरचनेमुळे विभागीय अधिकारी यांच्याशी समन्वय साधून काम करण्यास अडचणीचे ठरत असल्याचे सांगून झोन संरचना बदलण्याबाबत निर्देशित केले आहे.

सद्यस्थितीत जनगणना-२०२७ च्या कामकाजाकरिता जनगणना कार्यालयाकडून सोलापूर महानगरपालिका अंतर्गत विभागीय कार्यालयनिहाय खालीलप्रमाणे प्रभागनिहाय झोन तयार केले असून, त्यानुसार जनगणनेचे कामकाज सुरु करण्यात आले आहे. खालील तक्त्यानुसार जनगणना-२०२७ चे कामकाजाकरिता प्रभागनिहाय झोन (चार्ज ऑफिस क्षेत्र) तयार केले आहेत.

तक्ता

| अ.क्र. | विभागीय कार्यालय क्रमांक (चार्ज क्रमांक) | प्रभाग क्रमांक | एकूण प्रभाग संख्या | सन-२०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | विभागीय कार्यालय क्रमांक. १ | ४, ५, ७ | ३ | १,०४,८२३ |
| २ | विभागीय कार्यालय क्रमांक. २ | १, २, ३ | ३ | १,११,२७३ |
| ३ | विभागीय कार्यालय क्रमांक. ३ | ९, १०, ११, १२ | ४ | १,४७,१६८ |
| ४ | विभागीय कार्यालय क्रमांक. ४ | १८, १९, २१ | ३ | १,०७,३८६ |
| ५ | विभागीय कार्यालय क्रमांक .५ | २०, २४, २५, २६ | ४ | १,४०,१०७ |
| ६ | विभागीय कार्यालय क्रमांक. ६ | ६, २२, २३ | ३ | १,१९,९९७ |
| ७ | विभागीय कार्यालय क्रमांक. ७ | ८, १४, १५ | ३ | १,११,९८३ |
| ८ | विभागीय कार्यालय क्रमांक. ८ | १३, १६, १७ | ३ | १,०८,८२१ |
| | एकूण | — | २६ | ९,५१,५५८ |

जनगणना-२०२७ च्या कामकाजाकरिता जनगणना कार्यालयाकडून उपरोक्तप्रमाणे सोलापूर महागरपालिका अंतर्गत विभागीय कार्यालयनिहाय तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय झोनला (चार्ज ऑफिस क्षेत्र) कार्योत्तर मान्यतेस्तव प्रकरण पाठविणे कामी मा.सर्वसाधारण सभेकडे **मान्यतेस्तव** मा.आयुक्त यांचे दि.२७/०२/२०२६ च्या मान्यतेने आलेले प्रकरण. **(ई-२६६५६५५) GAD / CENSUS**

**११)** विभागीय कार्यालय क्र. १ चे हद्दीतील प्र. क्र.१५ मधील पंचकट्टा येथील एकनाथ मंदिर मधील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे करिता विभागीय कार्यालय क्र. १ कडे तसेच सार्वजनिक आरोग्य अभियंता मुख्य कार्यालय ड्रेनेज विभाग दोन्हींकडे देखील सन २०२५-२६ मध्ये बजेट तरतूद उपलब्ध नसलेने सदर कामाचे तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक र.रु. ३,३०,२६०/- एवढ्या रकमेची नवीन बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकरिता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव पाठविणेकामी मा. आयुक्त यांचे दि.०५/०३/२०२६ च्या मान्यतेने आलेले प्रकरण. **(ई-२६६८११८) ZONE -१**

**१२)** श्री खंडोबा मंदिर बाळे, तालुका उत्तर सोलापूर यांचे कडून सदर तीर्थ क्षेत्रास 'क' वर्ग दर्जा मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे. श्री खंडोबा मंदिर बाळे, तालुका उत्तर सोलापूर, हे सोलापूर जिल्हयातील एक अत्यंत महत्वाचे व प्राचीन धार्मिक श्रध्दास्थान आहे. सदर तीर्थ क्षेत्रास 'क' वर्ग दर्जा पर्यटन स्थळ घोषित झाल्यास पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी रु.५.०० कोटीच्या मर्यादेत प्रस्ताव पर्यटन संचालनालयामार्फत शासनाकडे प्रादेशिक पर्यटन विकास समितीपुढे सादरीकरण करता येईल. या अनुषंगाने श्री खंडोबा मंदिर देवस्थान ट्रस्ट यांनी पुढीलप्रमाणे कागदपत्रे सादर केली आहेत.
१) श्री खंडोबा मंदिर देवस्थान ट्रस्टचा दि.०५/०२/२०२६ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाचा ठराव पारित केलेले इत्तिवृत्तची प्रत प्राप्त आहे.
२) मंदिराच्या जमिनीचा नगर भूमापन क्रमांक १, बाळे क्षेत्रफळ २५४५.३० चौ.मी. चा ७/१२ ८-अ उतारा ची प्रत प्राप्त आहे.
३) मंदिराच्या मालकी हक्काचे किंवा व्यवस्थापनाचे कायदेशीर दस्ताऐवज प्राप्त झालेले आहे. श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट श्रीक्षेत्र बाळे, सोलापूर यांची सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचा नोंदणी क्रमांक : ए- २२ असा आहे.
४) भाविकांच्या उपस्थितीचे प्रमाणपत्र स्थानिक फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे दि.२४/०२/२०२६ अन्वये प्राप्त आहे.
५) मंदिराची जागा वन जमीन नसल्याचे प्रमाणपत्र , वन विभागाचे दि.२७/०२/२०२६ अन्वये पत्र प्राप्त आहे.
६)विकासकामे झाल्यानंतर त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी स्वीकारल्याचे देवस्थान ट्रस्ट/ग्रामपंचायतीचे शपथपत्र दि.२५/०२/२०२६ प्राप्त झालेले आहे.
७) श्री खंडोबा मंदिर देवस्थान यांचे मागील तीन वर्षाच्या उत्पन्न-खर्चाचा तपशील प्राप्त आहे.

शासन निर्णय क्र.टीडीसी/२०२०/१२/प्र.क्र.८१२/पर्यटन दि.१२ जुलै २०२३ मध्ये नमूद केल्यानुसार तीर्थ क्षेत्रास 'क' वर्ग दर्जा मिळणे कामी पर्यटन स्थळे घोषित करण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीस प्रदान करण्यात आले आहेत. याकामी स्थानिक प्राधिकरण म्हणून सोलापूर महानगरपालिका कडून तसा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्याचा आहे. यासाठी मा. म.न.पा. सभेचा मान्यतेचा ठराव होऊन मिळणे आवश्यक आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी श्री खंडोबा मंदिर बाळे, तालुका उत्तर सोलापूर या तीर्थ क्षेत्रास 'क' वर्ग पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यास, त्यानुसार सोलापूर महानगरपालिका कडून तसा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्यास मा. सर्वसाधारण सभेकडे **मान्यतेस्तव** पाठविणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१०/०३/२०२६ च्या मान्येतेने आलेले प्रकरण. **(ई-२६७६१९९) CE**

**- मा.सभासद प्रस्ताव -**

**१३) मा.गणेश वानकर व मा.मृण्मयी गवळी यांचा दि.०४/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव -** सोलापूर शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत देगाव, कारंबा, नाका पद्मशाली स्मशानभूमी, कुमठे, जुना पुणा नाका, या स्मशानभूमीत गॅस दाहीनी कार्यन्वीत करण्यात आली. देगाव या ठिकाणी १ कोटी ३ लाख खर्च करुन या ठिकाणी दाहीनीचे काम पूर्ण करुन स्मार्ट सिटीच्या वतीने ती दाहीनी महापालिका व भूमी मालमत्ता विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली. या स्मशानभूमीमध्ये विविध जातीतील आणि धर्मातील मयत झालेल्या व्यक्तींचे विविध स्वरुपात अंतिम संस्कार करण्यात येत असते. सध्या या स्मशानभूमीमध्ये गॅस दाहीनी बसविण्यात आलेली आहे. परंतु सदर दाहीनी का चालू करण्यात आलेली नाही तसेच सदर ठिकाणी सो.म.पा कडून सेवकांची नेमणूक करण्यात आली आहे का? मयतांचे अंतिम संस्कारासाठी आलेल्या लोकांची गैरसोय होत आहे अंतिम संस्काराच्यावेळेला होत असलेल्या गैरसोयीबाबत तसेच अनेकवेळेला कुचंबणायुक्त परिस्थिती निर्माण झाल्याने, त्यावेळी दुःखात असलेल्या मयतांचे कुटुंबियांमध्ये व नातेवाईकांमध्ये अशा गैरसोयीबाबत नाराजी व्यक्त होते. नागरीकांची होणारी अडचण दूर करण्याकरीता दोन सेवकांचे नेमणूक करुन उपरोक्त ठिकाणी राहण्याची सोय करणे आवश्यक आहे.

तरी आजला सार्वजनिक स्मशानभूमीची गॅस दाहीनी तसेच दोन सेवकांचे व त्यांच्या राहण्याची सोय करणे क्रमप्राप्त आहे. वरील नमूदनुसार देगाव कोयना वसाहत येथे सार्वजनिक स्मशानभूमी गॅस दाहीनी कार्यान्वीत करणे व तेथे दोन सेवक व त्यांच्या राहण्याची सोय करण्यासाठी व याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेकामी **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**१४) मा.गणेश वानकर व मा.मृण्मयी गवळी यांचा दि.०४/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव -** सोलापूर महानगरपालिका अंतर्गत सोलापूर शहरातील नागरिकांचे कामे तात्काळ होणे करीता विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ यांचे निर्मिती करण्यात आलेली आहे. परंतू सोलापूर शहरातील नव्याने करण्यात आलेल्या प्रभाग रचनेनुसार विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ चे प्रभागनिहाय हद्दीनुसार नव्याने निर्मिती करणे आवश्यक आहे. त्यामुळे सोलापूर शहारातील नागरिकांना सोयी सुविधा व इतर कामे करणे करीता येणेजाणे सोयीचे होणार आहे.

तरी आजला सोलापूर महानगरपालिका अंतर्गत वरील नमूदनुसार सोलापूर शहरातील नव्याने करण्यात आलेल्या प्रभाग रचनेनुसार विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ चे प्रभागनिहाय हद्दीनुसार नव्याने निर्मिती करणेस व याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेकामी **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**१५) मा.व्यंकटेश कोंडी व मा.ज्ञानेश्वर म्याकल यांचा दि.०५/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** प्र.क्र. १९, १२, १८ व M.I.D.C. येथे पूर्वी १७५ पंपाने पाणी पुरवठा होत होते, परंतू सद्यस्थितीला पाणी पुरवठा बंद असल्याने नागरिकांना पाण्याच्या मोठ्या अडचणी येत आहे. सदर ठिकाणी पाणी पुरवठा रोजी अपुरा होत असतो. त्यामुळे पाणी पुरवठा वेळे बाबत या भागातील नागरिकांना, पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पूर्वी चावीवाले पंप हाऊसच्या ठिकाणी त्यांची व्यवस्था होती परंतू त्यांच्यासाठी आजला रात्री बेरात्री पाणी येते त्यासाठी चावीवाल्यांची व्यवस्था झाली पाहीजे. त्याठिकाणी एक सेवक कायमस्वरुपी ठेवण्यात यावा. त्यामुळे नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत नाही.

तरी वरीलप्रमाणे पाणीपुरवठा समस्येचे निराकरण करण्यासाठी प्र.क्र. १९, १२, १८ व M.I.D.C. येथील बंद पडलेले पंप हाऊस स्वच्छ करून तेथे चावीवाल्यांचे केंद्र / मुख्य केंद्र तयार करण्यात यावे. तसेच सदर ठिकाणी टेलिफोनची व्यवस्था करून जेणेकरून नागरिकांना, मा. सदस्यांना पाणी पुरवठा विषयी माहिती विचारता येईल. तसेच सदर ठिकाणी ड्युटीवर उपस्थित असणाऱ्या चावीवाल्यांची हजेरी रजिस्टर ठेवण्यात यावे. तसेच वॉचमन, टेलिफोन ऑपरेटर नियुक्त करण्यात यावे व याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**१६) मा.श्रध्दा पवार व मा.प्रविण दर्गोपाटील यांचा दि.०५/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** सोलापूर महानगरपालिका अंतर्गत शहरातील हुतात्मा बागेचा भाडेतत्वावर दिलेला मक्ता रद्द करणेबाबत सभासद प्रस्ताव सादर करणेत येत आहे की, शहरातील सार्वजनिक बगीचे हे नागरिकाच्या आरोग्य व विश्रांती व मुलांना खेळण्यासाठी महत्वाची सार्वजनिक सेवा आहे परंतू काही बगीचे मक्तेदारी पद्धतीने व भाडेतत्वार देण्यात आले असून त्यामुळे नागरिकाना प्रवेश शुल्क इत्यादी स्वरुपात आर्थिक भार सहन करावा लागत आहे. सार्वजनिक बाग ही सेवा म्हणून आहे. उत्पनाचे साधन म्हणून नव्हे. यामुळे नागरिकाना मोफत व मुक्तपणे बगीचेचा वापर करता यावा. तरी स्मॉर्ट सिटी अंतर्गत बगीचेचे शुशोभिकरण झाले असताना मक्तेदारांना देण्याची काही गरज नव्हती. तरी काही अधिकारीच्या संगमताने बगीचा भाडेतत्वावर देण्यात आली. तरी शहरातील जेष्ठ नागरिक लहान मुलांना बागेपासून वंचित राहावे लागले. तरी संबंधित अधिकारी कोणालाही न विचारता टेंडर काढण्यात आले याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात यावी.

बगीचेची देखभाल महापालिका तर्फे करण्यात यावी. शहरातील बगीचे भाडेतत्वार दिले असतील ते तात्काळ व मक्ता रद्द करण्यात यावा व येणा-या अंदाजपत्रकामध्ये देखभाल दुरुस्तीमध्ये निधी उपलब्ध व्हावा. ही विनंती व याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**१७) मा.श्रध्दा पवार व मा.प्रविण दर्गोपाटील यांचा दि.०५/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** सोलापूर महानगरपालिका अंतर्गत शहरातील सार्वजनिक शौचालय प्रकल्प शहरातील काही शौचालयामध्ये कामाची निकृष्ठ गुणवत्ता अपूर्ण कामे व जास्तीचे बिले करण्यात आली आहेत. तरी सार्वजनिक निधीचा अपव्य व गैरवार झाला आहे. आपण शौचालय बांधायला र.रु. १५ हजार निधी उपलब्ध करुन देतो तरी आपण प्रधामंत्री आवास योजनेसाठी घर बांधायला २ लाख ७५ हजार रुपये देतो. अंदाजे २५० स्वे. फूटसाठी. तरी प्रशासन काळामध्ये ३१/१०/२०२५ रोजी मान्यता देण्यात आली. E- २३४८७२७ उपसमितीची शिफारस प्रकरणी प्रस्तावीक प्रमाणे मान्यता देण्यात आली. तरी १० कोटी ४४ लाख रुपये १७ हजार ३८१ रुपयामध्ये फक्त ३२६ शौचालय सिट बांधण्याचा टेंडर करण्यात आले. तरी एक शौचालयची सरासरी किंमत ३ लाख २० हजार रुपये होत आहे. तरी २ लाख ७५ हजार मध्ये २५० स्वे. फुटाचा १ BHK तयार होतय.

तरी ४ x ४ च्या शौचालयला ३ लाख २० हजार रुपये सरासरी खर्च झालेले आहे. तरी कोयना नगर स्मशान भूमी मधील ४ शौचालयला २८ लाख २७ हजार २९० रुपये म्हणजे १ शौचालय ७ लाख ६ हजार ८२२ रुपयेला बसत आहे. तरी ७ लाख रुपये १ शौचालय बांधायला लागत आहे. तरी ७ लाख ६ हजार ८२२ रुपयेला २ BHK घर बांधून येत. तरी संबंधित अधिकारी व ठरावामधील अधिकारी यांची चौकशी करुन तात्काळ कारवाई करण्यात यावी. व याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**१८) मा.राजेश्री धोडमनी व मा.मंदाकिनी तोडकरी यांचा दि.०६/०३/२०२६ रोजीचा प्रस्ताव** :- भारत रत्न इंदिरा नगर येथील शाळा नं ५ या शाळेत आजुबाजुच्या सुमारे झोपडपट्टी मधील सुमारे ३०० मुले-मुली शिक्षण घेत आहेत.

सदर शाळा खुल्या मैदानात असल्याने तेथे सकाळ पासुन मध्यापी (दारूडे) लोक येऊन घाण करतात व गोंधळ घालतात. त्यामुळे शाळेतील मुला-मुलींमध्ये कायम घाबराठीचे वातावरण असते. तसेच मुलींना सदर ठिकाणी सुरक्षा वाटत नाही त्यामुळे शाळेच्या संपूर्ण पटांगण सह कंपाऊड मारून मिळणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**१९) मा.राजेश्री धोडमनी व मा.मंदाकिनी तोडकरी यांचा दि.०६/०३/२०२६ रोजीचा प्रस्ताव** :-सोलापूर मध्ये तुळजापूर वेस येथे एकच लिंगायत स्मशान भुमी आहे. सदर ठिकाणी जागा कमी असल्याने मागील चाळीस पन्नास वर्षा पासुन पुरलेले ठिकाणीच पुन्हा खोदून प्रेत पुरले जाते. सदर प्रेताची लवकर विलेवाट झाल नसेल तर प्रेतच वर येते . सदर बाब लिंगायत धर्मात योग्य व नियमानुसार नाही. सदर स्मशान भुमी बहुसंख्य लिंगायत असलेल्या पूर्व भागातील अ.कोट रोड,संगमेश्वर नगर, MIDC , निलम नगर आशा नगर, इंदिरा नगर अशोक चौक अशा अनेक नगरापासुन सुमारे ८ ते १० किलो मिटर लांब आहे.

तरी पुर्व भागातील बहुसंख्य लिंगायत समाजासाठी अक्कलकोट रोड, महालक्ष्मी मंदीर समोर स्मशानभुमी साठी भुमी उपलब्ध करुन देण्यास **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**२०) मा.राजेश्री धोडमनी व मा.मंदाकिनी तोडकरी यांचा दि.०६/०३/२०२६ रोजीचा प्रस्ताव** :-आमच्या प्रभाग क्र १८ मध्ये कुमठा नाका येथे शासकीय मैदान आहे पण सदर मैदान सध्या ओसाड रान झालेला आहे. सदर ठिकाणी कुठल्याही व्यवस्था नाही. सदर मैदानात सध्या आजु बाजुचे लोक शौचालयसाठी वापर करत आहेत.

सदर मैदान दिवसभर सर्व वयोगटातील लोकांनी अथवा विध्यार्थीची गर्दी असते. सदर ठिकाणी राष्ट्रीय अथवा जागतीक लेवलचे स्पर्धा होतात, तसेच, पर जिल्हाचे राज्यस्थरिय स्पर्धा बरोबर पूर्व पोलीस भरतीची विध्यार्थी येथे दिवसभर तयारी करतात .

तरी सदर मैदान पुण्यातील भागेवाडी मैदानाप्रमाणे सदर मैदान सुव्यवस्थीत करण्यासाठी केंद्र सरकार अथवा महाराष्ट्र सरकार क्रिडा मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यास **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**२१) मा.राजेश्री धोडमनी व मा.मंदाकिनी तोडकरी यांचा दि.०६/०३/२०२६ रोजीचा प्रस्ताव** :- भारत रत्न इंदिरा नगर ते बस स्टॅन्ड नं २ पर्यंत नाला बांधकाम करुन मिळावे. सदर नाला हा माधव नगर, इंदिरा नगर, शास्त्री नगर, लोधी गल्ली, संगमेश्वर कॉलेज,सात रस्ता मार्गे रेल्वे स्टेशन मार्गे बाहेर जाते. सदर नाला हा संपूर्ण दगडी बांधकाम असुन , परंतु इंदिरा नगर ते शास्त्री नगर बस स्टॅन्ड पर्यंतचा नाला बांधकाम झालेला नाही. तेथे फक्त चर मारुन दिले जाते. त्यामुळे पावसाळयात नाला डासळून पडते. तसेच पाणी साचुन वस्ती मध्ये घुसते. तरी सदर नाला केंद्र सरकारच्या योजनेतुन बांधकाम करुन मिळण्यास **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**२२) मा.श्रध्दा पवार व मा.राजकुमार पाटील यांचा दि.०६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** प्रशासन काळ ११/०३/२०२२ ते ०६/०२/२०२६ पर्यंत प्रशासनकाळामध्ये भांडवली निधी वॉर्डवाईज निधी मधून प्रशासनकाळामध्ये कोणकोणती कामे करण्यात आली. स्वच्छ भारत (धुळ मूक्त) अभियान अंतर्गत कामे त्याचबरोबर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे योजना व मुलभूत सोयी सुविधा योजना व नागरी दलित इतर योजना त्याचबरोबर शासनाच्या विविध योजने मधून प्रशासन काळ ११ मार्च २०२२ ते ०६ फेब्रुवारी २०२६ मधील सर्व कामे झालेली व चालू आहे, याची माहितीस्तव सभागृहात सादर करण्यात यावी व याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**२३) मा.अक्षयकुमार अंजिखाने व मा.सिध्देश्वर कमटम यांचा दि.०९/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** सोलापूर महानगरपालिकेमध्ये सन २०२६ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये जवळपास ६० ते ७० टक्के नगरसेवक हे नव्याने पहिल्यांदाच निवडून आलेले आहेत. सध्याचे मंत्रालयीन व विधानभवन कामाकाजादरम्यान माननीय आमदार

महोदयांची प्रशासनास ओळख पटण्यासाठी त्यांना ज्या प्रमाणे बॅज देण्यात येतात त्याच धर्तीवर सोलापूर महानगरपालिकेतील सर्व नगरसेवकांना प्रशासकिय कामकाजा दरम्यान त्यांची ओळख अधिकाऱ्यांना व प्रशासनाला पटण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेचे इंद्रभूवन या हेरिटेज इमारतीची प्रतिमा त्यावर नगरसेवक/नगरसेविका असा उल्लेख करून बॅज देणेबाबतची कार्यवाही मा. आयुक्त यांनी तात्काळ करणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

या बॅजचा उपयोग नगरसेवक/नगरसेविका यांनी महानगरपालिकेच्या कामकाजाकरिता करण्याचा असून अन्य व्यक्तींजवळ सदरचा बॅज देणेत येऊ नये.

**२४) मा.सिध्देश्वर कमटम व मा.प्रशांत पल्ली यांचा दि.०९/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** श्री गुरुराज श्रीनिवास कुरापाटी राष्ट्रीय जलतरणपटु खेळाडू असून राहणार सोलापूर. यांचा दि.०४-१०-२०२५ रोजी श्री सिध्देश्वर मंदिर परिसरात असलेल्या तलावात एका १६-१७ वर्षाच्या मुलीस वाचवण्यास गेले असता त्यांच्या पायात दुखापत झाले असून त्यांच्या पायावर मोठी शस्त्रक्रीया करण्यात आली आहे ते एका पायाने अधू झालेले आहे.

तरी त्यांना माणूसकीच्या दृष्टिकोनातून विचार करून जास्तीत जास्त आर्थिक मदत महानगरपालिकेच्या वतीने करणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**२५) मा.निर्मला जंगम व मा. भारतसिंग बडूरवाले यांचा दि.११/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** माझ्या प्रभागातील श्री त्रिमुर्ती तिमण्पा भैरे हे मजुरी कामकाज करीत असून त्यांची आर्थिक परिस्थितील खुपच हालाकीची आहे. त्यांचा मुलगा मितांश त्रिमुर्ती भैरे वय वर्ष २ यास मेंदू व मणक्याचा गंभिर अजारामुळे उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. उपचाराकरीता मोठया प्रमाणात खर्च झालेले आहे. श्री त्रिमुर्ती तिमण्पा भैरे यांची आर्थिक परिस्थिती गंभिर असल्याने त्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**२६) मा.गणेश वानकर, मा.विनोद भोसले, मा.श्रीदेवी फुलारे मा.सौ.विजया खरात, मा.सुनिल खटके, मा.सतिश सिरसिल्ला व मा.मृण्मयी गवळी यांचा दि.११/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** सोलापूर शहराच्या वैभवात भर घालणारी इंद्रधनू टॉउनशिप हि वसाहत असून या वसाहतीमध्ये उच्च पदस्थ अधिकारी, व्यापारी, उद्योजक वास्तव्यास असून या वसाहतीमधील नागरिक महापालिकेस शंभर टक्के टॅक्स अदा करत असून या वसाहतीजवळच महापालिकेचे कचरा संकलन केंद्र असून या कचरा संकलन केंद्राच्या परिसरात मृत जनावरे, प्राणी, पक्षी, भटकी कुत्री यांचे मृतदेह उघडयावर टाकले जातात. त्यामुळे या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. या कचरा संकलन परिसरात पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. कचरा संकलनाच्या दुर्गंधीचा परिणाम पाणी पुरवठ्यावरही होत असून या परिसरातच केंद्रशासनाच्या अमृत योजनेतून लाखो रुपये खर्च करुन रेल्वे स्टेशनचे विस्तारीकरण करुन दमाणी नगर, देगाव, थोबडे वस्ती, सेटलमेंट आदी भागातील नागरिकांच्या सोयीसाठी रेल्वे तिकीट केंद्र चालू करण्यात आले आहे.या कचरा संकलनाच्या दुर्गंधीमूळे नागरिक या ठिकाणी तिकीट काढण्यास येण्यासाठी धजावत नाहीत. त्यामूळे या परिसरात असलेले महापालिकेचे कचरा संकलन केंद्र इतरत्र हलविण्यासाठी मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **मान्यतेस्तव** आलेले प्रस्ताव.

**२७) मा.गणेश वानकर व मा.सुनिल खटके यांचा दि.११/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** सोलापूर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या महापालिका परिवहन उपक्रात लवकरच पंतप्रधान ई- बस योजने अंतर्गत १०० बसेस परिवहनच्या ताफ्यात दाखल होणार आहे. परंतू परिवहन उपक्रमांतर्गत या अगोदर सोलापूर शहराच्या विविध भागात (चौकात) बस स्टॉप उभारण्यात आले होते. रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बरेचसे बस स्टॉप काढण्यात आले आहेत. तर बहूतांश बस स्टॉप हे अतिक्रमणाच्या विळख्यात अडकले असून पंतप्रधान ई- बस योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या बस सेवेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळावा व नागरिकांच्या सोयीसाठी बस स्टॉपची संख्या ही तितकीच असणे गरजेचे आहे. त्यामुळे पुर्वी असलेल्या बस स्टॉपची संख्या तपासून रस्ते रुंदीकरणाच्या नावाखाली परिवहन विभागाची परवानगी न घेता बस स्टॉप हटवणाऱ्यांवर तसेच बस स्टॉप अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करुन बस स्टॉपची संख्या वाढवण्याबाबत मा.आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**२८) मा.अमोल शिंदे, मा.अनंत जाधव, मा.चेतन नरोटे व मा.श्रध्दा पवार यांचा दि.११/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- "मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीला मिळकत कर माफी योजना," या योजनेअंतर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील माजी सैनिकांना मिळकत करामध्ये सुट देण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण- २०१६-प्र.क्र. ५९/न.वि. २० दि. ९ सप्टेंबर, २०२० अन्वये निर्णय घ्येण्यात आलेला आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात राहणा-या संरक्षण दलातील शौर्यपदक धारकांना व माजी सैनिकांच्या विधवा पत्नीच्या नावावर असलेल्या मालमत्तांना तसेच दिनांक ०९-०१-२०१७ च्या शासन निर्णयानुसार संरक्षण दलातील अविवाहित, शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना मालमत्ता करातून सुट देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. मात्र सोलापूर महानगरपालिकेमध्ये या निर्णयाची अद्यापही अमंलबजावणी करण्यात आलेली नाही. या निर्णयांनुसार सोलापूर महानगरपालिकेचे मा. आयुक्त यांनी अंमलबजावणी करणे बाबत दिनांक २८-१०-२०२० रोजी मान्यता दिलेली आहे. मात्र या विषयात अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. यास्तव, जेव्हा पासून ही योजना लागू झालेली आहे तेव्हा पासून या योजनेची सोलापूर महानगरपालिकेतही अंमलबजावणी करणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

---

नगरसचिव कार्यालय, सो.म.पा.
जाहिरात क्र.०४ दि.११/०३/२०२६

प्रविण प्रभावती प्रेमसागर दंतकाळे
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

---

टिप - १) प्रस्तुत विषयांची कागदपत्रे नगरसचिव कार्यालयात पाहणेस्तव ठेवणेत आलेली आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### धोनी सर्व आयपीएल सामने खेळेल : विश्वनाथन

**चेन्नई** : अनुभवी यष्टिरक्षक-फलंदाज महेंद्र सिंह धोनी इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) आगामी आवृत्तीत सर्व सामने खेळण्याची शक्यता आहे, तसेच त्याच्या भूमिकेचा अंतिम निर्णय संघ व्यवस्थापन घेईल असे चेन्नई सुपर किंग्जचे (सीएसके) सीईओ कासी विश्वनाथन म्हणाले. सर्व फ्रॅन्चायझींनी या रोख रकमेच्या स्पर्धेची तयारी करण्यासाठी आपले प्रशिक्षण शिबिरे आधीच सुरू केली आहेत. नुकत्याच संपलेल्या टी-२० विश्वचषकाचा भाग असलेले खेळाडू लवकरच त्यांच्या संबंधित फ्रॅन्चायझींमध्ये सहभागी होतील आणि स्पर्धेसाठी सराव सुरू करतील. सीएसकेचा दिग्गज धोनी आयपीएल २०२६ मध्ये सीएसकेसाठी खेळणार असल्याने, त्याचे वय लक्षात घेता, सर्व सामन्यांमध्ये यष्टिरक्षक-फलंदाज सहभागी होण्याबाबत चिंता होती. तथापि, विश्वनाथन यांनी अशा सर्व चिंता फेटाळून लावल्या आणि म्हणाले, 'माझ्या मते तो सर्व सामने खेळेल.'

### प्रियांश, आंबेकर, साहिलची मुष्टियुद्धात दमदार कामगिरी

**बँकॉक** : येथे आयोजित जागतिक मुष्टियुद्ध फ्युचर्स चषक स्पर्धेत भारतीय युवा मुष्टियुद्ध संघाने दमदार कामगिरी करत आपली मोहीम सुरू ठेवली. प्रियांश सेहरावतने (७० किलो) दिवसाची सकारात्मक सुरुवात करताना लाटव्हियावर ५-० असा एकमताने विजय मिळविला. एल. आंबेकरने (५० किलो) ताजिकिस्तानवर ५-० असा एकमताने विजय मिळवला, तर साहिल दुहानने (६० किलो) ताजिकिस्तानवर ५-० अशी मात केली दरम्यान, अमन सिवाचला (६५ किलो) दुसऱ्या फेरीत रेफरी स्टॉप्ड कॉन्टेस्ट (आरएससी) कडून युक्रेनच्या त्याच्या प्रतिस्पर्ध्याकडून पराभव पत्करावा लागला. तत्पूर्वी, चंद्रिका पुजारीने (५० किलो) प्रभावी प्रदर्शन करत व्हेनेझुएलाच्या तिच्या प्रतिस्पर्ध्यावर ५-० असा एकमताने विजय मिळवला. जॉयश्री देवीने (५४ किलो) देखील स्पर्धेत तिची प्रभावी कामगिरी सुरू ठेवली. पुढील टप्प्यात स्पर्धा पुढे जात असताना भारतीय संघ आपला वेग कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल.

### ऑस्ट्रेलियात इराणच्या दोन महिला फुटबॉलपटूंना आश्रय

**गोल्ड कोस्ट** : इराणच्या महिला फुटबॉल संघातील आणखी दोन सदस्यांना ऑस्ट्रेलियात आश्रय देण्यात आला, असे ऑस्ट्रेलियाचे गृहमंत्री टोनी बर्क यांनी बुधवारी कॅनबेरा येथे सांगितले. पाच इराणी खेळाडूंनी यापूर्वी आश्रय मागितल्यानंतर ऑस्ट्रेलियात मानवतावादी व्हिसा मिळालेल्या महिलांची संख्या सात झाली आहे. नंतरच्या गटातील एक खेळाडू होती आणि दुसरी संघाची कर्मचारी होती. दोघींनीही आपल्या सहकाऱ्यांना विमानतळावर नेण्यापूर्वी आश्रय मागितला होता. २८ फेब्रुवारी रोजी इराण युद्ध सुरू होण्यापूर्वी गत महिन्यात महिला आशियाई चषकासाठी संघ ऑस्ट्रेलियात पोहोचला होता. आठवड्याच्या शेवटी संघ स्पर्धेतून बाहेर पडला. ऑस्ट्रेलियाने आश्रय देण्याचा निर्णय घेतला, कारण आम्ही या महिलांमुळे वैयक्तिकरित्या प्रभावित झालो, असे ते म्हणाले. प्रत्येक व्यक्तीला अधिकार असला पाहिजे.

### नवनीत कौरची हॅट्ट्रिक, भारत उपांत्य फेरीत

**हैदराबाद** : बुधवारी सायंकाळी तेलंगणातील जी. एम. सी. बालयोगी हॉकी मैदानावर आयोजित एफआयएच हॉकी विश्वचषक पात्रता स्पर्धेत अखेरच्या साखळी सामन्यात नवनीत कौरच्या शानदार हॅट्ट्रिक गोलच्या बळावर भारताने वेल्सवर ४-१ गोलने शानदार विजय नोंदवून स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. गट ब मध्ये भारताने स्कॉटलंडला मागे टाकत अव्वल स्थान मिळवले. भारताचा उपांत्य सामना १३ मार्च रोजी इटलीशी होईल. अशा प्रकारे ते स्पर्धेतील सर्वोच्च क्रमांकाचा संघ इंग्लंडला टाळण्यात यशस्वी होतात. अ गटातून इंग्लंड व इटलीने उपांत्य फेरीत स्थान मिळविले. इंग्लंडचा उपांत्य सामना स्कॉटलंडशी होईल.

### अभिषेक-ईशानची फलंदाजीत आघाडी

**हैदराबाद** : भारताचा शानदार फलंदाज ईशान किशनने आपल्या उत्कृष्ट टी-२० विश्वचषक मोहिमेच्या जोरावर कारकिर्दीतील सर्वोत्तम दुसरे स्थान मिळवले आहे. बुधवारी जाहीर करण्यात आलेल्या आयसीसी टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत तो अव्वल क्रमांकावर असलेल्या अभिषेक शर्मापेक्षा केवएळ चार गुणांनी मागे आहे. टी-२० विश्वचषक अंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्धच्या जलद अर्धशतकानंतर अभिषेकने अव्वल स्थानावर आपली आघाडी कायम ठेवली आहे, तर डावखुरा फलंदाज ईशान किशन आता त्याचा जवळचा प्रतिस्पर्धी आहे. स्पर्धेत ३१७ धावा केल्यानंतर तो एकूण दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. किशनने (८७१ गुण) अभिषेक (८७५ गुण) पेक्षा केवळ चार गुणांनी मागे राहून कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग मिळवले आहे, तर न्यूझीलंडचा टिम सेफर्ट (सहाव्या स्थानावर) व इंग्लंडचा बेथेल (१६ व्या स्थानावर) आहे.

# आयपीएल हंगाम २८ मार्चपासून

### आरसीबी-सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सलामीचा सामना





**मुंबई, ११ मार्च**
भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) बुधवारी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ च्या पहिल्या टप्प्याचे वेळापत्रक जाहीर केले. हा टप्पा २८ मार्च ते १२ एप्रिल २०२६ दरम्यान खेळवला जाणार आहे.

या काळात तीन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार असल्याने, निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर स्पर्धेचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले जाईल, असे बीसीसीआयने म्हटले आहे.

जगातील सर्वात मोठ्या टी-२० लीगच्या १९ व्या आवृत्तीची सुरुवात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) यांच्यादरम्यानचा सलामीचा सामना बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला जाणार आहे.

बंगळुरू, मुंबई, गुवाहाटी, न्यू चंदीगड, लखनौ, कोलकाता, चेन्नई, दिल्ली, अहमदाबाद व हैदराबाद या १० ठिकाणी एकूण २० सामने खेळविले जातील.

या कालावधीत स्पर्धेत चार डबल-हेडर सामने होतील, यात दुपारचे सामने भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी ३.३० वाजता सुरू होतील व सायंकाळचे सामने भारतीय प्रमाण वेळेनुसार सायंकाळी ७.३० वाजता सुरू होतील.

शनिवारी होणाऱ्या पहिल्या सामन्यानंतर, मुंबई इंडियन्स रविवारी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्सशी भिडतील.

हंगामातील पहिला डबल-हेडर सामना ४ एप्रिल २०२६ रोजी दिल्ली कॅपिटल्सचा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर मुंबई इंडियन्सशी होईल, त्यानंतर गुजरात टायटन्सचा सामना अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर राजस्थान रॉयल्सशी होईल. राजस्थान रॉयल्स त्यांच्या घरच्या मोहिमेची सुरुवात गुवाहाटी येथे करेल व ते चेन्नई सुपर किंग्ज व मुंबई इंडियन्सचे आयोजन करतील. दरम्यान, पंजाब किंग्ज (पीबीकेएस) त्यांचे सुरुवातीचे घरचे सामने न्यू चंदीगडमधील पीसीए स्टेडियमवर खेळतील.

हंगामादरम्यान, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) बंगळुरूमध्ये पाच आणि रायपूरमध्ये दोन घरचे सामने खेळतील. पंजाब किंग्ज नवीन चंदीगडमध्ये चार आणि धर्मशाळेत तीन घरच्या मैदानावर सामने खेळतील, तर राजस्थान रॉयल्स गुवाहाटीमध्ये तीन आणि जयपूरमध्ये चार घरच्या मैदानावर सामने खेळेल.

बंगळुरूमध्ये होणारे सामने कर्नाटक सरकारने स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीच्या मंजुरीच्या अधीन आहेत. ही समिती १३ मार्च २०२६ रोजी एम. चिन्नास्वामी स्टेडियमची बैठक आणि तपासणी करेल, या दरम्यान आयपीएल सामन्यांचे आयोजन करण्यासाठी स्टेडियमच्या तयारीचे मूल्यांकन करण्यासाठी मॅच-डे व्यवस्थेचे पूर्ण-प्रमाणात मॉक प्रात्यक्षिक केले जाईल, असेही बीसीसीआयने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### आयपीएलच्या २० सामन्यांचे वेळापत्रक

| तारीख | सामना | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| २८ मार्च | आरसीबी वि. हैदराबाद | सायं. ७.३० | बंगळुरू |
| २९ मार्च | मुंबई इंडियन्स वि. केकेआर | सायं. ७.३० | मुंबई |
| ३० मार्च | राजस्थान वि. सीएसके | सायं ७.३० | गुवाहाटी |
| ३१ मार्च | पंजाब किंग्ज वि. गुजरात टायटन्स | ७.३० सायं. | मुल्लानपूर |
| १ एप्रिल | लखनौ वि. दिल्ली कॅपिटल्स | सायं. ७.३० | लखनौ |
| २ एप्रिल | केकेआर वि. हैदराबाद | सायं. ७.३० | कोलकाता |
| ३ एप्रिल | सीएसके वि. पंजाब किंग्ज | सायं. ७.३० | चेन्नई |
| ४ एप्रिल | दिल्ली कॅपिटल्स वि. मुंबई इंडियन्स | दु. ३.३० | दिल्ली |
| ४ एप्रिल | गुजरात टायटन्स वि. राजस्थान रॉयल्स | सायं. ७.३० | अहमदाबाद |
| ५ एप्रिल | हैदराबाद वि. लखनौ | दु. ३.३० | हैदराबाद |
| ५ एप्रिल | आरसीबी वि. सीएसके | सायं. ७.३० | बंगळुरू |
| ६ एप्रिल | केकेआर वि. पंजाब किंग्ज | सायं. ७.३० | कोलकाता |
| ७ एप्रिल | राजस्थान रॉयल्स वि. मुंबई इंडियन्स | सायं. ७.३० | गुवाहाटी |
| ८ एप्रिल | दिल्ली कॅपिटल्स वि. गुजरात टायटन्स | सायं. ७.३० | दिल्ली |
| ९ एप्रिल | केकेआर वि. लखनौ | सायं. ७.३० | कोलकाता |
| १० एप्रिल | राजस्थान रॉयल्स वि. आरसीबी | सायं. ७.३० | गुवाहाटी |
| ११ एप्रिल | पंजाब किंग्ज वि. हैदराबाद | दु. ३.३० | मुल्लानपूर |
| ११ एप्रिल | सीएसके वि. दिल्ली कॅपिटल्स | सायं. ७.३० | चेननई |
| १२ एप्रिल | लखनौ वि. गुजरात टायटन्स | दु. ३.३० | लखनौ |
| १२ एप्रिल | मुंबई इंडियन्स वि. आरसीबी | सायं. ७.३० | मुंबई |

# आयसीसीकडून भारतीय संघाला मिळाले २५ कोटींचे बक्षीस

**नवी दिल्ली, ११ मार्च**
टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय क्रिकेट संघाला २,६३९,४२३ डॉलर्स (अंदाजे २५ कोटी रुपये) मिळाले. संघाने घरच्या मैदानावर पुरुषांच्या टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर बक्षीस रकमेतील सर्वात मोठा वाटा आहे.



स्पर्धेच्या समाप्तीनंतर आयसीसीने बुधवारी खेळाडूंसाठी विक्रमी ११.२५ दशलक्ष डॉलर्सच्या बक्षीस निधीचे वितरण जाहीर केले.

भारताने न्यूझीलंडला ९६ धावांनी पराभूत करून सलग दुसऱ्यांदा ट्रॉफी जिंकली.

उपविजेत्या न्यूझीलंडने १,४२२,६९२ डॉलर्स (अंदाजे १३ कोटी रुपये) कमावले, तर उपांत्य फेरीतील दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडला अनुक्रमे १,००५,५७७ डॉलर्स (अंदाजे ९.२४ कोटी रुपये) आणि ९७४,४२३ डॉलर्स (८.९६ कोटी रुपये) मिळाले.

सुपर ८ मध्ये स्थान मिळवणाऱ्या इतर संघांना देण्यात आलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे- वेस्ट इंडीज (५३८,२६९ डॉलर्स), पाकिस्तान (५२२,६९२ डॉलर्स), झिम्बाब्वे (४९१,५३८ डॉलर्स) व श्रीलंका (४७५,९६२ डॉलर्स).

एकूण रक्कम २०२४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या आयसीसी स्पर्धेच्या बक्षीस रकमेत लक्षणीय वाढ दर्शविते. याचा उद्देश खेळाडूंसाठी आर्थिक बक्षिसे वाढवणे व क्रिकेटच्या जागतिक वाढीला पाठिंबा देणे आहे. (वृत्तसंस्था)

### दक्षिण आफ्रिकेचे ४, वेस्ट इंडीजचे ९ खेळाडू मायदेशी रवाना

**दुबई, ११ मार्च**
आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने बुधवारी टी-२० विश्वचषकानंतर पश्चिम आशियाई संघर्षामुळे भारतात अडकलेल्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंबद्दल सहानुभूती व्यक्त केली. दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज संघातील खेळाडू आपापल्या मायदेशाकडे रवाना झाले आहे व काही होणार असल्याचे आयसीसीने सांगितले. तसेच पश्चिम आशियातील संकटाच्या काळात प्रवास व्यवस्थेवरील टीकेला आयसीसीने प्रत्युत्तर दिले.

दक्षिण आफ्रिकेचे पथक बुधवारी मायदेशी परतण्यास सुरुवात केली आहे. चार खेळाडू व पाच कुटुंबातील सदस्य विमानात चढले आहेत. त्यांच्या पथकातील उर्वरित सर्व २९ सदस्य पुढील २४ तासांत रवाना होणार आहेत, असे आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# रणधीर सिंग सेहरावत गुजरात जायण्ट्सच्या मुख्य प्रशिक्षकपदी

### प्रो-कबड्डी लीग

**हमदाबाद, ११ मार्च**
प्रो-कबड्डी लीगच्या (पीकेएल) आगामी हंगामापूर्वी भारताचे माजी आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू रणधीर सिंग सेहरावत यांची गुजरात जायण्ट्सच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे प्रो-कबड्डी लीग संघाला भरपूर अनुभव मिळाला आहे. गुजरात जायण्ट्स अदानी स्पोर्ट्सलाइनच्या मालकीचे आहे.

सेहरावत यांच्याकडे प्रो-कबड्डी लीगच्या ११ हंगामांचा अनुभव आहे. यात एक जेतेपद व सहा प्ले-ऑफ सामन्यांचा समावेश आहे.

अर्जुन पुरस्कार विजेते सेहरावत यांनी भारतीय रेल्वेला अनेक राष्ट्रीय जेतेपदे मिळवून दिली आहेत व १९९० च्या आशियाड स्पर्धेत भारताच्या सुवर्णपदक विजेत्या संघाचा भाग होते.



रणधीर सिंग सेहरावत

सेहरावत हे लीगमधील सर्वात अनुभवी प्रशिक्षकांपैकी एक आहेत. २०१४ मध्ये प्रो-कबड्डी लीग सुरू झाल्यापासून ते या पीकेएलशी जुळले आहेत. खेळाडू म्हणून सेहरावत यांनी आशियाई कबड्डी स्पर्धा (१९८८), दक्षिण आशियाई क्रीडा (१९८९) स्पर्धा आणि १९९० च्या आशियाड क्रीडा स्पर्धांसह अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले व त्यांनी उपकर्णधार म्हणून भूमिका बजावली. (वृत्तसंस्था)

#### जेतेपदाचे ध्येय : सेहरावत

'प्रो-कबड्डी लीगमध्ये परतण्याचा मला आनंद आहे आणि या संधीसाठी मी अदानी स्पोर्ट्सलाइनचा आभारी आहे. गुजरात जायण्ट्समध्ये तरुण प्रतिभा व अनुभवी खेळाडूंचे एक मजबूत मिश्रण आहे. आम्ही जेतेपदाचे ध्येय ठेवत असताना संघासोबत काम करण्यास मी उत्सुक आहे', असे रणधीर सिंग सेहरावत म्हणाले.

### कै.सुशिला माने व आबाजी सिध्दू माने यांच्या स्मरणार्थ

# टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे पेनूर येथे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.११ मार्च-**
पेनूर (ता. मोहोळ)येथे कै. सुशिला आजाजी माने व कै. आबाजी सिंधु माने यांच्या स्मरणार्थ भव्य टेनिस बॉल खुली क्रिकेट स्पर्धाचे आयोजन सोमवार दि. १७ मार्च रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली असून प्रथम पारितोषिक सोलापूर शहरचे सहाय्यक पोलीस आयुक्त, राजन आबाजी माने यांच्यातर्फे ६१ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक नक्षत्र लॉन्सचे मालक समाधान माने, मोहोळ विधानसभा प्रमुख रणजित चवरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष तेजस बोबडे यांच्याकडुन ३१ हजार,तृतीय पारितोषिक गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर व युवा उद्योजक विकी शेठ सलगर यांच्याकडून २१ हजार,चतुर्थ पारितोषिक महराष्ट्र पोलीस नितीन चवरे, विनायक क्षीरसागर यांच्याकडून ११ हजार यांच्यातर्फे देण्यात येणार आहे.



स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडूंनाही सन्मानित करण्यात येणार असून उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यांना विशेष पारितोषिके दिली जाणार आहेत. याशिवाय काही वैयक्तिक बक्षिसांचीही तरतूद आयोजकांनी केली आहे.स्पर्धेसाठी प्रवेश फी ५५५५ रुपये ठेवण्यात आली आहे.

नावनोंदणीची अंतिम तारीख १६ मार्च २०२६ असून २१ मार्च रोजी बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. स्पर्धेचे नियोजन काटेकोरपणे करण्यात आले असून खेळाडूंनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी विविध मान्यवरांचे सहकार्य लाभले असून स्थानिक क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. क्रिकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच या स्पर्धेचे आयोजन कै.सुशील माने व आबाजी सिद्धू माने यांचे भाचे संतोष चवरे व संग्राम डोंगरे यांनी केले असून या क्रिकेट स्पर्धा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर क्रीडांगण पेनूर येथे भरविण्यात येणार आहेत.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सामना समितीचे संग्राम डोंगरे मो. ९९७०७६३३२१, नितीन चवरे मो. ९८६०००१४२२, अंकुश चव्हाण मो. ९०९६९४१०९१, राजेश माने मो. ९५०३०९३७३७ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



# छत्रपती शिवाजीचा इरफान बारगीर राज्य वेटलिप्टींगमध्ये प्रथम

### रवीराज अनुभले विभागीय कुस्ती स्पर्धेत उपविजयी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मार्च-**
शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धेत छत्रपती शिवाजी रात्र कनिष्ठ महाविद्यालयाच्या इरफान बारगीर याने राज्य वेटलिप्टींग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. रवीराज अनुभले याने पुणे विभागीय कुस्ती स्पर्धेत उपविजेतेतपद संपादिले.

मनमाड येथे झालेल्या शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धेत ९४ किलो खालील वजन गटांमध्ये इरफानने ही कामगिरी केली. त्याने स्नॅच मध्ये ९० क्लीन अँड जरकमध्ये १२० वजन उचलले. त्याची छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल. तसेच बालेवाडी पुणे येथे झालेल्या विभागीय कुस्ती स्पर्धेमध्ये रविराज याने ५७ वजन गटात उपविजेतेपद संपादिले.

या खेळाडूंना वेटलिफ्टिंगचे राज्य प्रशिक्षक प्रदीप पाटील व कुस्तीचे लक्ष्मण शिंदे, प्रा सचिन गायकवाड, प्रा संतोष गवळी, मारुती घोडके व प्रा. नितीन गोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे, प्राचार्य डॉ. नितीन मोटे, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, प्राचार्य मंजुश्री पाटील यांनी अभिनंदन केले.




# क्रीडा क्षेत्रात कर्तृत्ववान खेळाडू घडविणाऱ्या मातांचा जिजामाता पुरस्काराने गौरव

### पंढरपूर क्रीडा भारतीचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ मार्च -**
पंढरपूर क्रीडा भारतीच्या वतीने क्रीडा क्षेत्रात आपल्या मुला-मुलींना घडविण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या आदर्श मातांचा जिजामाता पुरस्काराने गौरव करण्यात आला. हा सोहळा कर्मयोगी सभागृह अर्बन बँक, खवा बाजार येथे पार पडला. उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, सामाजिक कार्यकर्त्या सीमाताई प्रशांत परिचारक व क्रीडा भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांतमंत्री ज्ञानेश्वर म्याकल यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

यावेळी सुधाकर जोशी, योगेश कुलकर्णी, राजेश दंडे रामेश्वर कोरे, रायझिंग स्टार इंग्लिश मीडियम स्कूल वाडीकुरोलीच्या प्राचार्या डॉ. गीतांजली खाडे, कर्मयोगी पब्लिक स्कूल शेळवेचे प्राचार्य दास आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सचिन लादे यांनी केले. या कार्यक्रमासाठी जिल्हाध्यक्ष सोमनाथ गायकवाड आणि जिल्हा मंत्री रवी ओहोळ यांच्यासह ओंकार कापसे, प्रवीण देशपांडे, बाळकृष्ण डिंगरे, सुनील जगताप, तुकाराम खंदाडे आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. पुरस्कारार्थी खातून नौशाद जमादार म्हणाल्या आपल्या मुलांच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीसाठी कुटुंबाने घेतलेले कष्ट आणि मिळालेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त करत हा सन्मान सर्व मातांसाठी प्रेरणादायी आहे. ज्ञानेश्वर म्याकल म्हणाले, क्रीडा भारती या संस्थेच्या माध्यमातून देशभरात राबविण्यात येणारे विविध क्रीडा उपक्रम, त्यामागील राष्ट्रीय दृष्टिकोन आणि त्यातून निर्माण झालेली यशस्वी उदाहरणे यांचा उल्लेख केला. क्रीडा क्षेत्रातून शिस्त, संघभावना आणि राष्ट्रभक्तीची जपणूक करण्याचे कार्य क्रीडा भारती करत आहे. सीमाताई परिचारक म्हणाल्या, खेळाडू घडविण्यामागे पालक आणि विशेषतः मातांचे असलेले कष्ट, चिकाटी आणि जिद्द यांचे कौतुक केले.

**यांचा जिजामाता सन्मान पुरस्काराने गौरव**
अंजली समाधान आवताडे (मंगळवेढा), करुणा जनार्दन शिवशरण (घोडेश्वर-माचनुर), विद्या विनायक सरगुळे (करकंब) खातून नौशाद जमादार (हुलजंती-उमदी)

**शिरसट व नागणे यांची निवड**
यावेळी क्रीडा भारती पंढरपूर तालुका मंत्री म्हणून दत्तात्रय शिरसट यांची तसेच पंढरपूर शहर क्रीडा प्रमुख म्हणून सुनेत्रा नागणे यांची निवड जाहीर करून त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# क्रीडा स्पर्धेचे ई-प्रमाणपत्र घरबसल्या मिळवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मार्च**
खेळाडूंच्या पाच टक्के आरक्षणासाठी प्रणालीवर अभिलेख उपलब्ध त्वरित नोंदणी करून घरबसल्या प्रमाणपत्र मिळविण्याची सोय महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने केली आहे.




महाराष्ट्र राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५% आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा, यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने 'क्रीडा इ-प्रमाण' ही ब्लॉग चेन तंत्रज्ञानावर आधारित अद्यायावत प्रणाली कार्यान्वित केली आहे.

आगामी भरतीसाठी क्रीडा ई-प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग एमपीएससी तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता या ई-प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राशिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा स्वीकार केला जाणार नाही. याची सर्व खेळाडूंनी नोंद घ्यावी.

ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्रमाणपत्राची पडताळणी केलेली आहे. त्यांनी यापुढे शासकीय व निमशासकीय भरतीसाठी अर्ज सादर करावयाचा असल्यास या प्रणालीद्वारे प्रमाणपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे. ज्या खेळाडूंनी अधिकृत स्पर्धामध्ये प्राविण्य मिळवले आहे.

अशा सर्व खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मंगळवेढा पंचायत समितीतील कनिष्ठ सहाय्यक निलंबीत; वेळेत कामकाज न केल्याचा परिणाम

**मंगळवेढा, दि.११ मार्च-**

मंगळवेढा पंचायत समिती मधील मग्रारोहयो विभागात कार्यरत असलेले कनिष्ठ सहाय्यक रणजीत वाडदेकर यांनी संपूर्ण कामकाजावर नियंत्रण ठेवणे व वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त सुचनेनुसार कामकाज करणे अपेक्षित असताना वेळेत कामकाज पार न पाडल्याने गटविकास अधिकारी डॉ.जस्मिन शेख यांनी निलंबीत केले आहे. मंगळवेढा पंचायत समितीमध्ये वाडदेकर यांच्याकडे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचा पदभार आहे. त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त सुचनेनुसार कामकाज करणे तसेच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या कामाचे लाभार्थ्यांकडून प्राप्त होणारी देयके नियमानुसार विहित कालावधीत अदा करणे अपेक्षित होते. मात्र ते न केल्याने दि.१८/२/२०२६ रोजी कामकाजाच्या त्रुटीबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मनरेगा विभागाच्या प्रलंबीत विषयाबाबत लाभार्थी व नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत असल्याने दि.२४ फेब्रुवारी रोजी दप्तर तपासाणीमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या. याला जबाबदार धरुन सदर कनिष्ठ सहाय्यक वाडदेकर यांचा अहवाल जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवून त्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर विविध कार्यालयीन कामकाजाच्या त्रुटीचा ठपका ठेवून त्यांचा निलंबन आदेश काढला आहे. दरम्यान या कारवाईमुळे पंचायत समितीमधील कामचुकार कर्मचाऱ्यांना मोठी चपराक बसली असून निलंबनामुळे खळबळ उडाली आहे.

### जिल्हा परिषदेत बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांचा संशय; चौकशीची मागणी

**सोलापूर, दि. ११ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेत बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे काही जण लाभ घेत असल्याचा संशय व्यक्त करत दिव्यांग कर्मचारी संघटनेचे जिल्हा सचिव लक्ष्मण वंजारी यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. जिल्हा परिषदेत सादर करण्यात आलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रांची तपासणी करून संबंधित प्रकरणांची चौकशी करावी, अशी मागणी केली. जर कोणाकडून बोगस प्रमाणपत्रांचा वापर करण्यात आला असेल तर त्यांच्यावर नियमांनुसार कडक कारवाई करावी, असेही या निवेदनात नमूद केले आहे.



## निधन वृत्त...

### रमेश खुने



**सोलापूर, दि.११ मार्च-**

फ्लोरा ग्रँड, गणेश सोसायटी समोर, जुळे सोलापूर येथील सेवानिवृत्त बँक अधिकारी रमेश महादेव खुने (वय ७३) यांचे मंगळवार, दि. १० मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातू असा परिवार आहे. कृषी खात्यातील अधिकारी प्रकाश खुने यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

### नेताजी महाडिक



**सोलापूर, दि. ११ मार्च -**

सोनी सिटी येथील रहिवासी नेताजी दत्तोपंत महाडिक (वय ६७) यांचे बुधवार, दि. ११ मार्च रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. एपीआय उमाकांत महाडिक यांचे ते वडील होत.

### गिरीश चाकोते



**पंढरपूर, दि. ११ मार्च-**

येथील गिरीश कांतीलाल चाकोते (वय-५५) यांचे दि.१० मार्च रोजी सकाळी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर गोपाळपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते जैन समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, भाऊ, भावजय, बहीण, भाचे, पुतणे असा परिवार आहे.

### पद्मावती कुलकर्णी



**सोलापूर, दि. ११ मार्च-**

गुंजेगावच्या माजी शिक्षिका पद्मावती पद्माकर कुलकर्णी (वय ८९) यांचे १० मार्च रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# सांगोल्यात 'ऑपरेशन लोटस' यशस्वी

**पालकमंत्र्यांचा मास्टरस्ट्रोक**

**तीन पं.स.सदस्यांचा भाजपात प्रवेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.११ मार्च -**

गुरुवार दि.१२ मार्च रोजी सांगोला पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवड पार पडणार आहेत. तत्पूर्वीच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जोरदार राजकीय मास्टरस्ट्रोक खेळत सांगोला तालुक्यात प्रथमच 'ऑपरेशन लोटस' मोहीम यशस्वी करून माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या तिन्ही पंचायत समिती सदस्यांचा भाजपमध्ये प्रवेश करून घेतला आहे. मुंबई येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते आणि माजी आ.साळुंखे पाटील यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश संपन्न झाला.



सांगोला पंचायत समिती सभापती उपसभापती निवडीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्र्यांच्या निवासस्थानी पालकमंत्री गोरे, माजी आ.शहाजीबापू पाटील, भाजपचे नेते बाळासाहेब एरंडे, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, माजी जि.प सदस्य अशोक शिंदे यांच्यासह महायुतीचे प्रमुख नेतेमंडळींची समन्वय बैठक संपन्न झाली. या बैठकीत सांगोला पंचायत समितीच्या सभापतीपदाची संधी प्रथम भारतीय जनता पक्षाला देण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. तर त्यानंतर शिवसेनेचा सभापती होणार असल्याचेही या समन्वय बैठकीत सर्वानुमते ठरले आहे. महायुतीच्या नेतेमंडळींनी घेतलेल्या या निर्णयानुसारच पालमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगोला तालुक्यात ऑपरेशन लोटस मोहीम यशस्वीपणे राबविली आहे.

**सांगोल्यात पहिल्यांदाच भाजपचा सभापती तर शिवसेनेचा उपसभापती**

सांगोला पंचायत समितीच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या इतिहासात प्रथमच भाजप महायुतीचा सभापती होणार आहे. नुकत्याच भाजपमध्ये प्रवेश केलेल्या जवळा पंचायत समिती गणातील सदस्या पूनम इंगवले या सांगोला पंचायत समितीच्या भाजपच्या पहिल्या सभापती तर नाझरे पंचायत समिती गणातून विजयी झालेले शिवसेनेचे अजय सरगर हे उपसभापती होणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे.



### बलात्कार प्रकरणी आरोपीस सशर्त जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.११ मार्च-**

बलात्कारप्रकरणी अटकेतील आरोपी पंडीत गोरे याचा येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने ५ मार्च रोजी एक लाख रुपयाच्या जात मुचलक्यावर तसेच काही अटी शर्तीसह जामीन मंजूर केला. सदर जामीन अर्जाच्या सुनावणीवेळी आरोपीच्या वकिलांनी कोर्टापुढे मांडलेले मुद्दे, केलेला प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरुन सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी आरोपीला जामीन मंजूर केला. आरोपीतर्फे ॲड. रियाज शेख, ॲड. विजय गलांडे, ॲड. साकिब शेख यांनी काम पहिले.



# बार्शी तालुक्यात गॅस सिलेंडर तुटवडा नाही; अफवांवर विश्वास ठेवू नये

**तहसीलदार शेख यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ मार्च-**

बार्शी तालुक्यात घरगुती गॅस सिलेंडरचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करत नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

बार्शी तालुक्यात सध्या आठ गॅस एजन्सी कार्यरत असून त्या मार्फत नागरिकांना घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा केला जात आहे. यामध्ये इंडियन गॅस, भारत गॅस आणि एचपीसीएल या प्रमुख गॅस कंपन्यांचा समावेश आहे. घरगुती गॅस सिलेंडरचे वितरण करताना कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या ओटीपी (जढझ) पडताळणीची सक्ती करण्यात आली आहे. गॅस सिलेंडरचा गैरवापर होऊ नये आणि वितरणात पारदर्शकता राहावी, यासाठी ही पद्धत लागू करण्यात आली आहे.



दरम्यान, गॅस सिलेंडर वितरणावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच काळाबाजार रोखण्यासाठी तहसील कार्यालयामार्फत तालुका स्तरावर दक्षता पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाला गॅस एजन्सींची तपासणी करुन दररोज होणाऱ्या गॅस सिलेंडरच्या आवक-जावक व्यवहारांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तहसील प्रशासनाने नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, बार्शी तालुक्यात घरगुती गॅस सिलेंडरचा कोणताही तुटवडा भासणार नाही. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक घबराट न करता गॅस सिलेंडरचा अतिरिक्त साठा करु नये. तसेच सोशल मीडियावर किंवा इतर माध्यमांतून पसरविल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये. प्रशासनाकडून गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत असून नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार एफ. आर. शेख यांनी केले आहे.

# कासेगावात गर्भवतींचे सामुहिक डोहाळ जेवण

**तभा वृत्तसेवा,**
**दसोलापूर,दि.११ मार्च-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत महिला सक्षमीकरण सप्ताहानिमित्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प दक्षिण सोलापूर यांच्या वतीने गर्भवतींचे सामुहिक डोहाळजेवण करण्यात आले.

महिला सक्षमीकरण कार्यक्रमात अन्न प्राशन कार्यक्रम, सुदृढ बालक स्पर्धा, मुलीच्या नावे वृक्षारोपण हे उपक्रमही राबवण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच यशपाल वाडकर यांच्या हस्ते झाले. यावेळी उपसरपंच शहाजान शेख, ग्रामपंचायत सदस्या अनिता हेडे, सोनाली वाडकर आदींसह महिलांची उपस्थिती मोठी होती. सरपंच वाडकर यांनी महिला सक्षमीकरण व गावाच्या विकासासाठी



महिलांच्या योगदानाची गरज व महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमास उपस्थित गरोदर माता, स्तनदा मातांना, महिला व ग्रामस्थांना बालकांचे पहिले १००० दिवस, अन्न प्राशनाबाबत पर्यवेक्षिका नम्रता चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. तसेच परिचारिका श्रीमती रवळे यांनी आहार व आरोग्य विषयी माहिती दिली. कार्यक्रमात सुदृढ बालकांना भेटवस्तू देण्यात आली. मुलींच्या नावे वृक्षारोपण करण्यात आले. सर्वांच्या समक्ष बाळाला मातांच्या हातून अन्न प्राशन करण्यात आले. महिलांची हिमोग्लोबिन (एचबी) तपासणी करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी परिश्रम घेतले.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अ.नं. ११४/२०२५
पुढील नेमली ता. ०९/०४/२०२६
निशाणी नं.०५

**बार्शी येथील मे, सिव्हील जज्ज ज्यू, डि. सो. यांचे कोर्टात**

१) **बालाजी व्यंकटेश विधाते,** वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. कारी ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **सौ. सुमन सुरेश सुकाळे,** वय - ५८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. लिंगी पिंपळगाव, ता. बार्शी, जि. धाराशिव
३) **मनिषा दत्तात्रय विधाते,** वय - ४५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. धाराशिव, ता. व जि. धाराशिव
४) **सुमेधा दत्तात्रय विधाते,** वय - २८ वर्षे, धंदा - नोकरी, रा. समता नगर, धाराशिव ता. व जि. धाराशिय
५) **श्रीमती शैलजा शिवाजी विधाते,** वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम रा. कारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
६) **आदित्यराज शिवाजी विधाते,** वय - २४ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
७) **अथर्वराज शिवाजी विधाते,** वय - २१ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
८) **कविता कमलाकर भिसे,** वय - ५५ वर्षे, धंदा - घरकाम रा. गादवड, ता. व जि. लातूर

— **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** — **सा.याला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १, २, व ८ हे आपसात सख्खे बहिण, भाऊ असून, अर्जदार क्रं. ३ ही अर्जदार क्र. ४ ची आई आहे. तसेच अर्जदार क्र. ५ ही अर्जदार क्र. ६ व ७ यांची आई आहे. अर्जदार नं. १. २ व ८ यांचे वडिल म्हणजेच अर्जदार क्र. ३ व ५ यांचे सासरे म्हणजेच अर्जदार क्र. ४, ६ व ७ यांचे आजोबा व्यंकटेश गोवर्धन विधाते हे दि. ०६/०४/२०२४ रोजी कारी येथे मयत झालेले आहेत. तसेच व्यंकटेश गोवर्धन यांचे पत्नी त्रिवेणी हे दि. २६/०१/२०२१ रोजी मयत झालेले आहेत तसेच व्यंकटेश गावेर्धन यांचा मुलगा दत्तात्रय व्यंकटेश विधाते हे दि. ०३/०७/१९९८ रोजीच मयत झालेले आहे. तसेच शिवाजी व्यंकटेश गोवर्धन हा दि. ०८/०६/२०१२ यातील मयत झालेला आहे. यातील मयत व्यंकटेश गोवर्धन विधाते, त्रिवेणी व्यंकटेश विधाते, दत्तात्रय व्यंकटेश विधाते, शिवाजी व्यंकटेश विधाते यांना यातील अर्जदार नं. १ ते ८ हेच वारस आहेत. त्यांच्या शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार नं. १, २ व ८ यांचे वडिल म्हणजेच अर्जदार क्र. ३ व ५ यांचे सासरे म्हणजेच अर्जदार क्र. ४, ६ व ७ यांचे आजोबा व्यंकटेश गोवर्धन विधाते यांच्या मृत्युनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ व इतर शासकीय सवलतीचा लाभ घेण्यासाठी यातील शासकीय अधिकारी यांनी त्यांना मयत व्यंकटेश गोवर्धन विधाते यांचे मे. कोर्टातून वारस प्रमाणपत्र आणण्यासाठी सांगितले असता अर्जदारांचा सदरचा अर्ज आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत व्यंकटेश गोवर्धन विधाते यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रकटीकरणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. ०९/०४/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

हे जाहिर प्रकटीकरण कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. २३/०२/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क स्तर, बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क स्तर, बार्शी**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

(TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेवरील ऑनलाइन ई-निविदा ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक खालील कामांसाठी विद्युत कंत्राटदारांकडून आमंत्रित करीत आहेत: निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/23R1. कामाचे नाव: सोलापूरच्या दौंड-सोलापूर विभागात मलठण स्टेशनवर प्रत्येक दिशेने एक लांब पल्ल्याच्या लूप लाईनच्या तरतुदीशी जोडणीतील कामाचा विद्युत TRD भाग विभाग, (पुनर्निमंत्रण). अंदाजे खर्च: 1,22,40,703.62. बोली सुरक्षा: 2,11,200/-, पूर्ण कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 07.04.2026 15.00 वाजता. EXP-10

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अ.नं. ०१/२६ नि.१४
पुढील नेमली ता. १८/०४/२०२६

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**शारदा ज्ञानेश्वर काटे,** वय ६८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. बिल्डींग ड, फ्लॅट नं. ९०२, अल्कासा सोसायटी, सर्वे नं.६०, तरवडे वस्ती, देसाई आय हॉस्पीटलजवळ मोहम्मदवाडी, पुणे शहर, — **अर्जदार**

विरुध्द

१) **तुषार ज्ञानेश्वर काटे,** वय ४२ वर्षे, धंदा - वैद्यकीय व्यवसाय, बिल्डींग ड, फ्लॅट नं.९०२, अल्कासा सोसायटी, सर्वे नं.६०, तरवडेवस्ती, देसाई आय हॉस्पीटलजवळ, मोहम्मदवाडी, पुणे शहर
२) **अश्विनी आनंदराव जाधव,** वय ३९ वर्षे, धंदा - घरकाम, रा. एफ ४०३ सप्तसुर, डीएसके विश्व सिंहगड रोड, धायरी, पुणे

— **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं.२,३ चे वडिल ज्ञानेश्वर अर्जुन काटे हे होते ते दि. २६/०९/२०२३ रोजी पुणे येथे मयत झालेले आहेत. त्यांना अर्जदार सा.वाला हेच वारस असून मयतास अर्जदार सा.वाला यांचेशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता व मयताचे नांवे अर्ज कलम १ मधील असलेले मिळकतीस नोंद होणेकरीता विनंती केली तेथील अधिकाऱ्यानी वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदारानी वारस प्रमाणपत्राची मागणीचा अर्ज या मे. कोर्टात आणला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले ता. १८/०४/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होऊन आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रगटन आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीखः ०७/०३/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिक मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेले आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 108507315 | मालमत्तेवर कर्ज | 1. परमेश्वर गोपाळ खरात<br>2. गोपाळ सयाजी खरात | 04/02/2026 | INR 5,36,854.59/- |

**मालमत्तेचा पत्ता :** गावठाण निवासी मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, शिरळ (टी) ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ८८/बी/२. ५००.०० चौ.फूट (४६.४६ चौ.मी.) क्षेत्रफळ असलेले, शिरळ (टी) ग्रामपंचायतीच्या स्थानिक हद्दीत, ता. माढा, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२११ येथे स्थित. एकूण जमीन क्षेत्रफळ ५००.०० चौ.फूट आहे आणि त्याची सीमा :- उत्तर - श्री. समाधान चंदन यांचे घर, दक्षिण - श्री. श्रीमंत कांबळे यांचे घर, पूर्व - रस्ता, पश्चिम - श्री. गुलाब कसबे यांचे घर.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३(१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 11/03/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**SHRI MAHAVIR URBAN CO. OP BANK LTD., SOLAPUR**
Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002 PH: (0217) 2622933/44

**DEMAND NOTICE UNDER SECTION 13(2) OF SARFAESI ACT 2002**

Whereas you the below mentioned Borrower, Guarantor's and Mortgagors have availed loan from Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur, by mortgaging your immovable property. Consequent to default committed by you all, your loan account has been classified as Non Performing Asset, whereas Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur being a secured creditor under the Act, and in exercise of the powers conferred under section 13(2) of the said Act read with rule 2 of Security Interest (Enforcement) Rules 2002, issued Demand Notice calling upon the Borrowers/Guarantor's/Mortgagors as mentioned below on their last known address to repay the amount mentioned in the notices with future interest thereon within 60 days from the date of the notice, but some notices have been returned unserved due to certain reasons, thus this public notice is being issued as follows:

| Sr. No. | Particular | Description |
|---|---|---|
| 1 | Name of Borrower/ Guarantor/ Mortgagor | **1) Sandipkumar Namdev Raut** R/o: Soham Heights, Chhatrapati Colony, Kurduwadi Road, Barshi 413401 **2) Moiz Huseni Bohari** R/o: Burhani Villa, Mangire Mala, Mangalwar Peth, Barshi 413401. |
| | Loan Account No. | 00600321500007 |
| | Loan Amount | Rs. 21,00,000/- |
| | Details of the Security to be enforced | The Residential Flat at District and Sub district Solapur, Taluka Barshi, within limits of Barshi Municipal Corporation out of residential area plot, Having Gat No. 650/2 and its area 58 R. 80 Sq. Mt., The Building Constructed on this Plot known as "Soham Heights" and out of it Flat No. 404, its area 805.00 Sq. Ft. having boundaries of said flat as follows: **East -** Lift and Passage, **West -** Duct and Flat No. 406, **North -** Duct and Area of Flat No. 403, **South -** Open Land of Plot |
| | Date of NPA | 30/06/2020 |
| | Demand Notice Date | 27/02/2026 |
| | Amount Due in Rs. as on 31/01/2026 | 33,97,294/- (Rs. Thirty Three Lakh Ninety Seven Thousand Two Hundred and Ninety Four Only) Plus future interest and other expenses |

Notice is therefore given to the Borrower/Guarantor & Mortgagor as mentioned above, calling upon them to make payment of the aggregate amount mentioned above against all the respective Borrower within 60 days of Publication of this notice as the said amount is found payable in relation to the respective loan account as on the date shown above. It is made clear that if the aggregate amount together with future interest and other amounts which may become payable till the date of payment is not paid, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur shall be constrained to take appropriate action for enforcement of security interest. upon property described above. Please note that this publication is made without prejudice to such rights and remedies as are available to Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur against the Borrower/ Guarantor's/ Mortgagors of the said financials under the law, you are further requested to note that as per section 13(13) of the said act, you are restrained/ prohibited from disposing of or dealing with the above security or transferring by way of sale, lease or otherwise of the secured asset without prior consent of Secured Creditor.

**Date : 11/03/2026**
**Place : Solapur**

SEAL

**Sd/-**
**Authorised Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**

# महात्मा बसवेश्वर महाराजांच्या स्मारकासाठी भरीव निधीची तरतूद व्हावी

## शहरात नव्या एमडीसीची आवश्यकता : आमदार देवेंद्र कोठे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मार्च-**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांच्या मंगळवेढा येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी भरीव निधीची तरतूद करावी अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी बुधवारी विधानसभेत केली. तसेच सोलापूर शहरात नव्या औद्योगिक वसाहतीची आवश्यकता असल्याची आग्रही मागणीही राज्य सरकारकडे करत आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापुरातील कामगार वर्गाच्या रोजगाराकडे लक्ष वेधले.

आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, महाराष्ट्र सरकारने मंगळवेढा येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला होता. परंतु या स्मारकाचे काम रखडले होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर या स्मारकासाठीची जागा निश्चिती करण्याचे काम सुरू आहे. आगामी काळात या स्मारकासाठी राज्य शासनाने भरीवनिधी द्यावा. सोलापूर शहरात असलेल्या औद्योगिक वसाहतींमध्ये नवीन उद्योग उभारणीसाठी जागेच्या तुटवड्यामुळे नव्या जागा मिळणे जिकरीचे बनले आहे. सोलापुरात असलेल्या रे नगर, गोदूताई विडी घरकुल परिसरात मोठ्या प्रमाणावर कामगारांची वस्ती असून नव्या औद्योगिक वसाहतीमुळे येथील कामगारांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळे सोलापुरात नवीन औद्योगिक वसाहतीची उभारणी करावी.



सोलापूर शहरातील धर्मवीर संभाजी महाराज तलाव परिसराचा विकास करण्याची आवश्यकता आहे. या परिसराचा विकास झाला तर राज्यातून सोलापूर जिल्ह्यातील विविध तीर्थक्षेत्रांना येणाऱ्या पर्यटकांना शहरात पर्यटनासाठी चांगला पर्याय उपलब्ध होईल. तसेच तलावाचेही संवर्धन होईल. त्यामुळे धर्मवीर संभाजी महाराज तलाव परिसराचा विकास करावा, अशीही मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी केली.

सोलापूर विमानतळावर नाईट लँडिंग सुरू होण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावेत. सोलापूर विमानतळालगत असलेल्या जिंदगी येथील अतिक्रमणामुळे नाईट लँडिंगच्या सुविधांना अडचणी येत आहेत. या प्रकरणी काही जण न्यायालयात गेले असून निष्णात सरकारी वकील नेमून याबाबत मार्ग काढावा आणि सोलापूर विमानतळावर लवकरात लवकर नाईट लँडिंग सुरू करावे, असे आमदार देवेंद्र कोठे यावेळी म्हणाले.

राज्य सरकारने सोलापूरच्या समतोल पाणीपुरवठ्यासाठी तयार केलेल्या ८९२ कोटी रुपयांच्या प्रस्तावावर जागतिक बँकेने सुचवलेल्या सुधारणानुसार सरकारने एक हजार तीनशे कोटी रुपयांचा नवा प्रस्ताव तयार केला आहे. त्यास लवकरच मंजुरी मिळेल असा विश्वास आहे, असे आमदार श्री. कोठे म्हणाले.

सोलापुरात सुमारे एक लाख कामगार राहतात. त्यांच्यासह गोरगरिबांना वैद्यकीय सुविधा अल्पदरात मिळाव्यात याकरिता आरोग्य विभागाकडून २५० खाटांचे अद्ययावत रुग्णालय उभारावे, अशी मागणीही आमदार देवेंद्र कोठे यांनी राज्य सरकारकडे केली.



राज्यातील क आणि ड वर्गातील महापालिकांसाठी डीपी रस्त्यांकरिता स्वतंत्र योजना मंजूर करण्याची आवश्यकता आहे. सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेप्रमाणे अमृत काल योजना सुरू केल्यास राज्यातील क आणि ड वर्गातील महापालिकांमधील डीपी रस्ते तयार करण्यासाठी मदत होईल, अशी आग्रही मागणी याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे यांनी केली.

सोलापुरातील विडी उद्योग अडचणीत असल्यामुळे आगामी काळात येथील महिलांना तसेच पुरुषांना रोजगार मिळण्याकरिता युनिफॉर्म उद्योगावर काम करण्याची आवश्यकता आहे. शहरी विधानसभांना केवळ नगर विकास खात्याच्या निधीवरच अवलंबून रहावे लागते. इतर खात्यांचा निधी मिळत नाही. त्यामुळे राज्य सरकारने शहरी विधानसभांच्या विकासासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणीदेखील आमदार देवेंद्र कोठे यांनी विधानसभेत केली.

पंढरपूर, अक्कलकोट, गाणगापूर, तुळजापूर या तीर्थक्षेत्रांना जाण्यासाठी परिक्रमा मार्ग तयार केल्यास भाविकांचे दर्शन सुलभ होईल. तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सोलापूर जिल्ह्यात पर्यटन रिसॉर्ट उभारणे गरजेचे आहे, अशीही आमदार कोठे यांनी मागणी केली आहे.

### अक्कलकोट रस्त्यावरील महालक्ष्मी मंदिराजवळ हवा उड्डाणपूल

अक्कलकोट रस्त्यावरील महालक्ष्मी मंदिराजवळ योग्य वाहतूक व्यवस्थेअभावी वारंवार अपघात घडत आहेत. या परिसरात एक लाख नागरिकांची वस्ती आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेसाठी महालक्ष्मी मंदिराजवळ उड्डाणपूल करण्यात यावा, अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी राज्य सरकारकडे केली.

### महापालिकेतील २४९ रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घ्यावे

सोलापूर महानगरपालिकेचे २४९ कर्मचारी १९९५ पासून रोजंदारीवर काम करत आहेत. यातील काहींचे निधन झाले आहे तर यातील ८० टक्के कर्मचारी आगामी दोन-तीन वर्षात निवृत्त होणार आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना न्याय देण्यासाठी कोल्हापूर महानगरपालिकेप्रमाणे निर्णय घेऊन २४९ कर्मचाऱ्यांना कायमसेवेत घ्यावे, अशी आग्रहाची मागणीही आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी केली.

# व्याजाचे पैसे देऊन सुद्धा ठार मारण्याची धमकी

## लिमयेवाडीच्या कुमार व सोमनाथ जाधव यांच्याविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. ११ मार्च-**

व्याजाचे पैसे रोख स्वरूपात व खात्यावर देऊन सुद्धा, वारंवार पैसे देण्यासाठी मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याबद्दल दोघांविरोधात सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

दि. १० डिसेंबर २०२५ रोजी सुरेश रामन्ना निंबागल (वय ५१ रा. ७६ साईश नगर, नवीन आरटीओ ऑफिस विद्यानगर शेजारी) हे साईबाबा चौक लिमयेवाडी रोडकडून घराकडे जात असताना कुमार जाधव व सोमनाथ जाधव हे त्यांच्यासोबत बळजबरी डी आर एम ऑफिस जवळील बँक ऑफ इंडियामध्ये घेऊन गेले.




घरावर साधारण ३६ लाख रुपये कर्ज आहे. कुमार जाधव व सोमनाथ जाधव हे म्हणाले की तुमचे कर्ज आम्ही फेडतो तुम्ही काळजी करू नका असे म्हणून हनुमान मंदिरजवळ येथे घेऊन गेले. दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी हनुमान मंदिर जवळ लिंगेवाडी येथे बोलवून घराचे साठेखत अगर इसारा पावती करून द्या, नाहीतर तुला व तुझ्या बायकोला सोडणार नाही. तेव्हा घाबरून कोणताही कागद न वाचता त्यांच्या सांगण्याप्रमाणे निंबागल यांनी सह्या केल्या. १२ डिसेंबर २०२५ रोजी कुमार व सोमनाथ जाधव यांनी त्यांची कार क्रमांक एम एच १३ सीएस १८१९ या चारचाकी कारमध्ये मारहाण करून तुला खल्लास करण्याची धमकी देऊन विद्यानंद को-ऑपरेटिव्ह बँक विजापूर रोड येथे घेऊन गेले. तेथे बँकेतून निंबागल यांच्या खात्यावरून ५ लाख रुपये असे दोन वेळा एकूण १० लाख रुपये काढण्यास सांगितले. १० लाख रुपये काढल्यानंतर ही रक्कम कुमार जाधव व सोमनाथ जाधव यांच्या सांगण्याप्रमाणे गोट्या नावाच्या इसमास दिली. कुमार जाधव व सोमनाथ जाधव यांनी तू आम्हाला वीस लाख रुपये आत्ताच्या आत्ता काय पण करून दे नाहीतर घरावर कब्जा करणार आहे. म्हणून धमकी देऊन तेथून निघून गेले. तसेच २५ लाख रुपयांमध्ये माझ्याकडून बळजबरी इसारा पावती नोटरी व सह्या घेऊन कब्जा करणार आहोत. कुमार जाधव यांच्याकडून घेतलेल्या व्याजाचे पैसे रोख स्वरूपात व त्याच्या खात्यावर ६ लाख ५९ हजार रुपये व सोमनाथ जाधव यांचे लाईट बिल व इतर असे एकूण ४ लाख ८८ हजार ४८९ रुपये असे पैसे ऑनलाइन पाठविले. तरी देखील वारंवार पैसे देण्यासाठी मारहाण करतात व धमकी देतात कुमार जाधव व सोमनाथ जाधव यांनी वेळोवेळी मारहाण करून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने चारचाकी मध्ये बळजबरी घेऊन जाऊन घर नाममात्र ३७ लाख रुपये इसारा पावती व खोटी नोटरी केली. त्यामुळे कुमार यल्लाप्पा जाधव (रा. लिमयेवाडी) व सोमनाथ विठ्ठल जाधव (रा. साईबाबा मंदिर लिमयेवाडी) यांच्या विरोधात सलगर वस्ती पोलीस ठाणे दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास खामकर करीत आहेत.

# फेरवैद्यकीय तपासणी टाळणाऱ्या दिव्यांग शिक्षकांवर कारवाईची टांगती तलवार

## शिक्षणाधिकारी सीईओंना सादर करणार अहवाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मार्च-**

दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी प्रक्रिया सुरू आहे. फेरवैद्यकीय तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिले होते. मात्र काही शिक्षकांनी अद्यापही तपासणीचा अहवाल सादर न केल्याने संबंधित शिक्षकांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख यांनी दिली.

सरकारी नोकरी मिळवण्यासाठी काही जणांनी दिव्यांग प्रमाणपत्राचा गैरवापर केल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. काही प्रकरणांत बनावट प्रमाणपत्रांचा वापर झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर राज्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत सर्व प्रशासकीय विभागांना दिव्यांगांची फेरपडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. यामध्ये संबंधित कर्मचाऱ्यांची फेरवैद्यकीय तपासणी करून युआयडी कार्डची पडताळणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार जिल्हा परिषद शिक्षण विभागाने २० शिक्षकांना मुंबई येथील जे. जे. रुग्णालयात फेरवैद्यकीय तपासणी करून अहवाल सादर करण्यास सांगितले होते. दरम्यान, सीईओ जंगम यांनी या २० शिक्षकांची सुनावणीही घेतली होती. त्यावेळी सर्वांना फेरतपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश होते. त्यापैकी काही शिक्षकांनी अहवाल सादर केला असला तरी काही शिक्षकांकडून अहवाल प्राप्त झालेला नाही. अहवाल सादर न करणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव सीईओंकडे पाठविण्यात येणार असल्याचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

### त्या शिक्षकावर कारवाई प्रस्तावित

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या २० शिक्षकांची सुनावणी घेतली होती. या सुनावणीत फेरवैद्यकीय तपासणी करून अहवाल सादर करण्यासंदर्भात कळविले होते. २० पैकी काहीं शिक्षकांनी अद्यापपर्यंत अहवाल सादर केला नाही. अहवाल सादर न केलेल्या शिक्षकांवर कारवाई करावी यासंदर्भातील प्रस्ताव पाठविणार आहे.

**- कादर शेख,**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद

# आयुष्मान कार्डसाठी नवी संगणक प्रणाली; रुग्णांचे हाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मार्च-**

नवीन अद्यावत संगणक व सॉफ्टवेअर प्रणाली लागू झाल्यानंतर आयुष्मान कार्ड काढण्याच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असून यामुळे रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः गरीब, अशिक्षित, कॅन्सरग्रस्त, डायलेसिस व इतर गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना उपचार मिळवताना अडथळे निर्माण होत असल्याची तक्रार आरोग्यमित्रांनी केली आहे.




पूर्वी आयुष्मान योजनेत नाव नोंदणी करण्यासाठी पिवळे, केशरी किंवा शुभ्र शिधापत्रिका, आधार कार्ड तसेच आवश्यक असल्यास मतदान ओळखपत्र, बँक पासबुक, पॅन कार्ड, जन्म दाखला किंवा प्रतिज्ञापत्र अशा कागदपत्रांवर नोंदणी केली जात होती. मात्र नव्या सॉफ्टवेअर प्रणालीमुळे अनेक लाभार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया अडकत असून कार्ड मिळण्यात विलंब होत आहे. सद्यस्थितीत आयुष्मान कार्ड उपचारासाठी बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु अनेक रुग्णांचे कार्ड वेळेत निघत नसल्याने त्यांना उपचार मिळण्यात अडथळे येत आहेत. काही प्रकरणांमध्ये अर्ज मंजुरीसाठी पाठविल्यानंतरही पेंडिंग रिझन किंवा रिमार्क दिसत नसल्यामुळे प्रक्रिया नेमकी का अडकली आहे, हे समजत नसल्याची तक्रार आहे. तसेच अनेक लाभार्थ्यांचे रेशन कार्ड ऑनलाइन असतानाही त्यांचे आयुष्मान कार्ड तयार होत नसल्याने त्रास वाढत आहे. लहान मुलांचे तसेच नवजात बालकांचे आयुष्मान कार्ड निघत नसल्यामुळे त्यांना योजनेचा लाभ मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. वडिलांचे आयुष्मान कार्ड नसल्यास नवजात बालकाला लाभ मिळत नसल्याची परिस्थितीही निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून, आयुष्मान कार्ड उपलब्ध नसल्यास रेशन कार्ड व आधार कार्ड ही कागदपत्रे ग्राह्य धरून रुग्णांना उपचाराची परवानगी द्यावी, अशी मागणी आरोग्य मित्रांनी केली आहे.

**कायमस्वरूपी सेवा व वेतनवाढ मागणी**

गेल्या १३ वर्षांपासून आरोग्यमित्र या योजनेत काम करत असूनही त्यांना खासगी टी.पी.ए. कंपनीमार्फत केवळ १४,७११ रुपये इतके अल्प मानधन दिले जाते. आरोग्यमित्रांना कायमस्वरूपी सेवा व वेतनवाढ द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.




सोलापूर : आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा पडल्याने डोणगाव रोडवरील नागनाथ मंदिर परिसरात ग्राहकांच्या रांगा लागल्या होत्या. बुधवारी टिपेलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)

### तक्रार प्रलंबित ठेवल्याप्रकरणी

# महापालिकेतील ५५ अधिकारी-कर्मचाऱ्यांना दंड

**सोलापूर :** नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अखेर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार विविध विभागातील ५५ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंड ठोठावला असून एकूण १७ हजार रुपयांचा दंड मार्च २०२६ पेड इन एप्रिलच्या वेतनातून वसूल केला जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विभाग, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, बांधकाम परवाना, विविध झोन कार्यालय, आरोग्य विभाग तसेच इतर संबंधित विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विविध सेवा विहित कालावधीत न दिल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.



# डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी विकास कस्तुरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मार्च-**

अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्याच्या सोलापूर शहर नूतन पदाधिकाऱ्यांची निवड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी जाहीर केली असून अध्यक्षपदी विकास कस्तुरे, कार्याध्यक्षपदी सचिन जाधव, उपाध्यक्षपदी विक्रम इंगळे, तर सचिव पदी शिवाजी सावंत यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. सोलापूरच्या शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. या बैठकीत डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सतीश सावंत, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण नागणे, सोलापूर जिल्हाध्यक्ष सचिन कुलकर्णी यांची उपस्थिती होती. त्यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांना राजा माने यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

**ही आहे नूतन कार्यकारणी**

पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष: प्रशांत कटारे, पश्चिम महाराष्ट्र संघटक : परशुराम कोकणे, रवींद्र जोगीपेठकर : सरचिटणीस, इमरान सगरी : उपाध्यक्ष, चंदन बोल्लू : खजिनदार, शिवाजी सावंत : सचिव, शहानवाज शेख : संघटक, अकबर बागवान : प्रसिद्धीप्रमुख










**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## घरात एकटी असलेल्या १५ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**ढोकी, दि.११ मार्च -**

घरात एकटी असलेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर गावातील एका तरुणाने घरात प्रवेश करून लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एका गावातील १५ वर्षीय मुलगी (नाव व गाव गोपनीय) ही डिसेंबर २०२५ ते दि.९ मार्च २०२६ या कालावधीत घरी एकटी असल्याचे पाहून गावातील एका तरुणाने तिच्या घरात प्रवेश केला. त्यानंतर त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तसेच हा प्रकार कुणाला सांगितल्यास जीवे ठार मारण्याची धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



या प्रकरणी पीडित मुलीने दि.१० मार्च २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून ढोकी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### परंडा येथे मुलींच्या आत्मनिर्भरतेसाठी कराटे प्रशिक्षण

**परंडा, दि.११ मार्च -**

परंडा येथील जिल्हा परिषद उर्दू हायस्कूलमधील शालेय विद्यार्थीनींना जिल्हा परिषद धाराशिव यांच्या वतीने राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा योजना अंतर्गत ८० तासांचे कराटे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणाची सुरुवात दि.४ मार्चपासून करण्यात आली आहे. या प्रशिक्षणामुळे मुलींना स्वरक्षणासाठी मोठा फायदा होणार असून आजच्या काळात मुलींसाठी आत्मरक्षा कौशल्य अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. प्रशालेचे मुख्याध्यापक खतीब ए.ए. यांच्या मार्गदर्शनाखाली ब्लॅक बेल्ट सेकंड डॅन प्रशिक्षक संतोष शिंदे विद्यार्थिनींना कराटेचे प्रशिक्षण देत आहेत.



#### महिला दिनानिमित्त २० महिलांना शिलाई मशिन वाटप

**धाराशिव, दि.११ मार्च -**

सेरेंटीका रिन्यूएबल्सच्या यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त वाशी, भूम व कळंब तालुक्यातील २० महिलांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. यासाठी निवडलेल्या महिलांना येरमाळा येथे १० दिवसांचे शिलाई प्रशिक्षण देण्यात आले होते. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर कळंब तालुक्यातील गौर येथील हुतात्मा स्मारक येथे प्रमाणपत्र व शिलाई मशिन वितरण कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास गौरच्या सरपंच सुषमा देशमुख, सेरेंटीका रिन्यूएबल्सचे व्हाईस प्रेसिडेंट सुरजित नारायण, व्हाईस प्रेसिडेंट (लँड) प्रकाश पटेल, प्रकल्प व्यवस्थापक हरीष कुमार तसेच उषा सिलाई स्कूलचे परेश नागपुरे उपस्थित होते.



#### पांगरदरवाडी येथे ओपन जिमचे लोकार्पण

**तुळजापूर, दि.११ मार्च -**

तालुक्यातील पांगरदरवाडी येथे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून व्यायामशाळा विकास अनुदान योजनेतून उभारण्यात आलेल्या ओपन जिमचे लोकार्पण गावच्या प्रथम नागरिक सरपंच सिंधू पोफळे यांच्या हस्ते संपन्न झाले. या ओपन जिममुळे गावातील नागरिकांना व्यायामासाठी उत्तम सुविधा उपलब्ध झाली असून लहान मुले, महिला तसेच पुरुष या सर्वांना येथे नियमित व्यायाम करता येणार आहे. याप्रसंगी उपसरपंच सोमनाथ शिंदे, हणमंत मते, नागनाथ शेळके, नागनाथ मारडकर, श्रीराम शेळके, भारतबाई निंबाळकर, कृष्णात पोफळे, गणेश गायकवाड, नानासाहेब चव्हाण, आण्णा मोरे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.





#### गुरुदेव इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**वाशी, दि.११ मार्च -**

वाशी तालुक्यातील पारगाव येथील गुरुदेव इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाटिका आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत उपस्थितांची मने जिंकली. एलकेजी, यूकेजी व नर्सरीच्या विद्यार्थ्यांनीही आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. महिला दिनानिमित्त गावातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच काही महिलांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल खवले यांनी केले, तर प्रवीण डोके यांनी कार्यक्रमासाठी विशेष नियोजन केले. अर्चना डोके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

#### धाराशिवात १४१ प्रकरणांत १.१५ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.११ मार्च -**



धाराशिव शहर वाहतूक शाखा तसेच संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान दि.१० मार्च रोजी मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध एकूण १४१ प्रकरणे नोंदवून १ लाख १५ हजार रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

# नळदुर्ग-अक्कलकोट महामार्गासाठी १०५ कोटींचा निधी मंजूर

**रस्ता दोन पदरी होणार... आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांना यश... केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष आभार...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ मार्च -**

मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या महामार्ग ६५२ वरील नळदुर्ग ते अक्कलकोट या विभागाच्या पुनर्वसन व सुधारणेच्या कामाला अखेर केंद्र सरकारने हिरवा कंदील दिला आहे. या प्रकल्पांतर्गत उर्वरित १४.१७ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी १०५ कोटी १३ लाख रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देण्यात आली आहे. या कामामुळे हा महत्त्वाचा मार्ग दोन पदरी होणार असून प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुखकर होणार आहे.



विधानसभा निवडणुकीच्या कालावधीत नळदुर्ग येथील जाहीर सभेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या मार्गासाठी निधी देण्याचे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर निधी मंजूर झाल्याने आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांचे विशेष आभार मानले आहेत.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रानुसार हा प्रकल्प 'ईपीसी' (Engineering, Procurement and Construction) मोडवर राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत बांधकामासाठी सुमारे १०३ कोटी ४२ लाख रुपये तर पुढील १० वर्षांच्या देखभालीसाठी सुमारे १७ कोटी १ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. एकूण १०५ कोटी १३ लाख रुपयांच्या निधीला राष्ट्रपतींच्या वतीने मंजुरी देण्यात आल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

कामात पारदर्शकता आणि गुणवत्ता राखण्यासाठी मंत्रालयाने कडक अटी घातल्या असून काम सुरू होण्यापूर्वी तसेच कामादरम्यान रस्त्याची तपासणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच कार्यकारी अभियंत्यांना कामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल केंद्र सरकारकडे सादर करावा लागणार आहे.

या निर्णयामुळे धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्थेला मोठी चालना मिळणार असून अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

### जिल्ह्यातील पर्यटनाला चालना...

या महत्त्वाच्या मार्गामुळे नळदुर्ग, अक्कलकोट, तुळजापूर तसेच प्राचीन तेर येथील पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळणार आहे. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती वाढविण्याच्या प्रयत्नांना या निर्णयामुळे बळ मिळेल, असे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला गती मिळाली असून संतश्रेष्ठ गोरोबा काका मंदिराचे कामही प्रगतीपथावर आहे. तसेच नळदुर्ग येथे विविध विकासकामे सुरू आहेत. या नव्या मार्गामुळे ही सर्व पर्यटनस्थळे एकमेकांशी जोडली जाणार असून मोठ्या प्रमाणात पर्यटक जिल्ह्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे रोजगारनिर्मितीचे उद्दिष्टही साध्य होईल, असा विश्वास आ. पाटील यांनी व्यक्त केला.

## वॉशिंग सेंटर फोडून ४५ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मार्च -**

धाराशिव शहरातील तुळजापूर नाका परिसरात अज्ञात चोरट्यांनी वॉशिंग सेंटर फोडून सुमारे ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी सचिन शिवाजी पवार (वय २६, रा. शिंदेवाडी ता.जि. धाराशिव) यांनी तुळजापूर नाका येथील द. हंबीरे पेट्रोल पंपाजवळ वॉशिंग सेंटर चालवले आहे. ते दि.८ मार्च रोजी वॉशिंग सेंटर बंद करून गावी गेले होते. यावेळी अज्ञात चोरट्यांनी संधी साधून सेंटरमधील वॉशर मशीन व टूलकिट असा एकूण ४५ हजार रुपयांचा माल चोरून नेला.

या प्रकरणी दि.९ मार्च रोजी सचिन पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शिवसेनेचे विकी चव्हाण यांची झेडपीच्या गटनेतेपदी बिनविरोध निवड

### आ. तानाजीराव सावंतच्या हस्ते चव्हाण यांचा सत्कार...





**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा जिल्हा परिषद गटाचे नवनिर्वाचित सदस्य विकी चव्हाण यांची शिवसेना (शिंदे गट) च्या जिल्हा परिषद गटनेतेपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. मुंबई येथे झालेल्या बैठकीत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक तसेच आ. तानाजी सावंत यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर करण्यात आली.

सामान्य कार्यकर्त्याला गटनेतेपदाची मोठी जबाबदारी देण्यात आल्याने जिल्हाभरात या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू असून विविध स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे. तेरखेडा जिल्हा परिषद गटातून निवडून आलेले विकी चव्हाण हे पेशाने पैलवान असून त्यांनी राजकारणाच्या मैदानातही दमदार कामगिरी करत विजय मिळवला आहे. जिल्ह्यात सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या या निवडणुकीत भाजप, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस तसेच इतर पक्षांचे उमेदवार रिंगणात उतरले होते. त्यामुळे ही लढत जिल्ह्यात विशेष लक्षवेधी ठरली होती.

या निवडणुकीत प्रत्यक्षात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बिभीषण खामकर आणि शिवसेनेचे विकी चव्हाण यांच्यातच मुख्य लढत रंगली होती. ऐनवेळी धनुष्यबाणाची साथ सोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल झालेल्या दिग्गज नेते बिभीषण खामकर यांचा विकी चव्हाण यांनी ६३२ मतांनी पराभव करत विजय मिळवला होता. निवडणूक काळात जिल्हा परिषद निवडणुकीत आ. तानाजी सावंत यांना घेरण्याचा राजकीय डाव असल्याच्या चर्चाही राजकीय वर्तुळात रंगत होत्या. मात्र तेरखेडा जिल्हा परिषद गटातून सर्वाधिक मतांची आघाडी मिळवून देण्यात विकी चव्हाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे ते आ. सावंत यांचे जवळचे विश्वासू मानले जात असून, याच पार्श्वभूमीवर त्यांच्यावर गटनेतेपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवड १३ मार्च रोजी होणार असून हे पद कोणत्या पक्षाच्या वाट्याला जाणार याबाबतचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. ऐनवेळी राजकीय समीकरणात काय घडामोडी घडतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उपळाई पाटीजवळ भीषण अपघात; कारच्या धडकेत पादचारी जागीच ठार

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.११ मार्च -**

येरमाळा ते धाराशिव राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर उपळाई पाटीजवळ झालेल्या भीषण अपघातात एका पादचाऱ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात कार चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मयत जयराम गोपीनाथ मुंढे (वय ३७, रा. उपळाई ता. कळंब जि. धाराशिव) हे दि.२७ फेब्रुवारी रोजी येरमाळा ते धाराशिव जाणाऱ्या एनएच-५२ मार्गावर उपळाई पाटीजवळून पायी जात होते. यावेळी एमएच ११ ईसी ६६५८ क्रमांकाची कार चालक मुस्ताफा नब्बीलाल तांबोळी (रा. धोकबाभळगाव, ता. मोहोळ जि. सोलापूर) याने कार भरधाव व निष्काळजीपणे चालवत मुंढे यांना जोरदार धडक दिली. या अपघातात जयराम मुंढे हे गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी मयताचे वडील गोपीनाथ दत्तु मुंढे (वय ६५, रा. उपळाई) यांनी दि.१० मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात आरोपी कार चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## बावची विद्यालयात विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.११ मार्च -**

बावची विद्यालय, परंडा येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयावर विविध मॉडेल्स व प्रयोग सादर करून आपला वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कल्पकता प्रभावीपणे मांडली.या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध प्रयोग स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे मुख्याध्यापक नारायण खैरे यांच्या हस्ते बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

इयत्ता ५ वी : प्रथम डोके राज प्रमोद व बुलबुले युवराज संतोष, द्वितीय शेख मोहम्मद नवाज मुदस्सर व जेधे कुबेर आकाश, तृतीय शिंदे भार्गवी महेश. इयत्ता ६ वी : प्रथम वळवी शौर्य सुरज, दोरगे समर्थ दिपक, तिंबोळे संग्राम दादासाहेब व शेख सलमान, द्वितीय शिंदे तन्मय बालाजी, बुलबुले संस्कार सागर, मशायक मुस्तकिम मुज्जमिल व राऊत दिग्विजय युवराज, तृतीय भिस्ते सार्थक व जाधव ऋतुराज. इयत्ता ७ वी : प्रथम संभव शंकर पवार व अभिनव लक्ष्मण ढगे, द्वितीय अक्षरा माधव तिडके, मृण्मयी अभय कुलकर्णी, श्रावणी अमोल पोळ व श्रद्धा दत्ता कांबळे. इयत्ता ८ वी : प्रथम क्षिरसागर सोहम कांतीलाल व काशीद वेदांत धनाजी, द्वितीय बुरंगे आदर्श दत्तात्रय.

या कार्यक्रमास विज्ञान शिक्षक, इतर शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## नळदुर्ग बसस्थानकातील आरओ प्लॅन्ट बंद; प्रवाश्यांची तहान विकत्रीच्या पाण्यावर



### ऐन उन्हाळ्यात वृद्ध प्रवाशांची पाण्यासाठी गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ मार्च -**

ऐन उन्हाळ्यात नळदुर्ग बसस्थानकातील आरओ प्लॅन्ट बंद पडल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. परिणामी अनेक प्रवाशांना पिण्याचे पाणी विकत घेऊन तहान भागवावी लागत असून राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन हा आरओ प्लॅन्ट सुरू करावा, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

नळदुर्ग बसस्थानकात येथील भाजप पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उमेश नाईक यांनी त्यांचे चुलते राजाभाऊ नाईक यांच्या स्मरणार्थ प्रवाशांना शुद्ध व थंडगार पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने स्वखर्चाने आरओ प्लॅन्ट बसवून दिला होता. दि.१८ ऑक्टोबर २०१६ रोजी हा आरओ प्लॅन्ट बसविण्यात आला. मात्र सध्या महामंडळाच्या दुर्लक्षामुळे हा प्लॅन्ट बंद अवस्थेत असून प्रवाशांना त्याचा लाभ मिळत नाही.

नळदुर्ग बसस्थानक हे सुमारे ६० ते ७० खेड्यांसाठी मध्यवर्ती ठिकाण मानले जाते. या बसस्थानकातून दररोज राज्य व परराज्यातील शेकडो बसगाड्या ये-जा करतात. त्यामुळे येथे कायम प्रवाशांची मोठी वर्दळ असते. विशेषतः ग्रामीण भागातील महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते. सध्या बसस्थानकात येणाऱ्या प्रवाशांना १५ रुपये देऊन पाण्याची बाटली विकत घ्यावी लागत आहे. विशेषतः सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने आणि महिला व ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्यात सवलत मिळत असल्यामुळे बसस्थानकात प्रवाशांची गर्दी वाढली आहे.

उन्हाळ्यात प्रवाशांना शुद्ध व थंडगार पाणी मिळावे या उद्देशाने बसविण्यात आलेला आरओ प्लॅन्ट तात्काळ सुरू करावा, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## तुळजापूर शहरात दूषित पाणीपुरवठा; काँग्रेस नगरसेवकांची जलशुद्धीकरण केंद्राला भेट



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ मार्च -**

तुळजापूर शहरात मागील काही दिवसांपासून पाणीपुरवठ्यातून दूषित व पिवळसर रंगाचे पाणी येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या नगरसेवकांनी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करून नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत शहराला तात्काळ शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे.

सध्या शहरातील अनेक भागांत नळातून येणाऱ्या पाण्याला दुर्गंधी येत असून पाण्याचा रंगही बदललेला असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या संदर्भात पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी करून दूषित पाणीपुरवठा का होत आहे याची तात्काळ चौकशी करावी तसेच आवश्यक दुरुस्ती व उपाययोजना करून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या तक्रार निवेदनावर काँग्रेसचे गटनेते अमोल कुतवळ, नगरसेवक रणजीत इंगळे, आनंद जगताप, अक्षय परमेश्वर, चिन्मय मगर तसेच नगरसेविका प्रगती लोंढे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त...

### अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटारसायकलस्वाराचा मृत्यू

**शिरूर अनंतपाळ :** धामणगाव (ता. शिरूर अनंतपाळ) येथील संजीवकुमार प्रल्हाद जाधव (वय ५०) यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, संजीवकुमार



जाधव हे बुधवार दि. ४ मार्च २०२६ रोजी लातूरहून निलंग्याकडे मोटारसायकलवरून जात असताना जाऊ-आनंदवाडी पाटी जवळ सायंकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात ते गाडीवरून खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी अद्याप गुन्हा नोंद झालेला नसल्याची माहिती किलारी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणेश यादव यांनी दिली. मृत संजीवकुमार जाधव हे उमरगा (ता. धाराशिव) येथील भू-करमापक कार्यालयात मोजणीदार कर्मचारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्र्चात पत्नी, दोन मुले, एक भाऊ आणि दोन बहिणी असा परिवार आहे. मंगळवारी सकाळी १०.३० वाजता धामणगाव येथील सार्वजनिक स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ते धामणगाव येथील किराणा व्यापारी नारायण जाधव यांचे मोठे बंधू होत.

### संतांच्या स्पर्शाने अन्नाचा प्रसाद होतो ! :सद्गुरू गुरूबाबा महाराज औसेकर



**शिरूर अनंतपाळ :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे तळेगाव (बोरी) येथील एकनाथ षष्ठी निमित्ताने सद्गुरू गुरूबाबा औसेकर यांच्या चक्री भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पंढरीची वारी असो वा नाथांचा उत्सव यात आलेला भाविक भक्त आपल्या व्यवस्थेपेक्षा नामस्मरण व घडेल ती सेवा करण्यात धन्यता मानतो दररोज घरी भोजन करतो ते अन्न आणि नाथांच्या उत्सवात संतांचा स्पर्श होऊन सेवन केलेले अन्न हा महाप्रसाद असतो असे २२९ व्या नाथषष्ठी उत्सवात श्री एकनाथ षेष्ठी रोजी तळेगाव( ता.शिरूर अनंतपाळ) येथील उत्सव मंडपामध्ये सद्गुरू गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या प्रासादिक चक्रीभजन नंतर भक्ताशी संवाद साधताना महाराज बोलत होते. नाथांचा हा उत्सव म्हणजे एक प्रसाद आहे व जो प्रसाद वंश परंपरा सेवन केला तरी तो कधी संपणार नाही हे संत वचनाद्वारे स्पष्ट केले.

काल रंगपंचमी झाली आज मूळ नाथांच्या पुण्यतिथीचा दिवस तळेगाव येथील नाथांच्या मंदिरात आपण त्यांना मनोभावे नतमस्तक होऊन भक्ती सेवा घडावी अशी प्रार्थना केली म्हणजेच आपल्याला सुख समाधान आणि शांती याचा लाभ आपोआप मिळून साधनेतून व सेवेतून आपले जीवन कृथार्थ होईल हा दृढ विश्र्वास शेवटी गुरुबाबानी व्यक्त केला.

याचकाची तृप्ती मनोरथे पुरती पुरोनिया उरती घ्यावयाशी... अशा या उत्सवात पहाटे आपल्याला काकडा ऐकवणारे निलंगा तालुक्यातील बामणी गावचे गोविंदराव पाटील यांचा गोड आवाज पहाटे कानी पडला म्हणजे अंतकरणात भक्तीची ज्योत प्रज्वलित होते आणि बापूंचा काकडा गोड आवाजातला काकडा ऐकतच राहावा असे वाटते देवाला अत्यंत सलगीने बापू काकड्यातून उठवतात व सर्वांनाच आनंद देतात त्याचप्रमाणे गुरु भक्त महादेव स्वामी सलगरकर हे स्वामी आहेत त्याचप्रमाणे चक्रीभजनातील पंडित बंधू यांची मृदंग सेवा तशीच कौतुकास्पद असल्याचे गौरव उद्गार गहिनीनाथ महाराजांनी यांनी यावेळी समारोप प्रसंगी काढले.

### देवणी तालुका सोशल मीडिया तालुकाध्यक्षपदी प्रताप कोयले

**देवणी:** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची व स्व.अजित दादा पवार यांची विचारधारा जनसामान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया हे खूप मोठे माध्यम आहे. सर्वसामान्य कष्टकरी गोरगरीब शेतकरी यांच्यासाठी त्यांनी केलेली कामे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया हे अतिशय उत्कृष्ट माध्यम आहे. यासाठी अत्यंत वैचारिक लोकांची गरज असणं खूप गरजेचं असतं या सर्व गोष्टीचा विचार करून गेली पंधरा वर्षे पत्रकारितेत अतिशय निर्भीडपणे काम करणारे प्रताप कोयले बोरोळकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया देवणी तालुका अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस तथा प्रदेश प्रवक्ते सुरज दादा चव्हाण यांच्या हस्ते निवड करून सत्कार करण्यात आला. यावेळी हेर मतदार संघाचे माजी आमदार धर्माजी सोनकवडे देवणी पंचायत समितीचे सदस्य गजानन भोपनीकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस मनोज कन्नाडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष विठ्ठल पाटील, बोरोळ ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच कृष्णा पाटील, नगरसेवक प्रा.अनिल इंगोले,जिल्हा सरचिटणीस अनिल कांबळे, अनिल देवांगरे, बबन होनमाने,सुचित लासोने, जनक बिरादार, उपस्थित होते. या निवडीबद्दल राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रितम आष्टूरे,कार्याध्यक्ष अजय भोळे,जितेंद्र शिवगे,बोरोळ ग्राम पंचायत सदस्य अनिल बिरादार, दत्ता चाळकापुरे, रितेश सूर्यवंशी, सत्यदेव गरड, संतोष पंढरपूरे, शाकीर पठाण,दस्तगीर पठाण,पुंडलिक सुर्यवंशी, प्रदीप बालुरे, माजिद मुंजेवार सह अदिंने अभिनंदन केले.

# हनुमान आराधनाचा महाप्रसाद व श्रद्धा आंदोलनासाठी बळ देईल - मनोज जरांगे-पाटील

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ११ मार्च :** मराठा समाजाला जोपर्यंत सगेसोयरे नुसार पूर्ण आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत हा लढा सुरूच राहणार आहे. या लढ्यासाठी निलंगा तालुक्यातील माकणी (थोर) येथील जागृत हनुमान देवस्थान आराधनाचा महाप्रसाद आणि श्रद्धा मला भविष्यातील आंदोलनासाठी बळ देईल असा विश्र्वास मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले.

मंगळवार दिनांक १० मार्च रोजी निलंगा तालुक्यातील माकणी थोर येथे निलंगा येथील सगरे डिजिटल फोटो स्टुडिओचे मालक पिंटू सगरे यांच्या परिवाराच्या वतीने हनुमान आराधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या आराधना कार्यक्रमासाठी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी उपस्थित समाजबांधवांशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की,

माझ्याकडे धनगर, मुस्लिम, दलित अशा कोणत्याही जातीतील व्यक्ती आला तरी मी त्यांचा प्रश्र्न सोडवण्यावर भर दिला आहे. कधीच जातीवाद केला नाही मराठा समाजाला आरक्षण तर मिळाले मात्र त्यांचे दैनंदिन निर्माण होणारे प्रश्र्न सोडवण्याचे ही आमची जबाबदारी आहे. त्यामुळे मला फक्त एक वर्ष द्या तुमचे सर्वच प्रश्र्न मी सोडवल्याशिवाय स्वस्त बसणार नाही.

एका बाजूला आध्यात्मिक वातावरण आणि दुसऱ्या बाजूला सामाजिक चळवळीचे केंद्रबिंदू असलेले जरांगे पाटील यांच्या उपस्थितीमुळे या आराधना कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. या सोहळ्याला लातूर जिल्ह्यासह शेजारील जिल्ह्यांतूनही मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

यावेळी पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की मी कधीच जातीभेद केला नाही कोणत्याही जातीच्या व्यक्तीला न्याय देण्याचा प्रयत्न केला मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे मराठा समाजातील शिक्षण घेणाऱ्या गोरगरिबाचे मुले मोठ्या पदावर गेले पाहिजेत हा माझा प्रमुख ध्यास आहे.. मराठा समाजाला आरक्षण दिले परंतु केवळ आरक्षणामुळे हा प्रश्र्न सुटणार नाही तर त्यांच्या त्यांच्या कुटुंबातील मूलभूत अडचणीही आपण सोडवल्या पाहिजेत. मराठा समाजातील त्यांचे आरक्षणासह अनेक ज्वलंत प्रश्र्न आहेत याबाबतही गांभीर्याने विचार करणे गरजेचे असून हे कांही राजकीय व्यासपीठ नाही तर एक आध्यात्मिक व्यासपीठ आहे. या गावातील हनुमान आराधनेचा महाप्रसाद आणि श्रद्धा नक्कीच भविष्यातील आंदोलनासाठी प्रेरक ठरेल अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.



निलंगा तालुक्यातील माकणी थोर या गावातील हनुमान आराधना गेल्या अनेक वर्षांवर्षापासून प्रसिद्ध आहे. विविध क्षेत्रातील मंडळी येथील हनुमानाला आपल्या मनातील इच्छापूर्तीसाठी नवस बोलत असतात. आणि त्याच्या पूर्ततेसाठी आराधना म्हणून महाप्रसाद केला जातो. आराधना आठवड्यातील शनिवारी व मंगळवारी असते जिल्ह्यातील अनेक भाविक भक्त महाप्रसादासाठी उपस्थित असतात. या आराधण्याचे वैशिष्ट्य म्हणजे येथे भाकर, वेसर, सपक दाळ, भात असे भोजन एकाच वेळी एकाच पंक्तीमध्ये बसून भाविक भक्त याचा आस्वाद घेतात.

# सा.बां. उपविभागाच्या अद्ययावत इमारतीसाठी २ कोटी मंजूर

**भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिलेली माहिती**

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ११ मार्च :** रेणापूर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या नवीन अद्यावत कार्यालय इमारत बांधकामासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात १ कोटी ९३ लक्ष ५५ हजार रुपयाची मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत विविध कामांना गती मिळावी सदरील विभागाच्या कार्यालयाची इमारत अद्यावत सुसज्ज व्हावी यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना रेणापूर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या कार्यालय इमारत नव्याने बांधकाम करण्यासाठी १ कोटी ९३ लाखाची तरतूद केली असल्याचे जाहीर केले.



रेणापूर येथे सध्या असलेली सार्वजनिक बांधकाम उपविभागाची दोन मजली इमारत अत्यंत जीर्ण झाली असून अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या १ कोटी ९३ लक्ष ५५ हजार रुपये खर्चाच्या नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतीत उपविभागीय अधिकारी यांचे कक्ष, शाखा अभियंता यांचे कक्ष, कार्यालयीन कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येणार असून सर्व सोयीनेयुक्त अशी एक मजली भव्य वास्तू उभारण्यात येईल अशी ही माहिती आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

# पूर्वीच्या मातृका म्हणजे आजच्या प्रेरिका, त्यांना देवी देवता समजून कर्मकांड करणे हे चुकीचे- टोम्पे

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ११ मार्च :** भारतामध्ये प्राचीन काळात मातृसत्ताक कुटुंब पद्धती होती. प्रत्येक टोळीच्या , गणाच्या गणप्रमुख्य महिला असायच्या, त्या अत्यंत धाडसी, कर्तबगार व शूरवीर होत्या.आज ज्या पद्धतीने देवी देवतांना चमत्कार जोडलेले आढळतात तसे ते पूर्वी नव्हते. पूर्वीच्या मातृका म्हणजे आजच्या प्रेरिका, त्यांना देवी देवता समजून कर्मकांड करणे हे चुकीचे असल्याचे मत व्याख्यात्या, मिथकशास्त्र अभ्यासक, संस्कृती संशोधक स्नेहाताई टोम्पे यांनी व्यक्त केले.

त्या अहमदपूर येथे मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडच्या संयुक्त विद्यमाने आयोजत केलेल्या जिजाऊ -सावित्री व्याख्यानमालेत पहिले पुष्प ' स्त्री -काल आज आणि उद्या ! ' या विषयावर बोलत होत्या. प्रारंभी टोम्पे यांच्या हस्ते सावित्री-जिजाऊंच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

व्याख्यान करत असताना स्नेहाताई टोम्पे यांनी अनेक मिथकांचे स्पष्टीकरण देत आपला विषय स्पष्ट केला. मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातून बघितले तर पूर्वीच्या मातृका ह्याच आजच्या प्रेरिका आहेत. वेगवेगळ्या प्रकारची आपण कुलचिन्ह बघतो यामध्ये विशेषता निसर्गाच्या घटकांचा अवलंब केलेला आहे म्हणजे एखादा समूह हत्तीच्या सानिध्यात राहत असेल त्यांच्या जीवन उपयोगी कार्यात हत्ती मदत करत असेल तर त्यांनी हत्तीचे चिन्ह स्वीकारले असेच कोणी चंद्राचे कोणी नाक कोणी वृक्ष वेली पशु पक्षी हे कुलचिन्ह स्वीकारले. अशाच पद्धतीने ही



कुलचिन्ह तयार झालेले आहेत त्याचा इतिहास आणि त्या मागचे मिथक आपण समजून घेतले पाहिजे. सत्य काय आहे हे आपण शोधलं पाहिजे. आपलं काय आहे हे आपण शोधलं पाहिजे, तपासलं पाहिजे आणि त्यामधलं सत्व आपण स्वीकारल पाहिजे. मराठ्यांची कुलदेवता यामध्ये विविध कुलाच्या विविध कुलदेवता आहेत परंतु प्रामुख्याने तुळजाभवानी ही मराठ्यांची मुख्य स्त्री कुलदेवता आहे. तुळजाभवानीच्या मूळ मूर्ती कडे जर पाहिले तर तिच्या हातामध्ये त्रिशूल, धनुष्य अशी विविध आयुधे आहेत. डाव्या हातामध्ये शेंडी धरलेला मनुष्याचा मुखवटा आहे. ह्या सर्वांकडे बघितले असता असे लक्षात येते की प्रत्यक्षात तिला दाखवलेले हात हे मिथक असून त्याचा अर्थ असा आहे की ती विविध आयुधे चालवण्यामध्ये सक्षम होती.

प्रथम पुष्पाचे सूत्रसंचलन दैवशाला लोहकरे यांनी जिजाऊ वंदना सरोजा भोसले, प्रास्ताविक जयश्री विरेंद्र पवार, व्याख्यातांचा परिचय मिनाक्षी जाधव यांनी तर आभार साधना लोहकरे यांनी मानले. यावेळी अनेक महिलां- भगिनींची उपस्थिती होती.

# विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल भविष्यात शैक्षणिक हब होणार : संतोष मुक्ता

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ११ मार्च :** आजच्या स्पर्धेतील युगाचे आव्हान पेलून दिवसेदिवस होत असलेली प्रगती पाहता आगामी काळात विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुल शैक्षणिक हब होणार असे मत भाजपाचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता यांनी व्यक्त केले.

विज्ञान दिनाचे औचित्य साधून विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलच्या वतीने सायन्स एक्झिबिशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद् घाटन भाजपाचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते शिवानंद पाटील, भागीरथी शिवानंद पाटील जिल्हा परिषद सदस्या भागीरथी शिवानंद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य व संस्थेचे सचिव बसवेश्वर धाराशिवे, प्राचार्य किशोर जेवे, अमोल कुंभार, महिशंकर धाराशिवे, विकास मुगळे, विद्या कापसे, गोपाल दंडीमे, प्रकाश झुंजारे व जनार्धन कास्ते (माजी



पंचायत समिती सदस्य), ऋतिक धाराशिवे, विलास सगरे आदी यावेळी उपस्थित होते.

प्रा. मेघा मुळे यांनी 'रामन इफेक्ट' या वैज्ञानिक शोधावर प्रकाश टाकत त्याचे महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य किशोर जेवे यांनी शाळेची प्रगती, विविध शैक्षणिक उपक्रम व विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तसेच शाळेने स्थापनेच्या दुसऱ्याच वर्षी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवल्याचा उल्लेख केला.

या सायन्स एक्झिबिशनमध्ये एकूण १३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध विज्ञानाधारित प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व सादरीकरण कौशल्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले सौ. सायली देशमुख यांनी सुत्रसंचालन केले, तर प्रा. शितल डोंगरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ६९६ प्रमाणपत्रे वाटप, शेकडो प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ११ मार्च :** छत्रपती शिवाजी महाराज स्व-समाधान शिबिर अभियानांतर्गत शनिवारी निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी आणि कासारशिरसी महसूल मंडळात भव्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या दोन्ही शिबिरांच्या माध्यमातून सुमारे ६९६ विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले असून शेकडो प्रलंबित प्रकरणे जागीच निकाली काढण्यात आली. शासनाच्या योजना थेट जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या या उपक्रमाला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला.औराद शहाजनी येथील शिबिरात तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्या उपस्थितीत ४३ अर्ज निकाली काढण्यात आले, तर ५४३ नागरिकांना विविध दाखल्याचे वाटप झाले. कासारशिरसी येथे अप्पर तहसीलदार शिवाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली १५३ प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या दोन्ही ठिकाणी फेरफार प्रकरणे, ७/१२ दुरुस्ती आणि ८-अ उतारे वाटपाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आले. जि.प. सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि महसूल विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांन ी यावेळी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी हे शिबिर यशस्वी ठरल्याचे तहसीलदार कुलकर्णी यांनी नमूद केले.औराद शहाजनीत २८७ सात बारा औराद शहाजनी येथील शिबिरात महसूल विभागाने उल्लेखनीय कामगिरी केली. येथे ३४ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली असून २८७ नागरिकांना ७/१२ व ८-अ उतारे देण्यात आले.

# मैत्री शाळेतील बाकावरची आणि आठवणींच्या नात्यांची

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ११ मार्च :** तब्बल ३८ वर्षानंतर लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय उदगीर येथील ई.सन.१९८७ - ८८ दहावीचे विद्यार्थी शिवम रिसॉर्ट उदगीर या ठिकाणी एकत्र झाले. अतिशय मोठ्या संख्येने मित्र-मैत्रिणींची उपस्थिती त्याच सोबत आपल्या सर्व शिक्षक वृद्धांची उपस्थिती वाखाणण्याजोगी होती.





कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मुख्याध्यापक श्री देवेंद्र देवणीकर, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रमाकांत बनशेळकीकर, रामदास नारंगवाडे मल्लिकार्जुन उपरबावडे, रमाकांत शिरसागर, दुर्गा बनशेळकीकर,व्यंकटराव गुरमे,सरोज जनडकर, शांता मदने, उमाकांत बुधे, षण्मुखानंद मठपती, रंजनाताई जोशी, लक्ष्मीकांत नेलवाडकर यांना प्राचारण करण्यात आले. सर्व पाहुण्यांचा शाल, श्रीफळ, आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

अध्यक्षांचा सत्कार भाग्यश्री चव्हाण आणि क्रांती देशपांडे यांनी केला. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार डॉ. शिवकुमार संतपुरे, चंद्रशेखर बुधे शशांक देशपांडे, सुदेश मुक्कावार यांनी केला. नारंगवाडे गुरुजी यांचा सत्कार गजानन चिद्रेवार ,पांडुरंग कोटलवार ,शिवशंकर बिराजदार, रमेश गिरी यांनी केला. उमाकांत बुधे सत्कार दीपक मदने, सचिन कुलकर्णी ,संजय पाटील निशिकांत मिरकले, आचारे यांनी केला. मदने मॅडम यांचा सत्कार वंदना कुलकर्णी, रेखा मुंडे अमिल कंठवार यांनी केला. क्षीरसागर सरांचा सत्कार दिलीप दमकोडवार, बालाजी चिंचोलीकर डॉक्टर शेरीकर राजू नागठाणे यांनी केला. जनवाडकर सत्कार रजनी आणि अपर्णा यांनी केला. मठपती सत्कार शशांक करडखेलकर, सतीश गुडसूरकर, विठ्ठल शिंदे, जितेंद्र नेरणे, जगन्नाथ मुळे यांनी केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, इतर सर्व शिक्षक वृंद यांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. डॉ. राजकुमार बाबुराव घोनसीकर यांनी प्रस्तावना मांडली. यानंतर सर्व जमलेल्या वर्गमित्र आणि मैत्रिणींचा वैयक्तिक परिचयाचा कार्यक्रम झाला. आभार प्रदर्शन प्रसिद्ध ऍड सचिन कुलकर्णी यांनी केले. त्यानंतर सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजकुमार बाबुराव घोणसीकर यांनी चांगल्या पद्धतीने पार पाडलं. हा संपूर्ण कार्यक्रम पार पाडण्यासाठी जवळजवळ एक महिन्यापासून राजकुमार नागठाणे, दिलीप तोरणेकर, गजानन चिद्रेवार, संदीप चिद्रेवार, सुदेश मुक्कावार, पांडुरंग कोटलवार, रमेश गिरी बालाजी चिंचोलीकर सचिन कुलकर्णी, संजय पाटील, आचारे, सुधीर पेन्सलवार, राजू पेन्सलवार, लक्ष्मीकांत देवसेटवार, राजकुमार घोनसीकर, शंकर देवकते आणि इतर सर्व मित्रांनी भरपूर मेहनत घेतली.या कार्यक्रमास मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक माधव मठवाले पर्यवेक्षक किरण नेमट पर्यवेक्षक कृष्णा मारावार माजी विद्यार्थी संघटन प्रमुख नीता मोरे, सुरेखा शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या

## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार आजम उस्मान सय्यद, रा. इंद्रठाना, ता. रेणापूर जि. लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना किशन बाबुराव निकम, रा.लातूर, ता.जि. लातूर यांनी खरेदीखत दस्त क्रं. ल.त.र - १- ४३८०/१९८६, अन्वये खरेदीमालकीचा व कब्जेवहिवाटीचा प्लॉट मौजे. हरंगुळ (बु.) ता.जि.लातूर येथील जमीन गट नंबर ८३ पैकीचा प्लॉट नंबर २३ पुर्ण असून याची लांबी दक्षिण उत्तर ३३ फुट व रूंदी पुर्व पश्चिम ३३ फुट याचे एकूण क्षेत्रफळ १०८९ चौ. फुट आहे. याची चतुःसीमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस - २० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस प्लॉट नबर २२, दक्षिणेस प्लॉट नंबर ३२, उत्तरेस ३० फुट रुंदीचा रस्ता.

येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील प्लॉट विद्यमान मालकाकडुन लेखी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरचा प्लॉट हा निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर प्लॉट बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरचा प्लॉट हा निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर प्लॉटचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक ११/०३/२०२६

**तर्फे ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार. शाहू चौक,
लातूर मो नं.९४२१९ ८६४९५**

**जाहीर प्रगटन देणार
आजम उस्मान सय्यद
रा. इंद्रठाना, ता.रेणापूर जि.लातूर
मो. नं.९०२१८ ००१९५**

## परळीची सुवर्णकन्या आभा मुंडे इटलीतील पॅरा स्विमिंग वर्ल्ड सिरीज मध्ये करणार भारताचे प्रतिनिधित्व



तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ** | प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील विद्यावर्धिनी विद्यालयातील इयत्ता नववीत शिकणारी विद्यार्थिनी कु. आभा गणेश मुंडे हिची इटली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पॅरा स्विमिंग वर्ल्ड सिरिज स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा दिनांक ९ ते १५ मार्च दरम्यान इटलीतील लिग्नानो सब्बीयोडोरो येथे होणार असून ती या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

परळी सारख्या छोट्या शहरातून आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणारी आभा ही पहिली शालेय विद्यार्थिनी ठरत असल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या स्पर्धेत जगभरातील अनेक देशांतील खेळाडू सहभागी झालेले असतात व ही स्पर्धा आंतरराष्ट्रीय पॅरा स्विमिंग मालिकेतील महत्त्वाची स्पर्धा मानली जाते. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होत असल्याबद्दल शाळेतील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आभा मुंडे हिला शुभेच्छा दिल्या.

दरम्यान श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. एस. एस. कोळगे, उपाध्यक्ष श्री. एस. बी. भिंगोरे, सचिव श्री. पी. जी. ईटके, कोषाध्यक्ष श्री. पी. जे. पैंजणे, संचालक श्री. एम. टी. मुंडे, श्री. आर. पी. वाणी, श्री. बी. ए. चेवले, श्री. यू. एच. मातेकर, श्री. एस. एम. कराड तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. आर. जी. नीला, श्री. जे. व्ही. सुमठाणे, क्रीडा शिक्षक श्री. विजय मुंडे, श्री. बालासाहेब हंगरगे व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन करून इटलीत होऊ घातलेल्या या जागतिक स्पर्धेत आभाला सुवर्णपदक मिळवण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# आहार व तणाव रहित जीवन यावरच मानवी आरोग्य अवलंबून आहे - युवासंत चंद्रकांत (दादासाहेब ) मोरे

### परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे अभिष्टचिंतन निमित्त महा आरोग्य तसेच रक्तदान शिबीर संपन्न

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव** | गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स माजलगाव च्या तर्फे आयोजित परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त महा आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी युवासंत चंद्रकांत (दादासाहेब) मोरे बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, आपले आरोग्य आपल्या आहारावर अवलंबून आहे, मानवी आरोग्यासाठी षड्रस आवश्यक असते. सकस, सेंद्रिय अन्न यामुळे आरोग्य सुदृढ राहते. याबरोबरच आयुर्वेद, आजीबाईचा बटवा, घरगुती दैनंदिन वापरातील औषधी वस्तू याविषयी अनमोल माहिती दिली. मानवी आरोग्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे ताणतणाव आहे. आरोग्यदायी जीवनासाठी तणाव रहित राहिले पाहिजे. या शिबीराची सुरुवात दीपप्रज्वलन, श्री स्वामी समर्थ महाराज, धन्वंतरी, छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पूजन करून झाले.

यावेळी भव्य रक्तदान शिबीरही घेण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये २१३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या महा आरोग्य शिबीरात सर्व रोगांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले.

या शिबीराचे प्रास्ताविक करताना डॉ यशवंत राजेभोसले यांनी या महा आरोग्य शिबीराचे वैशिष्ट्य व पार्श्वभूमी मांडली. गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट च्या निर्मितीपासून आजपर्यंत ची यशस्वी वाटचाल ही भगवान दत्तस्वरूप श्री स्वामी



समर्थ महाराज व परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने चालू आहे. इवलेसे रोप लावियेले द्वारी! त्याचा वेलु गेला गगनावरी! फार्मसी कॉलेज सुरू केले आज बी ए एम एस, नर्सिंग, फिजिओथेरपी इत्यादी शिक्षणाची दारे खुली झाली याचे सर्व श्रेय परमपूज्य गुरुमाऊलींचे आहे म्हणूनच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज ॲंड कॅन्सर रिसर्च सेंटर हे नाव युनिटला दिले. यानंतर कॅन्सर तज्ञ डॉ. नंदकुमार पाणसे यांनी आपल्या मनोगतातून सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर चे सामाजिक उपक्रम व गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट ने आयोजित केलेले महा आरोग्य शिबीर हा स्तुत्य उपक्रम आहे व या शिबीरास शुभेच्छा दिल्या. या शिबीरात सणवार व्रत वैकल्याची मांडणी करण्यात आली होती तसेच विवाह संस्कार स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे मराठवाडा विभाग प्रतिनिधी संदीपभाऊ देशमुख, बीड जिल्हा प्रतिनिधी प्रा डॉ गोविंद साळुंके, अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी विजयराव कडु पाटील, युवा नेते रोहितभैय्या पंडित, बीड, परळी वै , अंबाजोगाई, धारुर, वडवणी, गेवराई, माजलगाव तालुक्यातील तसेच परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व साप्ताहिक, दैनिक केंद्रातील सेवेकरी भाविक, आरोग्यसेवा देण्यासाठी सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल चे डॉ शेवाळे, डॉ जयेश पाटील, डॉ राघवेंद्र राजेश्वरकर, डॉ महेश काळे, डॉ संभाजी लोंढे डॉ सौ विजया दुलांगे इत्यादी उपस्थित होते. तसेच माजलगाव शहरातील डॉ सुशील लोढा, डॉ प्रवीण वारकरी, डॉ संदीप नाटकर, डॉ अशोक घुबडे, डॉ गोळेकर, डॉ शशील पाचपोर, पत्रकार बांधव, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तसेच श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवाराने परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आरोग्य दुत बीड जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे यांनी केले.

## योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी बनवले एलईडी स्क्रीन



तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील प्रथम वर्षात शिकणाऱ्या संगणक अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपलब्ध प्रयोगशाळेत प्रा.निशांत मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली एलईडी स्क्रीन ची निर्मिती केली आहे. एलईडी स्क्रीन तंत्रज्ञानाच्या जलद प्रगतीमुळे विविध उद्योगांमध्ये माहिती वितरण आणि दृश्य अनुभवांसाठी उत्कृष्ट साधने उपलब्ध झाली आहेत. याच तंत्रज्ञानाच्या वापर करून एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध सूचना, अत्याधुनिक माहिती घेता येणार आहे. उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर,जेष्ठ सल्लागार प्रा. एम.एस. लोमटे,रमण सोनवळकर,मेजर एस. पी.कुलकर्णी,प्राचार्य रमण देशपांडे, विभागप्रमुख प्रा.रोहित कदम, प्रा.नारायण सिरसाट,प्रा.अतुल फड,प्रा.श्याम गडदे प्रा.बप्पासाहेब सोनवणे व पॉलिटेक्निकचे शिक्षक कर्मचारी उपस्थित होते..

## प्राथमिक विद्यालयांमध्ये पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी लाठीकाठी प्रशिक्षण सुरू



तभा. वृत्तसेवा

**बीड** | प्राथमिक विद्यालयांमध्ये पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी उपक्रमशील मुख्याध्यापिका श्रीमती बालिका ताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली श्री रवींद्र नागरगोजे सरांनी लाठीकाठी प्रशिक्षण सुरू केले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना विविध स्टेप्स शिकवत त्यांनी त्यांचे प्रात्यक्षिक शाळेतील विविध कार्यक्रमात आणि विद्यार्थी वार्षिकोत्सवात सादर केले. शिवजयंतीच्या निमित्ताने आयोजित शासकीय शिवजयंतीच्या कार्यक्रमात देखील उपस्थित मान्यवरांच्या व प्रेक्षकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिके करून दाखवले. या उपक्रमाची सर्व शाळा स्तरावरून योग्य अंमलबजावणीसाठी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह मा.श्र.हेमंतजी वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी मा.श्री. चंद्रकांतजी मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष मा.श्री. उमेशजी जगताप, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.श्री. सतीशजी कुलकर्णी यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला. या पाठपुराव्या निमित्त महाराष्ट्र सरकारने महिला सशक्ति करण्यासाठी शाळेमध्ये लाठीकाठी आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण सुरू करणार असल्याची घोषणा उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री मा.श्री.चंद्रकांतजी पाटील यांनी केली असून स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या शिरपेच्यात यामुळे मानाचा तुरा रोवला गेला आहे. याबद्दल सर्व स्तरातून संस्कार केंद्राचे कौतुक करण्यात येत आहे.

## स्वानंद काळे याची सांगली अर्बन शाखा माजलगाव येथे लिपिक पदी निवड



तभा. वृत्तसेवा

**बीड** | बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागाचा बीएस्सी तृतीय वर्ष २०२४-२०२५ चा माजी विद्यार्थी चिरंजीव स्वानंद संजय काळे यांची सांगली अर्बन बँक शाखा माजलगाव येथे लिपिक पदी निवड करण्यात आली. कोल्हापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशन मार्फत ही निवड झालेली आहे. याकरिता महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे, यांनी सत्कार केला. ते म्हणाले स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून होणारी निवड कौतुकास्पद आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ.सोपान सुरवसे , डॉ सुहास जोशी, स्टाफ सेक्रेटरी प्रा. संजय काळे, श्री अभिजीत पांडव उपस्थित होते. महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व प्राध्यापक यांनी. पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## टोकवाडी ग्रामपंचायतकडून माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती देण्यास टाळाटाळ

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | पारदर्शक कारभारासाठी महत्वाचा मानला जाणारा माहितीचा अधिकार कायदा (RTI) टोकवाडी येथील ग्रामपंचायतीत मात्र पायदळी तुडवला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. गावातील काही सजग नागरिकांनी विविध विकासकामे, निधी खर्च व प्रशासकीय निर्णयांबाबत माहितीच्या अधिकारातून माहिती मागितली असता ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी मॅडम यांच्याकडून वेळेत माहिती दिली जात नसल्याची तक्रार संजय श्रीराम मुंडे यांनी दिली.



माहिती अधिकार कायद्यानुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक असतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून नागरिकांना माहिती देण्यासाठी वारंवार टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जातोय. त्यामुळे काही नागरिकांना माहिती मिळवण्यासाठी थेट माहिती आयोगाची दारं ठोठावावी लागली.

दरम्यान, अशाच एका प्रकरणात संभाजीनगर येथील विभागीय माहिती आयुक्तांनी ग्रामविकास अधिकारी यांच्यावर १० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. मात्र दंडाची कारवाई होऊनही ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत कोणताही बदल झालेला दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीचा कारभार पारदर्शक व्हावा, माहिती अधिकार कायद्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि नागरिकांना वेळेत माहिती मिळावी, अशी मागणी टोकवाडीतील ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.

टोकवाडी (ता. परळी) येथील श्री. संजय श्रीराम मुंडे यांनी ग्रामपंचायतीच्या विविध कामकाजासंदर्भात माहिती मिळवण्यासाठी दि. २० जानेवारी २०२६ रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला होता. माहिती अधिकार कायद्यानुसार ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक असतानाही संबंधित ग्रामविकास अधिकारी मॅडम यांच्याकडून माहिती देण्यात आली नसल्याचे सांगितले जात आहे.

## माता पालक संघ व विशाखा समिती अंतर्गत कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात नगरपरिषद महिला सफाई कामगार सन्मान सोहळा संपन्न

**अंबड (प्रतिनिधी)** | या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आंबेजोगाई च्या उपाध्यक्षा सौ. ज्योती भाभी ठाकूर ,माता- संघ अध्यक्ष सौ.श्वेता कुलकर्णी ,माजी विद्यार्थी पवन जाधव, विशाखा समिती अध्यक्ष श्रीमती अनुराधाताई भाकरे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी सर, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधाकर घायतडक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री सुनील कुंभार सर यांनी तर ऋणनिर्देश माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधाकर घायतडक सर यांनी केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व भारतमाता यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील विद्यार्थिनींनी सामूहिक गीत यावेळी सादर केले. शाळेतील शिक्षिका सौ.रेखा देशमुख यांनी 'उंच आकाशी घे भरारी'ही कविता सादर केली.

यावेळी अंबड नगर परिषदेतील महिला सफाई कर्मचारी रूपाली संजय जाधव, प्रिया रवींद्र खरात, प्रतीक्षा महेंद्र खरात, माया मिलिंद बनसोडे ,अश्विनी शांताबाई खरात, रूखमणबाई राधेशाम जाधव, छायाताई महादेव वैद्य यांचा तसेच शाळेतील महिला शिक्षक व शिक्षक कर्मचारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## नगरसेविका नागरगोजेनी घेतली नागरिकांच्या तक्रारींची दखल
### बंद पडलेले बोर केले तात्काळ सुरु

तभा. वृत्तसेवा

**परळी (प्रतिनिधी)** | परळी शहरातील प्रभाग क्रमांक ४ मध्ये काही नविन व दीर्घकाळापासून बंद पडलेले बोरवेल तात्काळ दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत केल्याने प्रभाग चार मधील स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवनिर्वाचित नगरसेविका सौ. मीरा केशव नागरगोजे यांनी नागरिकांच्या मागणीकडे तत्परतेने लक्ष देत आवश्यक कामे हाती घेतली.



पाणीपुरवठा सभापती सौ.जयश्रीताई पापा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील मूलभूत सुविधांवर भर देण्यात येत आहे. स्वच्छता मोहीम, रस्त्यावरील दिवाबत्ती, नाल्यांची साफसफाई यासह नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या पाण्याच्या समस्येवरही तत्काळ उपाययोजना करण्यात आली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, धनगर गल्ली, उखळवेस गल्ली, गवंडी गल्ली तसेच भीमनगर परिसरातील बंद पडलेले बोरवेल दुरुस्त करून त्यावर पाईपलाईन व नळ वाल बसवण्यात आले. त्यामुळे या भागातील नागरिकांना पुन्हा नियमित पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. नगरसेविका सौ. मीरा केशवराव नागरगोजे यांच्या पुढाकारामुळे प्रभागातील पाण्याची समस्या मार्गी लागल्याने स्थानिक नागरिकांनी त्यांचे आभार मानले असून भविष्यातही प्रभागाचा विकास अशाच प्रकारे सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## 'आकांक्षित जिल्हा' योजनेत बीडचा समावेश, स्वाराती रुग्णालयाचा होणार कायापालट

**बीड, 11 मार्च** | मुंबईत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी जाहीर झालेल्या ऐतिहासिक तरतुदींचे जोरदार समर्थन केले. राज्याच्या अर्थसंकल्पात बीड जिल्ह्याचा 'आकांक्षित जिल्हा' योजनेत समावेश करण्यात आल्याने आता शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांसाठी केंद्र व राज्य सरकारकडून अतिरिक्त निधी उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ (स्वाराती) वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने 'मास्टर प्लॅन' मंजूर केला असून, आमदार मुंदडा यांनी यासाठी केलेल्या दीर्घकालीन पाठपुराव्याला अखेर मोठे यश आले आहे.

शेतकरी हिताचा विचार करून गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेची व्याप्ती वाढवत त्यात शेतमजुरांचा समावेश करण्याचा निर्णय कौतुकास्पद असल्याचे मुंदडा यांनी नमूद केले. तसेच महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त आगामी वर्ष 'सामाजिक समता वर्ष' म्हणून साजरे करण्याच्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले. कर्जमाफी आणि नैसर्गिक शेती अभियानामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळणार असून हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांच्या प्रगतीचा मार्ग सुकर करणारा असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले.

## धारूर घाटात भीषण अपघात: ३०० फूट खोल दरीत कोसळला टँकर

**बीड, 11 मार्च** | धारूर घाटातील एका धोकादायक वळणावर भीषण अपघात झाला. हैदराबादहून छत्रपती संभाजीनगरकडे माल घेऊन जाणारा टँकर सुमारे ३०० फूट खोल दरीत कोसळला. टँकरचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात घडला. दरीत कोसळताच टँकरने पेट घेतला आणि आगीच्या ज्वाळा उसळल्या. मात्र चालक महादेव बिक्कड यांनी प्रसंगावधान राखत टँकरमधून उडी मारल्याने मोठा अनर्थ टळला. किरकोळ जखमी झालेल्या चालकावर सध्या केज येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. या घाटात गेल्या वर्षभरातील ही सहावी मोठी दुर्घटना असून वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे धारूर घाट आता मृत्यूचा सापळा बनत आहे. प्रशासनाने घाटाचे रुंदीकरण आणि सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी आता जोर धरत आहे.

## स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात HPV लसीकरण मोहिमेची सुरुवात
### १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींनी लाभ घ्यावा – डॉ. शंकर धपाटे

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | आज दिनांक ९ मार्च २०२६ रोजी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे एचपीव्ही (HPV) लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मोहिमेचा राष्ट्रीय स्तरावर शुभारंभ करण्यात आला होता.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर तसेच आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला.

त्या अनुषंगाने दि. ९ मार्च २०२६ पासून अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागातील ओपीडी क्रमांक



२० येथे या लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शंकर धपाटे यांनी सांगितले की, एचपीव्ही लस ही प्रामुख्याने गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी दिली जाते. वय वर्षे १४ पेक्षा जास्त व १५ वर्षांखालील मुलींनी या लसीचा लाभ घ्यावा. ही लसीकरण मोहीम पुढील तीन महिने सुरू राहणार असून पालकांनी आपल्या मुलींना लसीकरणासाठी आणावे, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. राकेश जाधव, जनऔषध वैद्यकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर.सी. संबुटवाड, डॉ. विनोद वेदपाठक, सहयोगी प्राध्यापक डॉ. दिपाली देव, सहाय्यक प्राध्यापक डॉ. योगेश माने, डॉ. योगेश गालफाडे, डॉ. प्रमोद तोटावाड, वरिष्ठ निवासी डॉ. शेरॉन मुरमो, पदव्युत्तर विद्यार्थी सारिका पुरणवाड, इनचार्ज सिस्टर तसेच समाजसेवा अधीक्षक श्री. आशोक वाघोळे, आरोग्य शिक्षक श्री. संजय जाधव, परिचारिका, आंतरवासिता विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची उपस्थिती होती.

ओपीडी क्रमांक २० येथे एचपीव्ही लस दररोज सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत उपलब्ध असून १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्णालय प्रशासनाने केले आहे.

## परळी मतदारसंघातील रस्ते विकासासाठी २५ कोटींचा निधी मंजूर

**बीड, 11 मार्च** | परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील विविध महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणेसाठी आणि दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत २५ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर झाला आहे. राज्याचे माजी मंत्री आणि स्थानिक आमदार धनंजय मुंडे यांच्या पाठपुराव्यामुळे महायुती सरकारने या विकासकामांना हिरवा कंदील दाखवला असून, यामुळे परळी आणि अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. या निधीतून प्रामुख्याने दाबी-इंदपवाडी, जोगाईवाडी-राडी, नाश्रा-इंजेगाव आणि जिवनापूर-गोवर्धन यांसारख्या प्रमुख मार्गांचे काम पूर्ण केले जाणार आहे. यात रस्ते सुधारणांसोबतच काही ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते आणि नाली बांधकामांचाही समावेश आहे. मतदारसंघातील रस्ते अधिक दर्जेदार व्हावेत या उद्देशाने हा निधी खर्च केला जाणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आमदार धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे जाहीर आभार मानले असून, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बाभळगावच्या अश्विनी कसबे यांना पीएचडी पदवी

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.११ मार्च -**
तुळजापूर तालुक्यातील बाभळगाव येथील अश्विनी महादेव कसबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून बायो केमिकल अँड इन विट्रो स्टडीज या विषयावर पीएचडी पदवी संपादन केली आहे.



अत्यंत साध्या कुटुंबातील अश्विनी यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हे यश मिळवले. त्यांच्या आई-वडिलांनी पाचही मुलींना उच्च शिक्षण देत समाजासमोर प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.

अश्विनी यांनी बी.एस्सी. शिक्षण उमरगा येथे, तर एम.एस्सी.चे शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पूर्ण केले. त्यांना संशोधन कार्यात डॉ. विकास शेंडे यांचे मार्गदर्शन लाभले.



# सत्तेत 'महायुती की, नवी युती'?; याकडे जिल्ह्याचे लक्ष

### धाराशिव जिल्हा परिषद अध्यक्षपदावर उद्या सत्तेचा फैसला...

### जिल्ह्यात शिवसेना अभेद्यचं उपमुख्यमंत्र्यांचा निर्णय अंतिम...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मार्च -**
जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीवरून धाराशिव जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, शुक्रवारी होणाऱ्या निवडणुकीत अखेर सत्तेचा फैसला होणार आहे. महायुतीकडे स्पष्ट बहुमत असतानाही अध्यक्षपद कोणत्या पक्षाला मिळणार याबाबत अजूनही एकवाक्यता न झाल्याने शेवटच्या क्षणापर्यंत राजकीय घडामोडींना वेग आला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेत महायुतीची सत्ता स्थापन होणार की नवी युती आकार घेणार याबाबत उत्सुकता वाढली आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी महायुतीच्या नावाखाली एकत्रितपणे निवडणूक लढवली होती. या आघाडीला बहुमतही मिळाले. मात्र अध्यक्षपदाच्या वाटपावरून अजून अंतिम निर्णय झालेला नसल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. काही ठिकाणी नव्या समीकरणांचीही चर्चा सुरू असल्याने जिल्हा परिषदेत सत्तेचे चित्र शेवटच्या क्षणापर्यंत स्पष्ट होण्याची शक्यता कमी असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

जिल्ह्यातील शिवसेनेने मात्र आपली भूमिका स्पष्ट करत पक्षात कोणतीही गटबाजी नसल्याचा ठाम संदेश दिला आहे. धाराशिव जिल्ह्यातील शिवसेना पूर्णपणे अभेद्य आणि एकसंध आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील, तो आम्हा सर्वांना मान्य असेल, अशी भूमिका शिवसेनेच्या प्रमुख नेत्यांनी मांडली आहे. त्यामुळे शिवसेना नेतृत्वाच्या निर्णयावर जिल्ह्यातील सत्ता समीकरणे मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याचे स्पष्ट झाले आहे.




जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीचा तिढा सोडवण्यासाठी आणि पुढील रणनीती ठरवण्यासाठी काही प्रमुख नेत्यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या बैठकीत धाराशिव जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती, सदस्यसंख्या आणि अध्यक्षपदाच्या संभाव्य समीकरणांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या महत्त्वपूर्ण बैठकीला धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक, माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत, माजी आमदार ज्ञानराज चौगुले तसेच माजी खासदार रवींद्र गायकवाड आदी प्रमुख नेते उपस्थित होते. या सर्वांनी जिल्ह्यातील परिस्थितीची माहिती देत अध्यक्षपदाबाबत योग्य निर्णय घेण्याची विनंती केली. जिल्हा परिषदेत यंदा संख्याबळाच्या दृष्टीने भाजप हा जिल्ह्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला असून शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यामुळे अध्यक्षपदावर दावा कोणाचा असणार यावरून महायुतीतच तणाव निर्माण झाला आहे.

अध्यक्षपदाच्या निवडीपूर्वी जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या सदस्यांना एकत्र ठेवण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. काही ठिकाणी राजकीय संपर्क आणि चर्चाही सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे अंतिम क्षणापर्यंत राजकीय वातावरणात चुरस कायम राहण्याची शक्यता आहे.

भाजपा कडून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या सौभाग्यवती तथा जिल्हा परिषद माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांचं नाव जवळपास निश्चित झालं आहे. तर शिवसेना पक्षा कडून माजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्या सौभाग्यवती उषाताई गायकवाड यांचे नाव समोर येत आहे. शुक्रवारी होणाऱ्या अध्यक्ष निवडीत महायुती आपले बहुमत कायम ठेवत सत्ता स्थापणार की राजकीय समीकरणांमध्ये बदल होऊन नवी युती पुढे येणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## नागराळ येथे ११ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प अंतिम टप्प्यात; शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळण्याची आशा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.११ मार्च -**
लोहारा तालुक्यातील नागराळ (लो) येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत उभारण्यात येत असलेला ११ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प सध्या अंतिम टप्प्यात पोहोचला असून तो लवकरच कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर लोहारा उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या शहर व ग्रामीण भागातील ग्राहकांसह विशेषतः शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीजपुरवठा मिळणार असल्याने मोठा दिलासा मिळणार आहे.



सध्या बहुतांश शेतकऱ्यांना सिंचनासाठी रात्रीच्या वेळी वीज उपलब्ध होत असल्याने पिकांना पाणी देण्यासाठी रात्रभर शेतात थांबावे लागते. नागराळ येथे उभारण्यात येणारा सौर ऊर्जा प्रकल्प सुरू झाल्यानंतर दिवसा वीजपुरवठा उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांची ही अडचण मोठ्या प्रमाणात दूर होणार आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये या प्रकल्पाबाबत आशावादी वातावरण निर्माण झाले आहे.

सौर ऊर्जेवर आधारित हा प्रकल्प पर्यावरणपूरक असून भविष्यातील वीज तुटवडा टाळण्यासाठीही महत्त्वाचा ठरणार आहे.

प्रकल्पातून निर्माण होणारी वीज थेट कृषी वाहिनीद्वारे शेतकऱ्यांना पुरवठा केली जाणार असल्याने कृषी पंपांसाठी दिवसा स्थिर व विश्वासार्ह वीज उपलब्ध होईल. त्यामुळे पिकांचे सिंचन वेळेत होऊन शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, परिसरातील काही व्यक्ती शेतकऱ्यांची दिशाभूल करून चुकीची माहिती पसरवत असल्याचेही समोर येत आहे. अवांतर मोबदला मिळविण्याच्या उद्देशाने काही जणांकडून गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या कामात अनावश्यक अडथळे निर्माण होत असल्याचे बोलले जात आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रकल्प लवकरात लवकर सुरू करण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, तसेच विनाकारण अडथळे निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

नागराळ येथे उभारला जाणारा हा ११ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर लोहारा परिसरातील वीजपुरवठा व्यवस्थेत मोठा सकारात्मक बदल होणार असून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाल्याने शेती व्यवस्थापन अधिक सोयीचे होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प लोहारा तालुक्याच्या कृषी विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## मंदिर परिसरात गुटखा थुंकणाऱ्या पुजाऱ्यांना इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ मार्च -**
तुळजाभवानी मंदिर परिसरात तसेच शिवाजी महाराज दरवाजाबाहेरील पायऱ्यांवर काही पुजारी गुटखा सेवन करून थुंकत असल्याचे निदर्शनास आल्याने मंदिर संस्थानने याबाबत कडक भूमिका घेतली आहे.

तिन्ही पुजारी मंडळांच्या अध्यक्षांनी संबंधित पुजाऱ्यांना समज द्यावी, अन्यथा सीसीटीव्ही फुटेज तपासून दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा मंदिर संस्थानच्या वतीने देण्यात आला आहे.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या मंदिर परिसरात काही ठराविक पुजारी गुटखा, मावा आदी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करून परिसरात थुंकत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कायदा २००३ नुसार सार्वजनिक ठिकाणी तंबाखू अथवा तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, साठवणूक व विक्री करणे हा दंडनीय गुन्हा आहे.




मंदिर परिसरातील पुजारी भाविकांची पूजा, आरती आदी धार्मिक विधी करत असतात. मात्र काही पुजारी इतर वेळी गुटखा खाऊन मंदिर परिसरात फिरताना दिसत असल्याने भाविकांकडूनही नाराजी व्यक्त होत आहे.

यामुळे पुजारी आणि भाविक यांच्यातील सौहार्दपूर्ण नातेसंबंधांवर परिणाम होऊन पुजारी वर्गाची प्रतिमा मलिन होत असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

ही बाब पुजारी म्हणून अत्यंत अशोभनीय असून मंदिराचे पावित्र्य राखले जात नाही, असेही नमूद करण्यात आले आहे.

यापुढे अशा प्रकारच्या घटना आढळल्यास सीसीटीव्ही फुटेज तपासून संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा मंदिर संस्थानच्या तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक माया माने यांनी दिला आहे.

## आयडिबीआय बँकेकडून सावरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला साहित्य भेट




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ मार्च -**
तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला आयडिबीआय बँक, विजापूर रोड सोलापूर यांच्या वतीने सीएसआर निधीतून सुमारे तीन लाख रुपयांचे विविध साहित्य मंगळवार (दि.१०) रोजी भेट देण्यात आले.

या अंतर्गत रुग्णांसाठी पाच बेड, दोन एसी, दोन कपाटे, दोन व्हीलचेअर, बेबी केअर अल्ट्रा वेट मशीन तसेच संगणक व प्रिंटर अशी साहित्ये भेट स्वरूपात देण्यात आली.

यावेळी आयडिबीआय बँकेचे एकनाथ जाधव, हेमंत गानगा, देबा त्रिपाठी, संतोष बोबडे, हणमंत गवळी, यशवंत कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कवठा येथे महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.११ मार्च -**
जागतिक महिला दिनानिमित्त कवठा येथील मंगल कार्यालयात विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सन्मान व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्य प्रभावती अनुरथ सोनवणे होत्या.

यावेळी विजयाबाई माणिकराव देशमुख, पंचायत समिती सदस्या रूक्मिणबाई कांबळे, उद्योजिका प्रितमताई जाधव, अ‍ॅड. वैशालीताई लोंढे, प्रा. डॉ. सारिका दायमा, ग्रामपंचायत सदस्या शितल कांबळे, माजी सभापती शोभा पोतदार, अक्षराबाई सोनवणे तसेच आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. अ‍ॅड. वैशालीताई लोंढे यांनी पर्यावरण संरक्षण व शिक्षणाचे महत्त्व सांगितले, तर उद्योजिका प्रितमताई जाधव यांनी महिलांना उद्योग क्षेत्रात पुढे जाण्याचे आवाहन केले. प्रा.डॉ. सारिका दायमा यांनी योगाभ्यासाचे प्रात्यक्षिक सादर केले.

कार्यक्रमात विद्यार्थिनींनी समूह नृत्य सादर केले. शेवटी सर्व उपस्थित महिलांना अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील नागरिक, युवक तसेच शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी सहकार्य केले.

## स्वानंदी देशमुख यांचे महिलांच्या आरोग्याबाबत उल्लेखनीय सामाजिक कार्य

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मार्च -**
जागृती फाउंडेशनच्या संस्थापक स्वानंदी देशमुख रथ या महिलांच्या आरोग्य व स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. मासिक पाळीविषयी असलेले गैरसमज दूर करून किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे व गरजू मुलींना मोफत सॅनिटरी पॅड उपलब्ध करून देणे हा त्यांचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.



त्या महाराष्ट्रातील विविध शाळा, सामाजिक संस्था व बालगृहांमध्ये जाऊन मार्गदर्शन करतात. तुळजाई प्रतिष्ठान संचलित स्वआधार मतिमंद मुलींच्या बालगृहाला गेल्या पाच-सहा वर्षांपासून त्यांचे सहकार्य लाभत असून तेथील १२१ मुलींसाठी दर महिन्याला शंभरपेक्षा अधिक सॅनिटरी पॅड उपलब्ध करून दिले जातात. त्यांच्या या उपक्रमामुळे मुलींमध्ये आरोग्य व स्वच्छतेबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होत आहे.

## स्वयं सहाय्यता समूहांसाठी कर्ज मंजुरी व वाटप मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.११ मार्च -**
पंचायत समिती लोहारा, उमेद तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष व विविध बँकांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती सभागृहात स्वयं सहाय्यता समूहांसाठी कर्ज मंजुरी व वाटप मेळावा आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या सभापती पल्लवी दादासाहेब जानकर होत्या. यावेळी उपसभापती अमोल पांडुरंग पाटील, तहसीलदार रणजितसिंह कोळेकर, गट विकास अधिकारी जगदेव वागे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक अविनाश हुमणे तसेच जिल्हा अभियान व्यवस्थापक आकाश बोबे उपस्थित होते.



या मेळाव्यात तालुक्यातील ७१ स्वयं सहाय्यता समूहांना एकूण २ कोटी १३ लाख ०७ हजार रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते गटांच्या पदाधिकाऱ्यांना कर्ज मंजुरी पत्रांचे वितरण करण्यात आले.

महिलांनी कर्जाच्या माध्यमातून व्यवसाय उभारून उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण करावेत, असे मार्गदर्शन मान्यवरांनी यावेळी केले.

## उमरग्यात ऑटो लंपास

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.११ मार्च -**
उमरगा शहरातील लातूर रोड परिसरात ऑटो रिक्षा चोरीची घटना घडली असून अज्ञात चोरट्याने सुमारे १ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.

फिर्यादी किरण भास्करराव बारुळकर (वय ५३, रा. बालाजी नगर, उमरगा, ता. उमरगा, जि. धाराशिव) हे दि. ५ मार्च रोजी दुपारी लातूर रोडवरील बिरुदेव मंदिराजवळ आपल्या अजाज कंपनीच्या ऑटो रिक्षा रोडलग उभा करून नैसर्गिक विधीसाठी थांबले होते. त्यावेळी अज्ञात व्यक्तीने संधी साधून त्यांचा अंदाजे १ लाख ५० हजार रुपये किंमतीचा ऑटो रिक्षा व मोबाईल फोन असा एकूण १ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

### जाहीर प्रकटनद्वारे समन्स

**उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात,**

**वादप्रश्न नक्की करण्यासाठी समन्स (नियम ५, नियम १,५)**

**नियमित दिवाणी दावा क्र. ४९९/२०२४**
**निर्मला वि. दिलीपसिंग व इतर**
**निशाणी क्र. २२**

**प्रति,**
**प्रतिवादी क्र. ६.**
**विजयसिंग सुभाषसिंग राजपुत, रा. घर नं, १७५ अ किल्लारी भाग नं. २ किल्लारी, ता. औसा, जि. लातूर.**

ज्याअर्थी वादी **निर्मला सुभाषसिंग राजपुत, रा. घर नं, १७५ अ किल्लारी भाग नं. २ किल्लारी, ता. औसा, जि. लातूर.** यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी ह्या वादासंबधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी **दिनांक १०/०३/२०२६** रोजी दिवसा १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तर देवू शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे. व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट बाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर केम) ज्या दस्त आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावे आणि जर तुम्ही तुमच्य बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर केम) पुष्ठयर्थ पुरावा म्हणुन तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबुन असाल तर अशा दस्तऐवजाचे एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावे.

तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पुर्वी बजावणीकरीता तुमचा पत्ता दाखल करण्यास तुम्हीं कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

**आज दिनांक २८/०१/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (एस.एन. यमगर) | (अ.ज. सय्यद) |
| कनिष्ठ लिपीक | सहा.अधिक्षक |

**दिवाणी न्यायालय, व.स्तर, उमरगा.**

### जाहीर प्रसिध्दीकरण

जा.क्र. २८०/२०२६
दि. ११/०३/२०२६
आर.सी.एस. नं. ३९९/२०२९.
पुढील नेमलेली तारीख :-०२/०५/२०२६
निशान क्र. १८

**बार्शी येथील तिसरे सह मा. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर आर.पी. बागडे साहेब, यांचे कोर्टात**

**साधना सुदाम घुगे ( माहेरकडील नांव)**
**साधना प्रभाकर जायभाय (सासरकडील नांव),**
वय- ५३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. द्वारा प्रभाकर रावणराव जायभाय, सर्व्हे नं. ६८, प्लॉट नं. ३४, जयभवानी नगर, एन. २ सिडको, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद). — **वादी**

**विरूद्ध**

**१) सिंधुबाई सुदाम घुगे (मयत)**
**२) शोभा प्रमोद घुगे,** वय- ५३ वर्षे, धंदा- घरकाम,
**३) अक्षय प्रमोद घुगे,** वय- २८ वर्षे, धंदा- नोकरी,
**४ ) स्नेहा प्रमोद घुगे,** वय- ३० वर्षे, धंदा- नोकरी,
सर्व रा. प्लॉट नं. ३१४/३११, घाटशिळ रोड, जिल्हा परिषद शाळेसमोर, तुळजापुर, जि. धाराशिव, — **प्रतिवादी**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी यातील वादी व प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाईचा हुकुमाचा दावा दाखल केला असून, सदरील वादी यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे रा. प्लॉट नं. ३१४/३११, घाटशिळ रोड, जिल्हा परिषद शाळेसमोर, तुळजापुर, जि. धाराशिव येथेच राहत असून, सदर प्रकरणात मे. न्यायालयाचे समन्स बजावणी होऊन परत आले. परंतु, त्यांचे नातेवाईकांनी प्रतिवादी नं. ३ व ४ राहत नसल्याचा अहवाल मे. कोर्टात दाखल केला आहे. परंतु, सदर प्रकरणी यातील प्रतिवादी क्र. ३ व ४ हे अर्जात नमुद केलेल्या पत्यावर राहत असून देखील सदर अर्जाचे समन्स अदयाप प्रतिवादी नं. ३ व ४ यांना बजावणी न झाल्याने अर्जदार यांनी **दि. ०२/०५/२०२६** रोजी या मे. न्यायालयात प्रतिवादी नं. ३ व ४ यांचे प्रस्तुत प्रकरणाचे समन्स जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे प्रसिध्द करण्याचा अर्ज दाखल केल्याने व सदर प्रकरणाची पुढील तारीख **दि.०२/०५/२०२६** अशी नेमलेली असून, यातील प्रतिवादी नं. ३ व ४ यांनी अर्जदाराचे अर्जास स्वतः अथवा विधीज्ञांमार्फत हजर राहुन म्हणणे दाखल करावे.

अन्यथा, सदर अर्जदाराचे वादाबाबत प्रतिवादी नं. ३ व ४ यांची कोणतीही कसलीही हरकत, तक्रार नाही, असे समजण्यात येऊन प्रतिवादी नं. ३ व ४ विरुध्द योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील. त्यामुळे प्रतिवादी नं. ३ व ४ यांनी सदर प्रकरणातील जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या दि. **०२/०५/२०२६** या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा प्रतिवादी नं. ३ व ४ यांची कसलीही हरकत नाही, असे समजुन सदर दाव्यासंबंधीत मा. न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील.

**हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. ११/०३/२०२६**

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित /- | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित /- |
| (कनिष्ठ लिपीक) | | (सहाय्यक अधिक्षक) |

**तिसरे सह. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी**